३९१

म. ग्रं. सं. ठाणें

विषय: काव्य

संग्रहालय क्रमांक: ३९१

लेखक: डॉ मयूरकवि

सन: १८९३

पुस्तकाचें नांव: काव्योत्तर खंड आर्या

३९१

काव्य

श्री



# श्रीमयूरकवि कृत:

—:०:—

## ब्रह्मोत्तरखंड.
## आर्या.


बाबाजी अनंत प्रभु तेंडुलकर.

यांनीं आपल्या.

"श्रीहरिवरदा" प्रिंटिंग प्रेसमध्यें छापिल्या.

मुंबई.

शके १८१५.

सन १८९३.

# प्रस्तावना.

आपल्या ह्या देशांत, इंग्रेजलोकांची सत्ता होण्या पूर्वी आह्मांस धर्माचें शिक्षण अनेकप्रकारांनीं मिळत होतें. इंग्रेजलोकांची सत्ता झाल्यावर आपले सर्व धर्मशिक्षणाचे प्रकार क्रमें करून बदलत जाऊन आज मितीस त्यांतील कित्येक प्रकार समूळ नष्ट झाले आहेत, कित्येक कथावशिष्ट राहिले आहेत व बाकी राहिलेले अगदीं मोडकळीस आलेले आहेत. त्या मुळें आमचे धर्माचें खरें स्वरूप आह्मांस समजेनासें झालें. आमच्या धर्माचा व आमचा परिचय होण्याचीं कारणें नाहींतशीं झाल्यामुळें आमच्या धर्माची व आमची मैत्री तुटून तो आह्मांस परका झाला. परके लोकां प्रमाणें आह्मी आपल्या धर्माचे स्वरूपा बद्दल कल्पना करूं लागलों. हत्तीचें स्वरूप जाणूं इच्छिणाऱ्या अंधजनां पैकीं ज्याच्या हातास जो त्या हत्तीचा अवयव किंवा अवयवांश लागला त्या वरून त्या अंधानें जशी हत्तीच्या खऱ्या स्वरूपाची कल्पना करावी त्या प्रमाणें च आमची धर्मसंबंधी हल्लींची स्थिति झाली आहे. आह्मांस परधर्मी लोक आमच्या धर्माचें जें स्वरूप जेव्हां दाखवितील तेव्हां तें मात्र आह्मांस कळणार. व तेवढ्या वरून व त्या लोकां प्रमाणें च आह्मी स्थालीपुलाकन्यायानें आमच्या धर्माचें खरें स्वरूप जाणणार. अशी स्थिति

झाल्या मुळें आह्मांस आमच्या पुराणांतील गोष्टी हरिदाशी गप्पा वाटूं लागल्या. इतकेंच नाहीं तर पुराण ह्मणजे शिमगा अशी पुराणशब्दाची आह्मी व्याख्या करूं लागलों.

या पाश्चात्य शिक्षणाच्या प्रभावानें दुसरी एक अशी आश्चर्यकारक गोष्ट झाली आहे कीं, पश्चात्यांनीं प्रसिद्ध केलेल्या गोष्टी प्रत्यक्ष अनुभवास न आल्या तरी सुद्धां त्या आह्मी कांहीं एक संशय मनांत न आणितां निमूटपणें कबूल करितों. पण आमच्या शास्त्रां पैकीं किंवा पुराणांपैकीं कोणती ही गोष्ट प्रत्यक्ष अनुभव आल्या वांचून आह्मी कबूल करीत नाहीं. या मुळें आमच्या शास्त्रपुराणांतील गोष्टी वाचण्यांत किंवा त्यांचा विचार करण्यांत काळ घालविणें ही आह्मांस अत्यंत मूर्खपणा वाटूं लागला.

ही स्थिति नाहींशी होऊन आमच्या शास्त्रां कडे व पुराणां कडे आमची जेणें करून प्रवृत्ति होईल अशी काहीं युक्ति योजिली पाहिजे. विचार करून पाहिलें असतां असें दिसून येईल कीं, प्रत्येक गोष्टीचा सोपपत्तिक अनुभव पाहिजे सा व्यक्तीस येणें अशक्य आहे. ज्या गोष्टीस जसा अधिकारी असेल तसा त्यास त्या गोष्टीचा अनुभव येणार आहे. अधिकारा वांचून कोणती ही गोष्ट समजणार नाहीं. व कदाचित् समजली तरी तिज पासून फायदा होणार नाहीं. ही गोष्ट इतकी उघड आहे कीं, तिची सिद्धता करण्याचें कारण नाहीं. ह्यास्तव प्रथम आपल्या सर्व गोष्टीं वर विश्वास ठेवून त्या

प्रमाणें वर्तन ठेवून त्याच्या उपपत्ति जाणण्या बद्दल अधिकार मिळविला पाहिजे. अधिकार प्राप्त झाल्यावर मग सद्गुरूस शरण जाऊन सेवादिकें करून त्यास प्रसन्न करून घेऊन युक्तीयुक्तीनें त्या गोष्टींचा उलगडा करून घेतला पाहिजे. पोकळ वादविवादानें हवी तशी कल्पना केल्यास त्या पासून कांहीं निष्पन्न होणार नाहीं.

कोणत्या ही गोष्टीच्या सत्यते बद्दल प्रमाण नसल्यास एकाएकीं विश्वास कसा बसेल असें कोणी ह्मणतील. तर तेवढ्या पुरतें एक सामान्य प्रमाण सांतगां येईल. तें असें कीं, 'पाश्चात्य लोकांवर आह्मी विश्वास ठेवितों, व ते पाश्चात्य लोक आमच्या शास्त्रादिग्रंथांची तारीफ करितात'. आमचे शास्त्रकर्ते असत्य गोष्टी कधीं ही लिहिणार नाहींत. पुराणें वगैरे ग्रंथ भटांभिक्षुकांची सोई होणें एवढ्या यःकश्चित् गोष्टी करितां खास लिहिले नाहींत. एवढ्या विद्वानांस भटांच्या पोटांची चिंता पडली असेल असें ह्मणतां येत नाहीं. ते ग्रंथ लिहिण्यांत त्यांनीं कांहीं तरी महत्त्वाची व्यवस्था योजिली असावी ह्यांत संशय नाहीं. ती महत्त्वाची व्यवस्था कोणती हें समजण्यास वर लिहिला त्या शिवाय दुसरा मार्ग नाहीं.

ह्या मार्गा प्रमाणें जे चालणार नाहींत त्यांस आमच्या पुराणादिकांतील गोष्टीं पासून होणारा अद्भुत लाभ होणार नाहीं. ह्मटलें आहे.

आपदां कथितः पंथा इन्द्रियाणामसंयमः ॥
त ज्जयः संपदां मार्गो येनेष्टं तेन गम्यताम् ॥

याचा अर्थ असा आहे—इंद्रियांचें संयमन न करणें हा विपत्तींचा मार्ग आहे, व इन्द्रियांचा निग्रह करणें हा संपदेचा मार्ग आहे, ह्या दोन मार्गां पैकीं जो ज्यास इष्ट वाटेल त्या मार्गाचें त्यानें खुशाल अवलम्बन करावें.

बाबाजी अनंत प्रभु, तेण्डुलकर.

# अनुक्रमणिका.

अध्याय.

१ दाशार्हराजाचें आख्यान.
२ मित्रसहराजाचें चरित्र.
३ चाण्डालीची कथा.
४ विमर्षणराजाची गोष्ट.
५ चंद्रसेन राजाचें आख्यान—गोपी व तिचा पुत्र श्रीकर यांची कथा.
६—७ सत्यरथोपाख्यान—उमानामक ब्राह्मणी व तिचे दोन पुत्र शुचिव्रत व धर्मगुप्त यांची कथा.
८ चित्रववर्मराजोपाख्यान—सीमंतिनीचरित.
९ सोममारव्रतकथा-श्रुतिमित्राचा पुत्र सुमेधा आणि सारस्वतमित्राचा पुत्र सामवान् यांची कथा.
१० मंदरनामा ब्राह्मण व पिंगलावेश्या यांची गोष्ट.
दशार्णदेशाचा राजा वज्रबाहु व त्याची पत्नी सुमति यांची कथा.
११ कीर्तिमालिनी-भद्रायु-सुनयनामा वैश्यपुत्र यांची कथा.

१२ शिवकवचमहिमा.
१३ वज्रबाहु आणि हेमरथ यांचें युद्ध-भद्रायु हेमरथाचा पराभव करितो-भद्रायु व वज्रबाहु यांची भेट-कीर्तिमालिनी व भद्रायु यांचा विवाह-भद्रायूचें पूर्ववृत्तकथन.
१४ भद्रायुराजाच्या सत्वाची परीक्षा.
१५ भस्ममाहात्म्य.
१६ भस्मत्रिपुण्ड्रधारणाचें माहात्म्य.
१७ शंकरनामक शबराची कथा.
१८ उमामहेश्वरव्रतमाहात्म्य व द्विजकन्या शारदा हिची कथा.
१९ शारदेची कथा ( पुढें चालू ).
२० रुद्राक्षमहिमा व महानंदेची कथा.
२१ रुद्राध्यायमहिमा.
२२ शिवकथाश्रवणाचें फल आणि बिन्दुगनामा ब्राह्मण व त्याची स्त्री वंजुला यांची कथा.

संं० ...

# मोरोपंत कृत ब्रह्मोत्तरखंड आर्या.

श्रीकंठातें वंदुनि सन्मंत मी सदुपदिष्ट सल्लीला ॥
गातों ज्या बहुमान्या साधु-सुधा-सुरभि-कल्पवल्लीला ॥ १ ॥
श्रीब्रह्मोत्तरखंडीं श्रीशिवमाहात्म्य वर्णिलें आहे ॥
यश शिवभक्तांचेंही ज्याला न व्यासमुनि तुला पाहे ॥ २ ॥
पंचाक्षर-मंत्राचें माहात्म्य महेशभक्तिचें भारी ॥
तैसेंच शिवकथेचें जें जड जीवांसही सुखें तारी ॥ ३ ॥
मथुरेंत यदुकुलोत्तम होता दाशार्ह भूप हा धन्या ॥
वरिता झाला प्रेमें काशीपतिची कलावती कन्या ॥ ४ ॥
स्वपुरीं आणुनि राज्ञी राजा संगार्थ तीस तो बाहे ॥
पाहे कलावती न प्रेमें तन्मुख तया न वपु वाहे ॥ ५ ॥
कामातुर दाशार्ह क्षितिपति सुकलावतीस पाहूनी ॥
जरि वारी सूक्तशतें तरि आलिंगी बळेंचि बाहूनीं ॥ ६ ॥
भेटे निववाया पति जों तों तत्काळ तीस कीं पोळे ॥
स्त्रीचे अवयव झाले लोहाचे तापले, जसे गोळे ॥ ७ ॥

---

१ शिवलीलामृत. २ सत्-मत-साधूंस मान्य. ३ सत्-उपदिष्ट-साधूंनीं उपदेशिलेल्या. ४ सत्-लीला-उत्तम लीला. ५ ज्या शिवभक्तांच्या यशाला. ६ तुलना. ७ नमः शिवाय या मंत्राचें. ८ बोलावी. ९ सु-उक्त-शत-उत्तम भाषणांच्या शेकड्यानें. १० जळे.

दाशार्ह स्त्रीस म्हणे दयिते पुसतों यथार्थ सांग मला ॥
पल्लव मृदुल तुझा हा देह मला दहनतुल्य कां गमला ॥ ८ ॥
राज्ञी स्मित करुनि म्हणे पुसतां तरि सत्य सांगतें परिसा ॥
जो भगवान् दुर्वासा लाजवितो कल्पपादपा[2] परिसा[3] ॥ ९ ॥
श्रीपंचाक्षरविद्या तेणें उपदेशिली असे मजला ॥
कीं हा जीवां शिवसा प्रणतशिव करावया सदा सजला ॥ १० ॥
विद्यासामर्थ्यें हें शुचि वपु कैसा शिवेल उद्धत या
जो तप्तायःपिंडा स्पर्शाया योग्य होय शुद्ध तया ॥ ११ ॥
ज्या मद्य मांस सेविति गणिका दुष्टा कुबुद्धिच्या वसती ॥
असती रजस्वभावें राजा त्वां बहुत सेविल्या असती ॥ १२ ॥
नित्यस्नान-शिवार्चन मंत्रजप ध्यान दान शिवंशील
नसतां असा कसा तूं मज विद्याशुचितनूस शिवेशील ॥ १३ ॥
भूप म्हणे ती शैवी[12] विद्या दे तूं मिळो मला शुचिता
तुजसीं केलि[13] कराया संतत माझी तनू असो उचिता ॥ १४ ॥
राज्ञी म्हणे अयोग्या मी स्त्री उपदेश हा करायास ॥
सद्गुरुसि शरण जा तो देइल वरदेश हाक रायास ॥ १५ ॥
देईल तुला दाता पुरुषार्थांचा पदानता वर्ग
भर्ग प्रभुवर मजला गमतो ज्ञानें महातपा गर्ग ॥ १६ ॥

---

१ ऐका. २ इच्छित देणारा तरु(कल्पवृक्ष)त्यास. ३ पाषाण ज्यास लोखंड लागलें असतां सुवर्ण होतें त्यास. ४ नम्रजनाचें कल्याण. ५ सिद्ध झाला. ६ तप्त-अय-पिंड-तापलेला लोखंडाचा गोळा. ७ स्थानें. ८ नारिणी. ९ रजोगुणयुक्त स्वभाव ज्याचा असा. १० शिवस्वभाव ११ स्पर्शसील. १२ शिवसंबंधीं. १३ क्रीडा. १४ शिव.

नमुनि म्हणावें त्या भव-जलधीच्या तूं च लाव तीरा या ॥
ऐसें सांगुनि घेउनि जाय गुरुकडे कलावती राया ॥ १७ ॥
प्रणता दाशार्हाच्या ठेवुनि करपद्म मस्तकीं विधिनें ॥
यमुनातीरीं शैवी विद्या उपदेशिली दयानिधिनें ॥ १८ ॥
सद्गुरु-हस्त स्पर्शें पंचाक्षरमंत्रधारणें हाक ॥
देत निघाले सहसा नृपदेहांतूनि कोटिशत काक ॥ १९ ॥
तत्काळ पावले ते झडपोनी दग्धपक्ष मरणातें ॥
रामापुढें निशाचर जैसे होवूनि अक्षम रणातें ॥ २० ॥
विस्मित होउनि राजा राज्ञीहि पुसे विचित्र हें काय ॥
गर्ग म्हणे दोषांहीं मनुतेजःपूर्ण सोडिला काय ॥ २१ ॥
पंचमहापापादिक दोषांच्या ज्या अनेकशत कोटी ॥
झाल्या भस्म श्रीमत्-पंचाक्षर-मंत्रशक्ति बहु मोटी ॥ २२ ॥
मलिन हृदय जें होतें शिवमंत्रें परम शुद्ध राया तें ॥
न समर्थ अन्य ऐसें कांहीं पतितासि उद्धरायातें ॥ २३ ॥
जा झालासि कृतार्थ स्वस्त्रीला चालवीं स्वधर्मातें ॥
श्रीशिवभजनें भूपा पावसिल श्रेष्ठ नित्य शर्मातें ॥ २४ ॥
गुरुतें प्रदक्षिण करुनि वंदुनि दाशार्ह जाय गेहातें ॥
स्त्रीस म्हणे गुरुच्या जित सुरतरुपंचक न काय गे हातें ॥ २५ ॥
तव वपु चंदनशीत स्पर्शें मज निववितें सुदति शयन ॥
हें अमृतरसचि झालें प्राप्त मदन्या असा मुदतिशय न ॥ २६

---

१ मंत्रतेजःपूर्ण. २ देह. ३ मुखातें. ४ मुत्-अतिशय-आनंदाचा आतिशय.

पति पतित तारिला त्वां त्वत्संगें सति जसा मला भवनीं ॥
त्या नंदनाऽभिधानीं हेरिस सुखाचा असा न लाभ वनीं ॥ २७
रतला कलावतीसीं तरि तो विषयी न सज्जना गमला ॥
शमला मोह महामनु-तेजें श्रमला भवांत न भ्रमला ॥ २८ ॥
पंचाक्षरप्रभाव श्रीव्यासमुनींद्र सज्जना कळवी ॥
पळवी मोहातें तो श्रोतृमन श्रीशिवाकडे वळवी ॥ २९ ॥
भक्तमयूरें लिहिलें श्रीशैवमनुप्रभाववर्णन हो
या परमाऽमृतपानीं सालस शिवभक्तरसिककर्ण न हो ॥ ३० ॥

---

## अध्याय २.

कर्म महेशोद्देशें केलें तें मुक्ति देतसे सर्व ॥
पर्वांत परम दुर्लभ जें माघोंऽसित चतुर्दशी पर्व ॥ १ ॥
या परमपुण्य पर्वीं दुर्लभ उपवास वर्णिला आहे ॥
याहुनि रात्रीजागर दुर्लभ ऐसें महासुधी पाहे ॥ २ ॥
याहुनि अतीव दुर्लभ म्हणती शिवलिंगदर्शन ज्ञानी ॥
यापरिस सुदुर्लभतर शिवपूजन धरिति हें सुधी ध्यानीं ॥ ३ ॥
भवकोटिशतसुसंचित शुभ सुकृताच्या महाविपाकबळें ॥
श्रीशिवपूजन घडतें जीवांला कोमलाच्छ बिल्व दळें ॥ ४ ॥
गंगेंत अयुतवर्षें सज्जन मज्जन करूनि जें लाहे ॥
तें एकदाचि बिल्वें शिव पूजी जो तयासि फळ आहे ॥ ५ ॥

---

१ इंद्रास. २ आळशी. ३ महेश-उद्देश-महादेवप्रीत्यर्थ. ४ शिवरात्ररूप पर्व.

याविषयीं दिव्य कथा जीणें संशय नुरेचि अस्ति कांहीं ॥
श्रवण करावी प्रेमें श्रीशिवचरणाब्जभक्तिरसिकांहीं ॥ ६ ॥
इक्ष्वाकुकुलज राजा होता विख्यात मित्रसहनामा ॥
अतुलप्रताप लोकीं ज्याच्या साहों शके न रिपु धीमा ॥ ७ ॥
त्या मित्रसहें वधिला राक्षस मृगयेंत तदनुजें द्वेष ॥
धरिला मनीं शरीरीं शुचिमनुजाचा जसा तसा वेष ॥ ८ ॥
सूदत्व स्वीकारुनि मित्रसहाच्या गृहांत तो राहे ॥
वाढी मनुष्यमांस श्राद्धीं पात्रीं वसिष्ठ तें पाहे ॥ ९ ॥
कोपें वसिष्ठ राक्षस हो ऐसें मित्रसहनृपा शापी
या परि करुनि निशाचर होउनि कृतकृत्य जाय तो पापी १०
आधीं क्रोधें शापी मग राक्षसकृत्य मुनि मनीं आणी ॥
दैवें वर्षें बारा बा राक्षस हो असी वदे वाणी ॥ ११ ॥
व्यर्थ दिला शाप ह्मणुनि आपुलिया होय जो यशा पाया ॥
कुलगुरुला मित्रसहहि घे अंजलिमाजि तोय शापाया ॥ १२ ॥
मदयंती नृपदयिता पाय धरुनियां असें नृपा याँची ॥
न च कुलगुरु शापावा आम्हीं यादें नदी कृपा यांची ॥ १३ ॥
राजा सूक्त सतीचें श्रुतिचें जैसें तसेंचि बहुमानी ॥
जल पायां वरि सोडी धर्माची न करिती कुलज हानी ॥ १४ ॥
शापोदकें करपले झाले काळे चि तत्क्षणीं पाय
कल्माषपादनामा होय प्रख्यात म्हणुनि तो राय ॥ १५ ॥
गुरुशापें राक्षसता त्या मित्रसहा नृपा कडे आली ॥
झाली ब्राह्मणहत्या क्षोभें ब्राह्मण-वधू जशी व्याली ॥ १६ ॥

---

१ प्रभावा. २ सैपाकीपणा. ३ प्रार्थी. ४ गुरूची. ५ सर्पीण.

रे अंगसंगसमयीं वधिला मत्प्रिय असा कसा पापी ॥
तूं हि प्रियासमागम करितां मरासिल असें सती शापी ॥ १७ ॥
बाला ब्राह्मणभार्या शापुनि नृपराक्षसा महागहनीं ॥
गेली पतिसह उत्तम लोकातें जळुनि ती चितादहनीं ॥ १८ ॥
द्वादश वर्षें सरतां राक्षसभाव क्षितीश्वरा सोडी ॥
शापज्ञा मदयंती कर निज संगोद्यता नृपा जोडी ॥ १९ ॥
अनपत्य नृप प्रार्थी दे त्यास श्रीवसिष्ठ संततितें ॥
पुत्रवती मदयंती झाली स्तविती समस्त संत तितें ॥ २० ॥
ती मूर्तिमती ब्राह्मण-हत्या पाठीस नृपतिच्या लागे ॥
बहु पुण्य तीर्थयात्रा करितां कल्माषपाद तो भागे ॥ २१ ॥
मिथिलेला गेला नृप तों गौतमही तया स्थळीं आला ॥
कल्माषपाद राजा विनयें त्या मुनिशि वंदिता झाला ॥ २२ ॥
गौतम म्हणे नरेंद्रा कुशल असे कीं त्यजूनियां राज्य ॥
कां फिरतोसि असा तूं वद बा कां आधि वाहसि प्राज्य ॥ २३
भूप म्हणे विप्रेंद्रा सर्वत्रहि कुशल सर्वदा आहे ॥
राक्षसपणांत केली द्विजहत्या सोडिना मला बा हे ॥ २४ ॥
सर्वस्व दक्षिणा ज्यां विधिनें केले असे महायज्ञ ॥
जे शुचि सहाय झालों मेळविता त्यांसि मी सहायज्ञ ॥ २५ ॥
मंत्र यथाविधि जपलों यम नियम न लंघितां तपें तपलों ॥
हत्यादोष न खपला वित्तें देहें चि मी बरा खपलों ॥ २६ ॥
होतों उद्विग्न पर द्विजवर्या त्वां मला दिली भेट ॥
सत्पुरुषचरणदर्शन होतें बुडतां भवार्णवीं बेट ॥ २७ ॥

---

१ मोठ्या अरण्यांत.

शरणागततारक तूं जरि एकमुख द्विबाहु शिव साचा ॥
बा त्वत्प्रताप हरितो तम सर्वांहि जेविं नाथ दिवसाचा ॥ २८ ॥
दिसतोसि सुविस्मित कां परम चमत्कार पाहिला काय ॥
तव रोमांचप्रसरें होउनि कीं व्याप्त राहिला कांय ॥ २९
गौतम म्हणे नृपाळा क्षितिवरि असतां प्रसिद्ध गोकर्ण ॥
टांक दुरितभय फिटतें याच्या स्मरणें समस्त लोकर्ण ॥ ३०॥
जैसा श्रीशिव साक्षात् कैलासीं मंदराचलीं राहे ॥
तैसाचि महाबल या नामें गोकर्णमंडळीं आहे ॥ ३१ ॥
शिखि-शशि-नक्षत्रांहीं जें न पळे सर्व भास्करें तम तें ॥
अघ तीर्थक्षेत्रांहीं न च गोकर्णें अशेषही शमतें ॥ ३२॥
श्रीगोकर्णीं जळती ब्रह्मवधाद्यखिलपापपर्वत रे ॥
येथें सकृत्प्रवेशें जन नमुनि महाबळासि सर्व तरे ॥ ३३ ॥
ब्रह्मेंद्रोपेंद्रादि श्रीगोकर्णीं अशेष सुर तपले ॥
जपले शैयास्थानीं सिद्धिद घटजादि मुनि सदा जपले ॥ ३४॥
सर्प सुपर्ण दशवदन घटकर्ण बिभीषण त्रिदश यक्ष ॥
दानव मानव तपले झाले कृतकृत्य सिद्ध बहुलक्ष ॥ ३५ ॥
तपली काली जीच्या चरणनखा क्षम न काळ हेराया ॥
तप करुनि सिद्ध झाले कंदर्प सनत्कुमार हे राया ॥ ३६ ॥
श्रीविष्णुप्रमुखांहीं प्राणी संदर्शनें बहु तराया ॥
निजनामांकित लिंगें गोकर्णीं स्थापिलीं बहुत राया ॥ ३७ ॥
पाहुनि शिवरात्र्युत्सव गोकर्णीं फार बा नृपा धालों ॥
झालों कृतार्थ जनकें बहुत विनविलें म्हणोनि मी आलों ॥ ३८॥

१ देह. २ लोक-ऋण. ३ जप करिते झाले. ४ पहाया. ५ तृप्त झालों.

येतां मार्गीं कांहीं पाहुनि आश्चर्य पावलों हर्ष ॥
मरुपथिकावरि पडला जाणों बापा वृथा सुधावर्ष ॥ ३९

---

## अध्याय ३.

कल्माषांघ्रि म्हणे बा तें मज आश्चर्य काय सांगावें ॥
संत चि उदार सदय स्वस्तरुसि उदार म्हणुनि कां गावें १
गौतम म्हणे सभाग्या आइक आश्चर्य सांगतों तुज तें ॥
गुह्य कथावें सुजनीं सुक्षेत्रीं बीज पेरिलें रुजतें ॥ २ ॥
गोकर्णाहुनि येतां मध्यान्हीं तापलों पथीं बा गा ॥
सुसरीं स्नान करुनि वट-मूलीं मी बैसलों महाभागा ॥ ३ ॥
तों जवळ चि चांडाली वृद्धा अंधा कृशा निराहारा ॥
कृमिकुष्ठव्रणपूय- व्याप्तांगी देखिली निराधारा ॥ ४ ॥
मरणोन्मुखी तळमळत होती उष्णीं रजांत राहून ॥
मीहि व्याकुळ झालों तीचा अत्यंत ताप पाहून ॥ ५
तों दिव्य विमान नृपा गगनांतुनि उतरलें जसा अर्क ॥
शिवरूप पुरुष पाहुनि केला शिवदूत हे असा तर्क ॥ ६ ॥
म्यां उठुनि हस्त जोडुनि होउनियां स्तवनवंदनप्रवण ॥
पुसिलें वदा प्रयोजन आगमनाचें किमर्थ हो कवण ॥ ७ ॥
चवघे शिवदूत असें वदले बा गौतमा, महाप्राज्ञा ॥
घेउनि विमान आलों केली श्रीत्रिभुवनेश्वरें आज्ञा ॥ ८ ॥
आली करुणा करुणा-पारावारा महावदान्या या ॥
चांडालीतें आलों सत्कारुनि उत्तमा पदा न्याया ॥ ९ ॥

मी अति विस्मित वदलों देहीं तिळही जिच्या नसे शुचिता ॥
चांडाली सुविमाना कैसी मखमंडपा शुनी उचिता ॥ १० ॥
जन्मापासुनि अशुचि प्रायःपापानुगामिनी चंडा
शिवलोकीं कसि नेतां चांडाळी पात्र होय जी दंडा ॥ ११ ॥
जीस शिवज्ञान नसे जप तप उपवास सत्क्रिया कांहीं ॥
भूतदया शिवपूजन भक्षाऽभक्षादिनियमही नाहीं ॥ १२ ॥
शिवलोकीं सुविमानीं वाहुनि नेतां कशी कुशीला हो ॥
प्रभुचर्चा अविभाव्या कीं म्हणतो सुगतितें असी लाहो ॥ १३ ॥
पहिलें पुण्य लव नसे असतें तरि कां असी दशा असती ॥
सांगा दिव्यविमानीं वाहुनि नेतां तुम्ही कसी असती ॥ १४ ॥
वदले शिवदूत असें जरि कौतुक गौतमा तुला गमतें ॥
तरि परिस सांगतों कीं शंभुयशीं चित्त साधुचें रमतें ॥ १५ ॥
पूर्वभवांत सुमित्रा हे होती विप्रसंभवा नात्रें ॥
जीचें सौंदर्य जनें शीत मधुर जेविं अंभ वानावें ॥ १६ ॥
अनुरूपा विप्रसुता कांता तातें निवेदिली लाहे ॥
कांहीं काल धवा सह रतिला पावुनि निवे दिली लाहे ॥ १७ ॥
दारुण रोगें मेला पति कांहीं काल शीलें हे रक्षी ॥
होता आत्मा ईचा गुरुगेहीं जेविं पंजरीं पक्षी ॥ १८ ॥
यौवनभर स्मरज्वर होतां येईल कां मना शीलें ॥
रक्षक विवेक नसतां पुण्य व्रत काम कामें नाशिले ॥ १९ ॥

---

१ दुष्ट स्वभाव जीचा असी. २ असुक प्रकारची असी संभावना करण्यास जी यावयाची नाहीं असी. ३ पतिव्रता नव्हे असी. ४ पातिव्रत्य. ५ मदनव्यथा.

मग गुप्तव्यभिचार- प्रारंभ करून लक्षणें कळली ॥
मळली स्वजनें विटली स्पष्ट घटस्फोट करुनि कीं त्यजिली २०
शूद्रविटांसीं रमतां बहु धनवान् शूद्रपति इला पाहे ॥
बाहे जावुनि राहे गृहिणी होऊनि तद्गृहीं बा हे ॥ २१ ॥
प्रसवे शूद्रा पासुनि सुत सादर मद्य मांस हे भक्षी ॥
झाली अति विषयांधा बा हित कांहीं न आपुलें लक्षी ॥ २२
तो शूद्र गृहीं नसतां भक्षावें मांस हें मनीं आणी ॥
गोवत्सातें मानुनि मेष तमीं हे महासिनें[1] हाणी ॥ २३ ॥
नेउनि गृहांत वधिला गोवत्स असें मदाकुला पाहे ॥
कोण्या एका सुकृतें भ्याली शिव शिव तदा वदे बा हे ॥२४ ॥
एक मुहूर्त मुनींद्रा पश्चात्तप्ता उगीच हे राहे ॥
मग अर्ध खाय कोठें अघमय मदिरारतीं जनीं आहे ॥ २५ ॥
बाहिर गोवत्साचें अर्ध शरीर त्यजूनि हे पापा ॥
आक्रोश करी व्याघ्रें वधिला गोवत्स हा पहा बापा ॥ २६ ॥
आक्रोश श्रवण करुनि आले धांवोनि लोक जवळील ॥
कीं वदले हा कोमल गोवत्स व्याघ्र कां न कवळील ॥ २७ ॥
दुसरे दिवसीं ग्रामां- तर्गत भर्ता इचा गृहा आला ॥
सांगे व्याघ्रें वधिला गोवत्स असें मृषा चि हे त्याला ॥ २८ ॥
ऐसें पाप करुनि हे दुर्वृत्ता गौतमा पुढें मेली ॥
नेली यमदूतांहीं मग यमधर्में विचारणा केली ॥ २९ ॥
चांडाळी केली कीं या ऐशा दुष्फळासि हे अर्हा[2] ॥
अंतकसभासदांहीं व्हाया अतिदुःख दुर्दशा गर्हा[3] ॥ ३० ॥

---

१ महा-असि मोठ्या खड्गानें. २ योग्या. ३ निंद्या.

सं.कृ.२०५
८८

जात्यंधा कुष्ठ-व्रण- कृमि-दुर्गंधाकुला कृशा काळी ॥
झाली ईस कदन्नें उच्छिष्टें माय बाप ही पाळी ॥ ३१ ॥
माता तात हि मेला बंधुजनें त्यागिली महापापा ॥
वरितो कोण अशा या मूर्ता नरकास गौतमा बापा ॥ ३२ ॥
वसनाऽशनार्थ हिंडे देशोदेशीं धरुनियां यष्टी ॥
न भरे पोट न झांके वपु होय सदा गदाकुला[१] कष्टी ॥ ३३ ॥
श्रीगोकर्णीं यात्रा विपुला शिवरात्रिकारणें आली ॥
वसनाऽशनार्थ तेथें हे ही पातकसमृद्धिची आली[२] ॥ ३४ ॥
मार्गा जवळ बसे जरि शक्ति शरीरीं नसे बसायाची ॥
वसनाशनातिदीना सर्वजना करुनि हे पसा याची ॥ ३५ ॥
जन हो दया करावी मज दीनावरि तुह्मीं न कोपावें ॥
झांकाया तनुसि वसन अशन करायासि अन्न ओपावें ॥ ३६ ॥
ऐसें चतुर्दशीच्या दिवसीं रात्रीं हि हे जना मागे ॥
कोणीं कांहीं न दिलें बा ग्लानी करुनि या चितां भागे॥ ३७॥
द्या हो द्या हो ह्मणतां श्रमली बहु अर्धरात्र जों झाली ॥
तों अंजलिमाजि इच्या कोणी जन बिल्वमंजरी घाली ॥ ३८ ॥
भक्षाया योग्य नव्हे ह्मणुनि इणें बिल्वमंजरी हातें ॥
दूर दवडिली दैवें शिवलिंगशिरींच पाडिली वातें ॥ ३९ ॥
रात्रौ जनासि मागत होती श्रीशिवचतुर्दशींत पण ॥
दैवाच्या योगें हे अन्नाचा पावली न एक कण ॥ ४० ॥
क्षेत्रांत भद्रकाली प्रख्याता भगवती तिच्या मार्गे ॥
पुनि निशीतें तेथुनि निघती झाली सकाळ हे रागें ॥ ४१ ॥

---

२ १ गद-आकुळा-रोगानें व्याकुळा असी. २ सखी.

तेथुनि निघोनि आली या स्थानातें पथीं बहु श्रमली ॥
श्रमली क्षुद्रोगार्त प्रभुसि निजदयेसि पात्र हे गमली ॥ ४२
आज्ञा करूनि आम्हां प्रभुनें प्रेषुनि विमान आणविली ॥
पुससी ह्मणुनि तुज मुनें चांडाळीची प्रवृत्ति जाणविली ॥ ४३
कृपणीं कृपालुता जी प्रभुची तुज कळविली मुनिवरा हे ॥
शिवकीर्तिस कर जोडुनि एकिकडे शारदी पुनिव राहे ॥ ४४
कर्मविपाकगति पहा कैसी अत्यद्भुता मुने आहे ॥
भगवत्प्रसादभाजन होउनि सुपदासि अधम हीं लाहे ॥ ४५ ॥
पूर्वभवीं अन्नोदक-दान न घडलें इला कधीं लेश ॥
यास्तव महामुने हे पीडिति उग्र क्षुधा तृषा क्लेश ॥ ४६ ॥
प्याली मद्य मदांधा जात्यंधा या चि पातकें झाली ॥
चांडाळी या स्तव कीं नाहीं गोवत्स भक्षितां प्याली ॥ ४७ ॥
जारपथरता म्हणवुनि दुर्वृत्ता दुर्भगा असी रंडा ॥
क्षोभवि वपु मदवेगें पावलि कुष्ठव्रणा महादंडा ॥ ४८ ॥
हे शूद्रासीं रमली कृमिपूयक्षतजपीडिता ह्मणुनी ॥
भोगविहीना झाली विषयाहुनि न व्रतें गुणें गणुनी ॥ ४९ ॥
वसती मर्त्यशरीरीं अघचिन्हें जाणताति जे कवि ते ॥
देखति दाविति अन्या बुध सर्वार्था प्रकाशिते सविते ॥ ५० ॥
जे बहुरोगी सुत-धन-वर्जित याचक कुलक्षण क्लिष्ट ॥
निर्विद्य भोगविरहित विकलांग कुरूप दुर्गुणाश्लिष्ट ॥ ५१ ॥
निर्लज्ज निंद्य दुर्भग परसेवक सर्व हे महापापी ॥
जन्मांतर-कृत जें जें तें कर्म शुभाशुभें गुणें व्यापी ॥ ५२ ॥

---

१ क्षुद्-रोग-आर्त क्षुधारूप रोगानें पीडित.

नरदेहीं शुभ अशुभहि समजुनि जो जंतु करितसे पाप ॥
तो केवळ आत्मघ्न प्राप्त तथा होय सर्वदा ताप ॥ ५३ ॥
अथवा सकलें पापें करितो जो काय सर्वदा नर तो ॥
स्मरतो शिवासि तरि तो जरि ही न रतेल शुभपथीं तरतो ॥५४॥
मुनिशार्दूला जेव्हां पूर्वभवीं करुनि हे दुरित मेली ॥
यमदूतांहीं बांधुनि दृढपाशांहीं यमालयीं नेली ॥ ५५ ॥
तेव्हां वितर्क झाला बहु मासे यम-सभासदामाजी ॥
दंड करावा किंवा न करावा पापिणीस या आजी ॥ ५६ ॥
या जन्मींचें चि दुरित पूर्वी हृदयीं इच्या नसे जडलें ॥
होवें प्रथम ह्मणावें ब्रह्मकुळीं जन्म तरि कसें घडलें ॥ ५७ ॥
या जन्मीं च अघ इणें बहु केलें पावली जगीं गेहां ॥
तरि ही ब्राह्मण-कुळजा नोहे नरकीं वसावया अर्हा ॥ ५८ ॥
नेणुनि गोवत्सातें आधीं मदिरा-मदाकुला मारी ॥
र्‍याली जाणुनि वदली शिव शिव हे पूर्वपुण्य अति भारी ॥ ५९ ॥
गोवत्स-वधें पावे कंपातें मारुतें जसी कदली ॥
अघ नाशाया शिव शिव ऐसें विस्पष्ट हे मुखें वदली ॥ ६० ॥
जरि एकदा हि वदली शिव शिव ऐसें तथापि हें नाम ॥
गुरु मंगल गणवेल चि या उच्चारें चि हें परं-धाम ॥ ६१ ॥
एका जन्मीं केलें अघ दारुण तत्फलासि भोगाया ॥
व्हावी चांडाळी हे चरित इचें मत कवींस हो गाया ॥ ६२ ॥
क्लेशांहीं परिपीडन जें वारंवार होतसे कांहीं ॥
या हुनि अधिक नरक तो सुज्ञमतें अन्य सर्वथा नाहीं ॥६३॥

१ निंदा. २ योग्या. ३ मोठें.

ह्मणवी दुर्जन मम हा व्याधि दरिद्रत्व मूर्खता हाय ॥
एकैक हि नरक च मग सांगावें ज्यांत सर्व तें काय ॥ ६४ ॥
प्राक्तन-सुकृतें घेती झाली विवशा हि नाम जे नारी ॥
तेणें चि अन्यजन्मीं अंतीं बहु पुण्य करिल हे भारी ॥ ६५ ॥
त्या चि महापुण्यानें पावेल तरोनि यातना शुचिता ॥
होइल परमपदातें शंभुप्रभुच्या अनुग्रहें उचिता ॥ ६६ ॥
श्रीशिव-सेवक येतिल शिवलोकीं गौरवूनि नेतील ॥
देतील परमपद कवि कोटिमुखें स्तुति करोनि घेतील ॥ ६७ ॥
ऐशा प्राण्याचे तों आह्मीं शास्ते नसों स्वयें युक्त ॥
प्रभु हा च विचार करुनि तो चि करी जीव बद्ध कीं मुक्त ॥६८
ऐसा करुनि विचार द्विजवर्या चित्रगुप्त-यम यांहीं ॥
हे सोडिली सुमित्रा परिपालित-भगवदुक्त-समयांहीं ॥ ६९ ॥
पडली भूवर झाली चांडाळी प्रथम जें वदे शिव तें ॥
सुकृत इच्या पदरीं बा जग या नामें चि तापलें निवतें ॥७०॥
श्रीशिवरात्रीस इला घडला उपवास जागर स्पष्ट ॥
बिल्वें शिवलिंगार्चन मग कां सरतिल न पातकें कष्ट ॥ ७१ ॥
नामग्रहण उपोषण बिल्वार्चन जरि जसें तसें घडलें ॥
जडलें भक्तत्व पहा परमपद बळें इच्या गळां पडलें ॥ ७२ ॥
योग्या परमपदा हे ऐसा वाहोनि शंकरा बेल ॥
मग सद्भक्तगृहीं कां मोक्ष न होउनि विशंक राबेल[1] ॥ ७३ ॥
ऐसें वदोनि केली ती दिव्याकृति महेशदूतांनीं ॥
बैसविली सुविमानीं भगवच्चरणाब्ज-भक्ति-पूतांनीं ॥ ७४ ॥

---

१ वागेल.

प्रथम स्वप्न गमे मग समजुनियां ती ह्मणे अहा देवा ॥
दे वास पदीं साचा दीनाचा बंधु तूं महादेवा ॥ ७५ ॥
त्वन्नाम-वर्ण-एकाहि अघनगशत हरिल गा महाबाहो ॥
या परि चि आवराया नत-मानस-हरि लगाम हा बा हो॥७६॥
बहु विस्मयकर भगवत्-चर्या-माहात्म्य या नसे जोडा ॥
ह्मणतें कवींस लिहिले असतिल जे इतर सदय ते खोडा ॥ ७७॥
प्रभु बिल्वपत्रमात्रें होउनि संतुष्ट परमपद देतो ॥
चेतोहर वरचरित प्रकटुनि विलयासि दुरितभय नेतो ॥ ७८ ॥
शक्रादि लोकपाति जे विस्मित झाले पहावया आले ॥
त्यां देखत शिवलोकीं नेली सुर या यशोऽमृतें धाले ॥ ७९ ॥
गौतम ह्मणे नरेंद्रा हें अति आश्चर्य देखिलें येणें ॥
मी वेधलों जसा बा वेधावें मधुरतर-रवें एणें ॥ ८० ॥
तूं जा गोकर्णातें तृण शत हि महाबळा पुढें हत्या ॥
अत्यादर दीनाच्या अवनीं प्रभुकीर्ति हे नृपा सत्या ॥ ८१ ॥
ऐसें हित कथुनि पुसुनि गेला मिथिलेसि तो महाविप्र ॥
गोकर्णीं नृप हि तरे शिवरात्रि महाबलाऽर्चनें क्षिप्र ॥ ८२ ॥
या पुण्य-कथा-श्रवणें गानें तरतात सर्व ही प्राणी ॥
श्रीब्रह्मोत्तरखंडीं श्रीव्यासाची असी असे वाणी ॥ ८३ ॥

---

## अध्याय ४.

---

१ चित्त हरण करणारें. २ हरिणें.

शिव-पूजा-माहात्म्य- श्रवण करावें सदा परम सार ॥
भवसागरांत बुडतां श्रीशिवपूजा चि होय परपार ॥ १ ॥
पूजा स्वयें करावी श्रद्धेनें दुर्बळें पहावि तरी ॥
अवलोकिलिही ईश्वर- पूजा अत्युत्तमा महा वितरी ॥ २ ॥
अश्रद्धेनें ही जो श्रीशिवपूजा विमुक्तिदा करितो ॥
किंवा विलोकितो जो परमपदातें विनिश्चयें वरितो ॥ ३ ॥
होता किरातदेशीं राजा नामें विमर्षण ख्यात ॥
मिरवी प्रताप लोकीं लीलेनें मथुनियां अरित्रांत ॥ ४ ॥
शठ सर्व-मांस-भक्षक मृगयारुचि चपल निर्दय क्रूर ॥
तो सर्व-वर्ण-वनिता- रत सोडी धर्ममयपथा दूर ॥ ५ ॥
परि आळस शिवपूजा करितां तिळमात्र हि न मनांत धरी ॥
दोहीं चतुर्दशींत प्रेमें उत्सव सदा विशेष करी ॥ ६ ॥
त्या सर्व-भक्षकाचें परमार्या-सेवनादि जें पाप ॥
तें चिंतुनि तन्महिषी- सद्बुद्धि कुमुद्वती धरी ताप ॥ ७ ॥
एकांतीं पतिस पुसे राजा त्वच्चरित चित्र मज वाटे ॥
दाटे चित्तीं हर्ष क्षण येणें क्षणें समूळ मग आटे ॥ ८ ॥
दुष्टाचरण तुझें हें कोठें कोठें महेश्वरीं भक्ति ॥
कीं नित्य सर्वभक्षक तूं तुज परदार सेवनासक्ति ॥ ९ ॥
क्रूर सकलहिंसारत करिसी शिवभक्ति तूं तथापि कसा ॥
तुजपासुनि बुध पावे बहु काकापासुनि व्यथा पिकसा ॥ १०

---

१ तेजा-उत्सवा. २ समर्पी. ३ शत्रुसमूह. ४ उत्सव. ५ कोकिळसा.

ऐसें स्त्रीनें पुसतां नृप करुनि विचार कौतुकें डोले ॥
सत्कारुनि राज्ञीतें हांसुनि तो मधुर आदरें बोले ॥ ११ ॥
दयिते पहिल्या जन्मीं मी होतों सारमेय[1] पापानें ॥
हिंडें अन्नार्थ पुरीं होउनि बहु विकळ-जठर-तापानें ॥ १२ ॥
शिवरात्रि-महापर्वीं श्रीशिवपूजा शिवालयीं पाहें ॥
अन्ना करितां द्वारीं व्याकुळ होऊनि मी उभा राहें ॥ १३ ॥
दंडधर क्रुद्ध पुरुष माराया धांवले तदा प्राण ॥
रक्षायासि पळालों तेथुनि भय पावुनि प्रिये जाण ॥ १४ ॥
पुनरपि शिवालयातें आलों करुनि प्रदक्षिण द्वारीं ॥
दंडधरांहीं केलीं पिटुनि पुन्हा विकल इंद्रियें सारीं ॥ १५ ॥
तदपि प्रदक्षिण करुनि शिवमंदिर मी पुनः पुन्हा द्वारीं ॥
बलि-पिंडाद्यतिलोभें राहें दुर्विध[2] जसा विपद्वारीं[3] ॥ १६ ॥
कोपुनि धनुर्धरानें माझे मर्मीं च हाणिले बाण ॥
गेले तत्काळ शिव- द्वारीं सांडूनि दुर्वपु[4] प्राण ॥ १७ ॥
शिव-सन्निधि-प्रभावें राजकुलीं जन्मलों पहा जाये ॥
अत्यद्भुत भगवत्पद- महिमा[5] वर्णावया न हा यां[6] ये ॥ १८ ॥
जी श्रीचतुर्दशी शिव- पूजा दीपावली प्रिये पाहें ॥
त्या अत्यद्भुत पुण्यें संप्रति[7] कालत्रयज्ञ मी आहें ॥ १९ ॥
मी सर्वभक्ष झालों आहें प्राग्जन्म-वासना-योगें ॥
दुर्लंघ्या प्रकृतीतें मोठे ज्ञाते हि मोडिते भोगें ॥ २० ॥

---

१ कुत्रा. २ दरिद्री. ३ विपत्-वार-विपत्तिसमूहीं. ४ दुः-वपु-
वाईट शरीर. ५ भगवत्पदमहिमा. ६ मला. ७ आतां

यास्तव चतुर्दशींत प्रेमें मी पूजितों शिवाला हें ॥
जाणुनि तूं श्रद्धेनें भद्रे पूजूनि शिव शिवा लाहें ॥ २१ ॥
राज्ञी ह्मणे नरेंद्रा धन्यत्व असें नसेल अन्यास ॥
कीं झालासि सुपात्र ज्ञानास शिव-प्रसाद-जन्यास ॥ २२ ॥
पूर्वचरित माझें ही मज करुणा करुनि तूं कळिव राजा ॥
त्या सिद्धि तुला शिव-पद-पद्मांच्या गुरुमुखा अलिवरा ज्या॥२३
भूप म्हणे तुज कथितों होतिस मागिल भवीं कपोती तें ॥
अत्यद्भुता महेश्वर- भक्ति तुझें मन सदा जपो तीतें ॥ २४ ॥
देवि तुज कपोतीस क्रव्यें मिळालें वनीं असें लक्षी ॥
त्या मांसा स्तव लागे तुज मागें गृध्र दूरदृक् पक्षी ॥ २५ ॥
श्रीशैलीं शिवमंदिर त्यातें करुनि प्रदक्षिण श्रांता ॥
बसलीस तूं ध्वजाग्रीं पलं-पिंडमुखी भयाकुल-स्वांता ॥ २६ ॥
गृध्रें खडतर तुंडें धांवुनि गांठुनि पळांत ताडून ॥
नेलें मांस तुज तळीं त्या ध्वजशिखरा वरून पाडून ॥ २७ ॥
तूं काय कपोत-शत क्षम गृध्रासीं करावया न रण ॥
पडतां चि शिवद्वारीं देवि तुज प्राप्त जाहलें मरण ॥ २८ ॥
झालिस राजस्त्री तूं अभिमुखमरणें प्रदक्षिणक्रमणें ॥
श्रमणें नको बहु तपें प्रभुच्या स्मरणें चुके भव-भ्रमणें ॥ २९ ॥
राज्ञी राजासि म्हणे जारि हारिलें देह कांळसरिदोघें ॥
वद सर्वज्ञा आम्ही पावों कोणा गतीस तरि दोघें ॥ ३० ॥

---

१ मांस. २ मांसपिंड मुखीं जीच्या असी. ३ काळ-सरित्-ओघ-काळनदीच्या प्रवाहें.

भूप म्हणे या वरि मी होइन सैंयत्र नृपालु तूं धन्या ॥
होसिल माझी भार्या जो सुयशा स्तंजयेश तत्कन्या ॥ ३१ ॥
तिसऱ्या जन्मीं होइन सौराष्ट्रेश्वर कलिंगराज-सुता ॥
होसिल माझी दयिता साध्वी सुगुणा समस्त-साधु-नुता ॥ ३२॥
होइल चतुर्थ पंचम तव मम शुभ जन्म षष्ठ सप्तम ही ॥
जाऊं शिवलोकातें स्वयशें निववुनि वियोग-तप्त मही ॥ ३३ ॥
ब्रह्मज्ञान अगस्त्या-पासुनि पावेन सप्तमीं नमनें ॥
तुज सह कल्पांतीं ही होइन शिव-भक्त तप्त मी न मनें ॥३४॥
हे शिव-पूजा-दर्शन- पुण्यें सद्गति पहा कुतरियाची ॥
भक्ति च सुतंरि तदन्या सुज्ञ ह्मणाया न हां कुंतारे याची ३५
या परि निज-पति-कथित श्रवण करुनि बहु कुमुद्वती हर्षे ॥
पूजुनि पतितें श्रीपशु- पतितें प्रेमाश्रु ती सती वर्षे ॥ ३६ ॥
प्रेमें चतुर्दशींत श्री-शिव-पूजन करुनि तो भूप ॥
सप्तमजन्मीं झाला श्री-शिवलोकीं सदार शिवरूप ॥ ३७ ॥

---

## अध्याय ५.

शिव-भक्ति-लेश-युत जो धन्यतर त्रिभुवनांत तो सर्व ॥
शंभु-प्रसाद-भाजन उच्चतर तदन्य उच्च ही खर्व ॥ १ ॥
शिवपूजन ज्यांत घडे सकला दिवसांत तो दिवस महितें ॥
संसारीं आप्त दिसति बहु परि करिती न ते शिवसम हित ॥ २ ॥

---

१ उत्तम नौका. २ हाय. ३ वाईट नौका. ४ न्हस्व. ५पूज्य.

नर नारी षंढ असो किंवा चांडाल पुल्कस प्राणी ॥
तो शिवभजनें सद्यो·मुक्त असी व्यासमुनि वदे वाणी ॥ ३ ॥
काय कुलें आचारें शीलादिगुणें हि होतसे काय ॥
शिव-भक्ति-लव-युताचे वंद्य समस्ता जना सदा पाय ॥ ४ ॥
जें अर्पिलें शिवाला भक्तीनें पत्र पुष्प फल तोय ॥
श्रीब्रह्मोत्तरखंडीं श्रीव्यास ह्मणे अनंत तें होय ॥ ५ ॥
भीति कलत्रीं पुत्रीं वित्तीं तैसी शिवार्चनीं करितां ॥
पावे जन सिद्धीतें हें अद्भुत काय हो मनीं धरितां ॥ ६ ॥
होता उज्जयिनींत क्षितिपालक चंद्रसेन या नावें ॥
ज्यातें सुकविजनाहीं दुसरा वासव असें चि वानावें ॥ ७ ॥
पुरवातें महाकाल- प्रभुची पदभक्ति चंद्रसेन वरी ॥
त्यासीं पारिषदोत्तम मणिभद्र बहु प्रसाद सख्य करी ॥ ८ ॥
चिंतामणि मणिभद्रें दिधला त्या चंद्रसेन-राजाला ॥
कौस्तुभमणिचा महिमा जैसा तैसा असे वरा ज्याला ॥ ९ ॥
ज्याचा स्पर्श सुवर्ण चि उपला ताम्रा अयां करि त्रपुंस॥
जो अर्थिजनासि ह्मणे कल्पतरूचें मला चरित्र पुस ॥ १० ॥
परिसुनि अद्भुत-गुणपर नृप लोभ धरूनि मागती मणितें ॥
तो हांसे परतेजा भगवज्जन तेज काय हो गणितें ॥ ११ ॥
याच्या भंगें झाले ते नरनायक समस्त ही क्रुद्ध ॥
वेष्टुनि पुरीस ह्मणती दे मणि भेटोनि शीघ्र कीं युद्ध ॥ १२ ॥

---

१ नाम-विशेष (चांडाळांतील भेद). २ पारिषद्-उत्तम-सभासदश्रेष्ठ. ३ पाषाणा. ४ लोहा. ५ कथिलास. ६ अन्यतेजा.

मत्सरि- भूपालांहीं स्वपुरी सर्वत्र रोधिली पाहे ॥
जाय महाकालातें शरण स्थिर चंद्रसेन तो राहे ॥ १३ ॥
नृप निर्विकल्प निर्भय दृढनिश्चय मूल सृष्टिचें अर्ची ॥
कीं कामाद्यरि-तूला याच्या प्रोद्दाम दृष्टिचें अर्ची ॥ १४ ॥
रात्रिदिन महापूजा प्रारंभी चंद्रसेन सन्महित ॥
जीतें विलोकितां ही भावें व्हावें समस्त-जन्म-हित ॥ १५ ॥
कोणी विधवा गोपी सहज महाकालदर्शना आली ॥
तद्बालक-मति पाहुन पूजा तत्काल शिवपरा झाली ॥ १६ ॥
तो पांचां वर्षांचा सुत मातेनें निजस्थळा नेला ॥
तेणें स्व-शिबिर-निकट श्लक्ष्णप्रस्तर शिव स्वयें केला ॥ १७॥
करि कल्पित शिवपूजा तो बाळक कल्पितोपचारांहीं ॥
दिव्यांऽबर-मणि-कंकण-कुंडल केयूर-मुकुट-हारांहीं ॥ १८ ॥
प्राप्त कुसुम तोय इतर गंधाक्षत धूपदीप जे अर्पी ॥
ते कल्पित नैवेद्य हि सत्य प्रेमाऽमृतें शिवा तर्पी ॥ १९ ॥
पूजी पुनःपुन्हा मग वाचे वंदी किशोर तो भावें ॥
लोभावें मानस तें प्रेम बहु प्रेमळांत शोभावें ॥ २० ॥
या परि मन परमेश्वर- पूजा-परमोत्सवांत तो लावी ॥
तों वारंवार तया तन्माता भोजनार्थ बोलावी ॥ २१ ॥
श्रवण चि न करी या स्तव उत्तर हि न भक्त-बाळ तो ओपी ॥
तो पी अमृत तया घे कांजी म्हणणें तसें करी गोपी ॥ २२ ॥
जाय न ओढुनि नेतां कीं मन पूजा-सुखार्णवीं बुडवी ॥

---

१ पूजी. २ तेज. ३ लहान पाषाण.

ताडुनि पूजन सह सुत-कल्पित शिवलिंग गोपिका उडवी ॥२३॥
जरि परम प्रेमळ बहु-मत सुत शिवभक्त अनघ रागेली ॥
आलिंगुनि द्रवावी परि कठिन करूनि मन घरा गेली ॥२४॥
शिशु बहु रडे शिवार्चन तें जेव्हां माय दे विसकटून ॥
हें न करुनि जरि देती प्याया ह्मणता कदा विष कटू न ॥ २५ ॥
तो एक मुहूर्त पडे मूर्छित मग दृष्टि उघडुनी पाहे ॥
तों रत्न-प्रासादीं मणिमय शिवलिंगपूजिलें आहे ॥ २६ ॥
उठला सहसा शिशु तो तें अत्यद्भुत विलोकितां भ्याला ॥
झाला मग्न बहुसुखीं पूजा-माहात्म्य समजला धाला ॥ २७ ॥
मग भूवरि दंडसम प्रभुतें वंदी ह्मणे अगा धात्या ॥
अपराधा मातेच्या पोटीं घालीं शता अगाधा त्या ॥ २८ ॥
शंभो गोपी चुकली हे स्पष्ट नव्हे तव-प्रभाव-ज्ञा ॥
न जळावी जेवीं जळे करूनि पतंगी दव-प्रभावज्ञा ॥ २९ ॥
त्वद्भक्ति-भव सुकृत जरि माझ्या पदरीं असेल तरि देवा ॥
माता प्रसाद पावो अनुदिनिं भावें करीन मी सेवा ॥ ३० ॥
ऐसें विनवुनि भावें प्रभुतें वंदुनि पुनःपुन्हा बाळ ॥
देवालयांतुनि निघे अस्ताचा प्राप्त होय तों काळ ॥ ३१ ॥
स्वशिबिर जाउनि पाहे शक्र-पुराऽधिक हिरण्य-रत्नमय ॥
तेंवि रचाया शकता अष्टशतें हि न करूनि यत्न मय ॥३२॥
त्या निज भवनीं दान्तीं पर्यंकीं माय निद्रिता पाहे ॥
रत्नाऽलंकारवती रूपें अमरी जसी तसी आहे ॥ ३३ ॥

---

१ हस्तिदंताचा ( पर्यंकशब्दाचें विशेषण ).

तो तीस ह्मणे माते ऊठ श्रीशंकरें कृपा केली ॥
सुदशा-दिवस उगवला ते कुदशा तामसी निशा गेली ॥३४॥
गोपी उठोनि पाहे दिव्य स्वाकार शिबिर सुख लाहे ॥
शंभुपदीं शिर वाहे स्तवुनि ह्मणे निजजनांत शिर बा हे ॥ ३५॥
स्ववपु अपूर्व अपूर्व स्वसुत स्वभवन अपूर्व पाहोन ॥
गोपी निमग्न परमा-नंद-समुद्रीं मुहूर्त राहोन ॥ ३६ ॥
अति हर्षें कळवी तें सर्व महाश्चर्य वृत्त पुरपांतितें ॥
तें श्रवण करुनि घ्यावें ताडुनि तापें कधीं न उर पतितें ॥ ३७॥
नृप पूजा-नियमांतीं येउनि मानुनि लघुस्वभावातें ॥
त्या गोपिका-सुताच्या पाहे शिव-तोषण-प्रभावातें ॥ ३८ ॥
मणि-कनक-प्रासादीं मणिमय शिवलिंग देखतां हर्षें ॥
त्या भक्तवत्सलातें नमुनि प्रेमाश्रु भूप तो वर्षे ॥ ३९ ॥
आलिंगी त्या गोपी- तनुजा कवि चंद्रसेन गहिंवरुन ॥
ओवाळुनि बहु सांडी मणिमय रवि-चंद्रसे नगहि वरुन ॥ ४०॥
सपुरोहित सामात्य प्रेमें भेटुनि तया निवाला हो ॥
नृपति ह्मणे बापा तूं प्रिय गणपति हूनि बहु शिवाला हो ॥४१॥
वेष्टुनि पुरीस होते जे राजे मत्सरी तिमिर वीती ॥
ते साधु-चंद्रसेन-प्रीति-सुरभि-वत्सरीति मिरवीती ॥ ४२ ॥
दूतमुखें निर्वैर क्षितिप सकल दर्शनेच्छ जाणविले ॥
ते साधुचंद्रसेनें व्हाया जन्मुनि कृतार्थ आणविले ॥ ४३॥
न्यस्तायुध सर्व नृपति शशिसेनातें[1] करुनियां प्रणती ॥

[1] चंद्रसेननृतपितें.

गोपीचें दिव्यालय पाहुनि बहु धन्य धन्य ते ह्मणती ॥ ४४ ॥
त्या रत्न-प्रासादीं पाहुनि मणिलिंग भक्तिनें नमुनी ॥
मानिति गोपीतनया-हुनि अधिक ज्ञानशक्तितें न मुनी ॥४५॥
गोपसुता अनुसरले सर्व नृप नमुनि सभाजन कराया ॥
शिवरत सकळ वर ह्मणे अश्रेष्ठ न मुनिसभा जनकराया ॥५६॥
धन गोधन हय गज रथ वस्त्रें रत्नें समर्पुनि प्राज्य ॥
गोपकुमारासि दिलें गोपांचें भूपमंडळें राज्य ॥ ४७ ॥
तेथें हनुमान् प्रकटे वंदुनि पूजिति तयासि ते राजे ॥
गोपसुतातें प्रेमें आलिंगुनि तो वरासनीं साजे ॥ ४८ ॥
सर्वांसि ह्मणे परिसा गति शिवपूजे विना भवीं धन्या ॥
जीवांसि सर्व पातक वारुनि तारावया नसे अन्या ॥ ४९ ॥
पाहुनि शनि-प्रदोषीं शिवपूजन मंत्रहीन या बाळें ॥
केलें त्याचें हें फळ शिव इतरें होय काय गाबाळें ॥ ५० ॥
हा बल्लव-सुत-नामा श्रीकर याच्या कुळांत जो भावी ॥
तो अष्टम नंदाख्य त्रिजगीं तत्कीर्ति फार शोभावी ॥ ५१ ॥
कीं या पुण्यें त्याचा ब्रह्मादि-ध्येय जो सदानंद ॥
श्रीकृष्ण पुत्र होइल बहु सुख पावेल तो सदा नंद ॥ ५२ ॥
ऐसें सांगुनि झाला श्रीहनुमान् गुप्त मान्य जो शिवसा ॥
भजकांतें भव्यपदीं ह्मणतो ज्याचा प्रसाद-जोशि वसा ॥५३॥
शिवभक्त भूप झाले भक्तीं प्रभुचा प्रसाद पाहून ॥
गेला कांहीं काळ श्री-शिवभक्तां-समीप राहून ॥ ५४ ॥

---

१ पूजन.

हनुमत्-लोकाचारें तो श्रीकर चंद्रसेन ही युक्त ॥
श्री-शिवभजनीं च सदा होउनि दोघे हि जाहले मुक्त ॥९५॥
श्री-शंभुभक्ति-वर्धन अद्भुत आख्यान हें सदा गावें ॥
श्रीराम-सुत मयूरें वंदुनि संतांसि वर्णिलें भावें ॥ ९६ ॥

## अध्याय ६.

श्रीशंकर-प्रसाद प्रणताच्या उरु भवार्णवा[1] शुकवी[2] ॥
सर्व-प्रदोष-पूजा महातप असा नसे वदे सुकवी ॥ १ ॥
भगवान् प्रदोषसमयीं कैलासीं नाचतो सु-रस-दाता ॥
स्तविति प्रेमें वर्णिति योगींद्र सुरर्षि ही सुर सदा सा[3] ॥ २ ॥
शिवपूजन प्रदोषीं करितां ऋण रोग सर्व ताप सरे ॥
व्यापुनि संतां शिवकृपा जसि भाः[4] शशिकांत-पर्वता पसरे ३
जड मंदभाग्य दुर्मति नीच हि विपदर्णवीं[5] तरे सर्व ॥
करितां प्रदोषसमयीं पूजन होतो प्रसन्न बहु शर्व ॥ ४ ॥
या विषयीं इतिहास व्यास-कथित सर्व पाप वाराया ॥
परम समर्थ सुकृत-निधि परिसावा आपणासि ताराया ॥ ५॥
राजा विदर्भदेशीं होता प्रख्यात सत्यरथनामा ॥
ज्याचा गुणगण रुचला पुर-राष्ट्र-जनां मुलां जसा आमा[6]॥६॥
बहुकाळ प्रकृतींतें[7] रक्षुनि गुरु-सचिव-संमतें धर्में ॥
शर्म देता झाला श्रुतिविहितें करुनि समुचितें कर्में ॥ ७ ॥

---

१ मोठ्या संसारसमुद्रा. २ वाळवी, शुष्क करी. ३ साधूंना. ४ कांति. ५ विपत्-अर्णव. ६ स्तन. ७ प्रजांतें.

वेढुनि विदर्भनगरी त्यासि रणीं शाल्व जाहला मस्ति ॥
अरिसीं भांडत होता नगरी परि जाहली बहु व्यस्ति॥८॥
सत्यरथाची महिषी अंतर्वत्नी भयाकुला पुर तें ॥
सोडुनि रात्रि निघाली धैर्य तशा संकटीं कसें पुरतें॥९॥
पश्चिम दिशेसि दूर श्रांता साध्वी सरस्तटीं गेली ॥
हाय ह्मणत अतितप्ता वृक्षच्छायेंत गर्भिणी ठेली॥१०॥
त्या स्थानीं पुत्रातें सुमुहूर्तीं प्रसवली अतिश्रांता ॥
प्याया जळ जाय सरीं कीं होती जाहली तृषाक्रांता॥११॥
त्या राज्ञीतें सहसा ओढुनि ने ग्राह एक कांसारीं ॥
दुःसह दुःखें आलीं भेटाया राजबाळका सारीं॥१२॥
तो जातमात्र गत-पितृ-मातृक पावोनि फार आंबाळ ॥
क्षुद्विकळ रडत होता सरसस्तीरीं करूनि आ बाळ॥१३॥
तों विप्रस्त्री विधवा वर्षाचा सुत जिचा असी आली ॥
द्रवली उमाभिधा ती तो बाळ अनाथ पाहती झाली॥१४॥
हा हा गत-पितृ-मातृक सुंदर अच्छिन्न-नाभिनाल कसा ॥
शुचिकुलज असें कळतें जरि तरि परिपालितें स्वबाळकसा १५
चिंतेंत भिक्षु शिवसा दिवसाधिपसा च ये महातेजा ॥
शशिमंडळासि शिवती निवती डोळे तसे पहातें ज्या॥१६॥
श्रीभिक्षु उमेसि ह्मणे ब्राह्मण संशय नसो चि बाळा या ॥
ने स्वगृहासि स्तन्यें अन्नें हि स्व-सुततुल्य पाळा या॥१७॥
हित कथुनि जाय भिक्षु स्वगृहा हर्षोनि ने कुमारा हे ॥

---

१ गर्भिणी. २ सुसर. ३ सरोवरीं. ४ हाल. ५ दुग्धें.

पोषूनि एकचक्रीं भिक्षान्नें बाळयुग उमा राहे ॥ १८ ॥
प्रार्थुनि सद्विप्रांतें समयीं संस्कार ती उमा करवी ॥
दैव उपनयन होतां त्या दोघां भिक्षुवृत्तितें धरवी ॥ १९ ॥
बाळ-द्वय-सहित उमा विप्रा भिक्षा घरोघरीं मागे ॥
भागे बहु परि भांगा आलें जें तें करावया लागे ॥ २० ॥
ग्रामीं भिक्षा मागत बाळ-द्वय-युक्त ती उमा फिरली ॥
देव-नमस्कारार्थी द्विजसंकीर्णी शिवालयीं शिरली ॥ २१ ॥
शांडिल्य महर्षि तया सत्यरथसुता तथाविधा पाहे ॥
वाहे व्यथा ह्मणे अति गहना प्राक्कर्मगति खरी आहे ॥ २२ ॥
या ब्राह्मणीस माता मानितसे बंधु हा इच्या तनया ॥
ह्मणतो स्ववृत्ति भिक्षा तुमजे अंत्यंत-दुर्गता जन या ॥ २३ ॥
तें श्रवण करूनि उमा शांडिल्यातें ह्मणे अहो स्वामी ॥
हा बाळ भिक्षुवचनें म्या अविदित-कुळहि पोषिला धार्मी ॥ २४
कोणे वंशीं झाला हा बाळक कोण तात वद याचा ॥
याची माय कवण बा धीरें होतो कृतार्थ सदयाच्या ॥ २५ ॥
शांडिल्य ह्मणे याचा सत्यरथ विदर्भराज तो तात ॥
वधिला समरीं अरिनीं स्मरुनि जया साधु साऽश्रु होतात २६
याची सरांत माता नेली ओढूनि यम-सम-ग्राहें ॥
याचें दुःख श्रोत्यां दाविल सर्वत्र तम समग्रा हें ॥ २७ ॥
वंदुनि उमा ह्मणे बा कां मेळा भोग भोगितां राजा ॥

---

१ हिशाला. २ प्राक्-कर्म-गति-पूर्वकर्माची गति. ३ अत्यंत द-रिद्र्याला. ३ गृहीं.

त्याची जल पीतां कां नक्रें नेली सरोवरीं भोजा ॥ २८ ॥
या राजसुता आली जन्मा येतांचि कां दशा पापा ॥
तापा या निववाया सदुपायहि सांग वत्सला बापा ॥ २९ ॥
मुनिवर्य ह्मणे होता पूर्वभवीं पांड्यनृप विदर्भपती ॥
करितां प्रदोष-पूजन कोलाहल ऐकिला पुराअंतीं ॥ ३० ॥
त्यजुनि शिवार्चन नगर–क्षोभाची धरुनियां मनीं शंका ॥
गेला उठोनि पांड्य क्षितिपति जोडोनियां महापंका ॥ ३१ ॥
मंत्री धरुनि घेवुनि दारुण-सामंत-शत्रुला आला ॥
ऐसें समजुनि पांड्य प्रमुदित निज-विजय-वैभवें झाला ॥ ३२
शत्रु-शिर-च्छेदातें करवुनि शिवपूजनिं स्मृती ठेवी ॥
नेमसमाप्ति न करितां दैवें रात्रिं भ्रमोनि तो जेवी ॥ ३३ ॥
तैसाचि पांड्यसुत ही न करुनि पूजासमाप्ति करि भुक्ति ॥
उक्ति ब्राह्मणि सत्या नाहीं केलें न भोगितां मुक्ति ॥ ३४ ॥
जो पांड्य पूर्वजन्मीं या जन्मीं तो चि सत्यरथ जाला ॥
अरिनीं वधिला नाहीं कांहीं भोगोनि भोग जो घाला ॥ ३५ ॥
पांड्यत्वीं होता जो सत्यरथत्वींच तोचि हा तनय ॥
झाला दारिद्र्य या परि पूजाविघ्नें करून हात[3]–नय ॥ ३६ ॥
याची माता छद्में पूर्वभवीं निज-सपत्निला[1] मारी ॥
या स्तव नक्रें नेली या जन्मीं दुरित तें तिचें भारी ॥ ३७ ॥
कथिली विदर्भराज- प्रमुखांची म्या प्रवृत्ति हे सर्वा ॥
प्राणी दरिद्र होती ते जे प्रेमें न पूजिती शर्वा ॥ ३८ ॥

---

१ भार्या. २ नगरासमीप, ३ त्यक्तनय.

सत्य परलोक-हित जें सार उपनिषद्रहस्य[1] जें वदतों ॥
शिव-भजन असार भवीं सार मिळे सहज मुक्तिचें पद तों॥३९
पूजिति न जे प्रदोषीं शिव-पद-पद्में न वंदिती भावें ॥
श्रवण कथा हि न करिती सुदरिद्र तिहीं भवीं न कां व्हावें ४०
मर्त्य प्रदोषसमयीं पूजिति अत्यादरें शिवाला जे ॥
तद्विभवा अन्य-विभव बहु जेविं दिवाकरा दिवा लाजे॥ ४१ ॥
कैलासीं निज-भवनीं बसवुनि देवी वरासनीं नृत्य ॥
करितो शिव प्रदोषीं पार्श्वीं सुर शतमखादि जे भृत्य ॥४२॥
वाणी वींणा शतमख वेणु चतुर्वदन ताल वाजवितो ॥
श्रीपति मृदंग गाती श्रीरस तो मुक्तितें हि लाजवितो ॥४३॥
गंधर्व यक्ष खग फणि विद्याधर सिद्ध साध्य देववर ॥
सर्व प्रदोषकाळीं श्री-शिव-पार्श्वस्थ नम्र बद्धकर ॥ ४४॥
या स्तव शिव प्रदोषीं पूजावा हाचि आदरें एक ॥
सर्व प्रसन्न होती तरुमूळिं दिला जलादिकें सेक[2] ॥ ४५ ॥
तव सुत हि पूर्व जन्मीं नेता झाला प्रतिग्रहें चि वया ॥
उपजत दरिद्र या स्तव तारिल करितां चि भक्ति तो शिव बा ॥

---

## अध्याय ७.

श्री-शिव-पूजा-विधितें नमुनि पुसे ती उमा तितें विप्र ॥
शांडिल्य कथी जेणें व्हावा शिव सुप्रसन्नधी क्षिप्र ॥ १ ॥
ब्राह्मण-हत्या शत ही श्रीशिव-पूजा अशेष वारील ॥

---

१ उपनिषत्-रहस्य-उपनिषदांचें तात्पर्य. २ सिंचन. ३ त्वरित.

पापी शिवस्वहर्ता त्या एकाला चि हे' न तारील ॥ २ ॥
दोघां शिशूंसि पूजा-विधि तो कारुण्य-तोयराशि कवी ॥
व्हाया प्रसन्न सकला दीनांचा मुख्य सोयरा शिकवी ॥ ३ ॥
नमुनि उमा त्यासि ह्मणे बा आले शरण हे तुला बाळ ॥
माझा पुत्र शुचिव्रत नृपसुत हा धर्मगुप्त या पाळ ॥ ४ ॥
शिव-भजन-मंत्रविद्या त्या दोघांतें मुनींद्र तो सांगे ॥
सांत्वुनि ह्मणे उमेतें प्रभु न करिल सेवकीं कृपा कां गे ॥ ५ ॥
नमुनि प्रदक्षिण करुनि मुनिस सवाला उमा सती गेली ॥
त्या पासुनि प्रदोषीं शिवपूजा भक्तिनें तिहीं केली ॥ ६ ॥
करितां प्रदोष-पूजा मासचतुष्टय सनष्टचर्य सरे ॥
दोघांच्या हि मनांत प्रतिदिवसाधिक महेश-भक्ति भरे ॥ ७ ॥
द्विज-सुत एके दिवसीं स्नान कराया सरित्तटीं गेला ॥
तों त्या आप्तधना वरि भक्तधनानें प्रसाद हा केला ॥ ८ ॥
ढांसळल्या वप्राच्या गर्भीं पावे निधान-कुंभाला ॥
प्रभुची दृष्टि क्लेशा नुरवी महिषी जशी च शुंभाला ॥ ९ ॥
आणुनि निधान-पात्र स्वगृहीं मातेसि तें निवेदून ॥
बाळ शुचिव्रत केल्या भगवद्भजनें हि तो निवेदून ॥ १० ॥
माय ह्मणे घ्या दोघे वांटुन समभाग देवदत्त धन ॥
तत्सुत ह्मणे बरें परि न नृपसुताचें ह्मणे अवश्य मन ॥ ११ ॥
विटली उमा न नृप-सुत- साधुत्वें जरि हि लंघिला शब्द ॥
त्या उपरि करित असतां शिवपूजन एक लोटला अब्द ॥ १२ ॥

---

१ शिवपूजा, २ खंदकाच्या. ३ संतप्त.

द्विज-नृप-पुत्र वसंतीं क्रीडत होते वनांत तों धन्या ॥
दूरुनि विलोकिल्या बहु गंधर्वांच्या मनोरमा कन्या ॥ १३ ॥
विप्रसुत ह्मणे फिरतों स्त्रीसंदर्शन नव्हे उचित मातें ॥
पळविति विवेक वळविति भ्रमविति या तत्क्षणीं शुचितमातें ॥
मज मुख्य होय न मळों द्यावें स्वब्रह्मचर्य हें कार्य ॥
दर्शन परस्त्रियांचें परिहारिती जाण धर्म हे आर्य ॥ १५ ॥
ऐसें बोलुनि विप्र क्षिप्र चि परतोनि दूर तो राहे ॥
कुतुकें जाय पुढें नृप-सुत मुख्या कन्यका तया पाहे ॥ १६ ॥
पुष्पावचयच्छद्में ती सखियांतें वनांतरीं धाडी ॥
एकांतीं गांठि पुरुष-रत्नासीं अतिविचक्षणा पाडी ॥ १७ ॥
राजसुत निकट येतां दे उठुनि तयासि पल्लवासन ती ॥
चित्तें करी तयाला राधा त्या जेविं बल्लवांस नती ॥ १८ ॥
आधीं कुशल मग पुसे वृत्त तिला सर्व सुज्ञ-राय कवी ॥
स्वल्पाऽक्षर बव्हर्थं स्व-सकल-वृत्तांत तीस आयकवी ॥ १९ ॥
मग धर्मगुप्त हि पुसे सांगे निजवृत्त ती असें त्या कीं ॥
द्राविडकनामा आहे गंधर्वश्रेष्ठ मत्पिता नाकीं ॥ २० ॥
मज अंशुमती ह्मणती तुजसीं दवडूनि आलि बोलाया ॥
बसलें मी निज हृदया निववाया त्वत्स्वरूपवोला या ॥ २१ ॥

---

१ पुष्प-अवचय-छद्म-फुलें जमविण्याच्या कपटानें. २ गव-ळ्यास ( कृष्णास). ३ प्रणाम. ४, "स्वसकलवृत्तांत तूर्ण आयक-वी" असा हि पाठ आहे. ५ स्वर्गी. ६ सखी. ७ त्वत्-स्वरूप-ओल-तुझें उत्तमरूप नें तो च आर्द्रपणा त्याला.

मी संगीत-सुविद्या जाणतसें मन्मुखा कडे अमॅरी ॥
देखति बहुमानी गुण-निरता सौगंधिकां जशा भ्रमरी ॥ २२ ॥
सकळ-कळा-निपुणा मी सर्वजनेंगित सदा मला कळतें ॥
दैवें तुजसीं मजसीं संगति सत्प्रेम जें न तळमळतें ॥ २३ ॥
ऐसें वदे स्तनांतर-वर्ती माणिहार त्यासि दे हातें ॥
कळवी कृत संकल्पा अंशुमती द्यावया स्वदेहातें ॥ २४ ॥
नृपपुत्र ह्मणे झालिस सुदति मुदतिशयवती परि स्पष्ट ॥
कष्टग्रस्त असें मी गत-पितृ-मातृक नृपासन-भ्रष्ट ॥ २५ ॥
ऐसा हा विगत-विभव तुज योग्य वरावयासि कां गमला ॥
तप्तजनें सेवावा निष्पत्रच्छाय काय सांग मला ॥ २६ ॥
पितृ-शासन लंघाया तूं बाला पितृमती कसी उचिता ॥
स्वच्छंदाचरणानें राहे ना कुलज-कीर्तिची शुचिता ॥ २७ ॥
अंशुमती त्यासि ह्मणे कौतुक होतें पहा कसें आर्य ॥
प्रमुदित होतिल सत्वर सिद्धिस पावेल चिंतिलें कार्य ॥ २८ ॥
प्रातःकाळीं येथें यावें त्वां म्यां हि विहित-संकेतें ॥
स्वच्छंदाचरणाच्या चित्तांतुनि दूर करुनि शंकेतें ॥ २९ ॥
ऐसें सांगुनि गेली गंधर्वसुता स्व-तात-सदनातें ॥
नृपसुत शुचिव्रतातें कळवी वृत्त प्रसन्न-वदनातें ॥ ३० ॥
त्या वृत्तें धात्रीतें सुखवुनि दुसरे दिनीं तया स्थानीं ॥
नृपसुत शुचिव्रता सह जाय धरुनि ती वरांगना ध्यानीं ॥ ३१ ॥

---

१ देवांगना. २ नामविशेष ( कमळ ) त्याला. ३ सर्व-जन. इगित-सर्व जनाचा आशय. ४ मुत्-अतिशयवती, आनंदातिशयवती.

गंधर्वेश्वर-सहिता अंशुमती तेथ देखिली हो ती ॥
जी व्यक्त हृदय-फलकीं प्रथम पहातां चि रेखिली होती ॥ ३२
गंधर्वेश्वर मुखवुनि दोघांतें उत्तमासनीं स्थापी ॥
राजसुतासि ह्मणे बा कर्णाहीं वाक्-सुधा रसा या पी ॥ ३३ ॥
नृपपुत्रा कैलासीं पूर्व दिनीं शंभुदास हा गेला ॥
केला प्रसाद-पात्र प्रभुनें वंदन करूनि जो ठेला ॥ ३४ ॥
गंधर्वेंद्रा क्षितिवरि नृपनंदन धर्मगुप्त या नांवें ॥
मद्भजनीं तत्प्रेम ध्रुवशिशुचें जेविं तेविं वानावें ॥ ३५ ॥
गत-पितृ-मातृक अरि-हृत-राज्य आकिंचन सदा मला भजतो ॥
तत्पितर मुक्त झाले परिपाल्य प्रिय तनूजसा मज तो ॥ ३६ ॥
तत्साहाय्य करीं तो मर्दुनि सकला अरींस हो राजा ॥
जयदा माझी आज्ञा अधिक नसे या परीस होरीं जा ॥ ३७ ॥
ऐसी आज्ञा होतां मी नमुनि त्रिपुर-काम-कदनातें ॥
कैलासा हुनि आलों त्वत्कार्योत्कंठित स्व-सदनातें ॥ ३८ ॥
तों या कन्येनें ही केली मत्प्रार्थना पुरुषरत्ना ॥
देतों मी हे आधीं मग राज्यश्री तुला करुनि यत्ना ॥ ३९ ॥
स्व पुरीं अंशुमतीसीं वर्षायुत भोग भोगुनि प्राज्य ॥
श्रीशिव लोकीं वससी धर्मन्यायें करूनि तूं राज्य ॥ ४० ॥
या परि बोलुनि विधिनें दे हा गंधर्वराज कन्या या ॥
धन्या यागादि महा-धर्म जसा चित्तशुद्धिस न्याया ॥ ४१ ॥
चंद्रप्रभ चूडामणि मुक्तामणि-हार वर अलंकार ॥
सारस्वर्ण-परिच्छद दे दिव्यें अंबरें तया फार ॥ ४२ ॥

---

१ मुहूर्त.

गज अयुत नियुत वाजी कांचन-रथ बहु सहस्र दे त्यातें ॥
दिव्य स्यंदन हि दिला पात्राऽर्पित बहु गमे न दे त्यातें ॥ ४३॥
शक्रायुध-सम कार्मुक शस्त्रास्त्रें बहुसहस्र जे भाते ॥
पूर्ण शराऽभेद्य कवच दे शक्ति हि जे धरी मेहें भाते ॥ ४४॥
दिधल्या सहस्र कन्या निज-दुहितेची करावया सेवा ॥
देउनि विविध धन ह्मणे तो पावो हें महेश्वरा देवा ॥ ४५॥
तत्साहित्य कराया दिधलें गंधर्व-सैन्य चतुरंग ॥
वश असतां वेगलिता तो सागर जन महेभ न तुरंग ॥ ४६॥
शिव-भक्त नृप-सुतासीं लावुनि सुख-कीर्ति-कारि नव नातें ॥
बसुनि विमानीं गेला तो गंधर्वेश्वर स्व-भवनातें ॥ ४७॥
प्रमुदित शिव-प्रसादें झाला तो धर्मगुप्त मग अरिला ।
मारुनि निज-पद साधी जो कीर्ति-श्री तिहीं सुचिर वरिला ॥४८॥
करितां राज्य स्वपुरीं स्वसम चि केला शुचिव्रत भ्राता ॥
मातासी च उमा ती हर्षविली जी हरी श्रमव्राता ॥ ४९ ॥
श्रीशंभुतें प्रदोषीं आराधुनि धर्मगुप्त तो तरला ॥
अन्य हि तरेल या परि शिव-भजनीं पळ हि मति न हो तरला॥
आराधिला प्रदोषीं श्रीशिव होऊनि सादर जनांहीं ॥
त्यांचें करितें स्पर्शुनि जगदघ तत्काळ पाद-रज नाहीं ॥ ५१ ॥
हे सत्कथा यथामति रामसुतें लिहुनि वाहिली देवा ॥
प्रभुचा प्रसाद व्हाया बुध ह्मणती हे चि बहु बरी सेवा ॥५२॥

---

१ उत्सवानें. २ तेज. ३ आपल्या कन्येची. ४ श्रमसमूहा.
५ चंचला. ६ जगत्- अघ-जगाचें पाप.

## अध्याय ८.

श्रीशिव पूजा नियमें संतत जी सोमवासरीं केली ॥
ती तप्ता जीवातें निववित जैसी सुधारसीं भेली ॥ १ ॥
बटुं कीं गृहस्थ नारी सधवा विधवा कुमारिका तरती ॥
संसार-ताप सर्व हि शशि-वासर-कृत-शिवार्चनें सरती ॥ २ ॥
आर्यावर्तीं होता श्रीहरि-हर-भक्त साधु भूभर्ता ॥
प्रख्यात चित्रवर्मा या नामें शत्रु-संपदा-हर्ता ॥ ३ ॥
सुत-रत्नातें पावे परि तो संतत ह्मगे मला धन्या ॥
कन्या व्हावी देवा या संसारीं स्पृहा नसे अन्या ॥ ४ ॥
श्रीहरि-हर-प्रसादें झाली चिरचिंतिता अपांतनया ॥
ब्राह्मण-पूजन-सक्ता हरि-हर-भक्ता तया नृपा तनया ॥५॥
हिमगिरि जसा उमेतें हर्षें पावोनि भूप मुलगीतें ॥
कन्यारत्नें हि निवे साधुयशें जेविं साधु-कुल-गीतें ॥ ६ ॥
संस्कार करुनि ठेवी तीचें सीमंतिनी असें नाम ॥
त्याच्या होता कन्या-दानाचा मानसीं महाकाम ॥ ७ ॥
एके दिवसीं राजा द्विज जातक-लक्षण-ज्ञ आणून ॥
त्यांतें पुसे मुलीचें सांगा स्वामी भविष्य जाणून ॥ ८ ॥
एक बहुज्ञ मुनि ह्मणे नामें सीमंतिनी तुझी कन्या ॥
मंगलवती उमा जसि दमयंती तेविं रूपिणी धन्या ॥ ९ ॥

---

१ गुऱ्हाचे ढेपीचा तुकडा. २ ब्रह्मचारी. ३ नामविशेष ( विंध्य आणि हिमाळयां मधील प्रदेशीं ). ४ इच्छा. ५ नाहीं ट्याकिळी नीति जिणें असी.

होइल सु-कलाभिज्ञा हे साक्षात् भारतीतसी[1] दुहिता ॥
लक्ष्मीतसी महा-गुण-गण-संपन्ना कुलद्वयेन्दुहिता[2] ॥ १० ॥
अदिति तसि सुप्रजा हे संतत हि धृतव्रता जसी सीता[3] ॥
रविरुचि तसि प्रकाशें चित्त हरी चंद्रिका तसी सीता[4] ॥११॥
नांदेल अयुतवर्षें पतिसह होतील सुत इला अष्ट ॥
कष्ट प्रेक्षील न हे कन्या पावेल बहु सुख स्पष्ट ॥ १२ ॥
ऐसें ऐकुनि राजा दे वस्त्रें भूषणें विपुल वित्तें ॥
पूजी सद्विप्रातें वंदुनि अत्यादरें मुदित-चित्तें ॥ १३ ॥
अन्य मुनि ह्मणे राजा व्हाया कर्णासि हर्ष च वदावें ॥
परि विधवा होइल हे होतां चि प्राप्त वर्ष चवदावें ॥ १४ ॥
तें ऐकुनि नृप झाला चिंताव्याकुल मुहूर्त तो भ्याला ॥
त्या मोहीं कन्येचा घात श्रीचा जसा चि लोभ्याला ॥१५॥
विप्रातें विप्राऽनुग[5] तो राजा नमुनि दे निरोपातें ॥
ते वदले हा ब्राह्मण-भक्त न चिंतार्णवीं विरो पातें[6] ॥ १६ ॥
सर्व हि दैववश असें मानुनि निश्चिंत भूप तो होय ॥
तापे बहुत परि निवे सुज्ञाचें हृदय तें जसें तोय ॥ १७ ॥
परिसुनि निज-वैधव्य स्व-सखी-वदनें विशैशवा[7] बाला ॥
बोलाया लागे ती लावी तो दोष आपुल्या भाला ॥ १८ ॥
पावुनि निर्वेद तिणें जावुनियां शरण विनविली आर्या ॥

---

१ सरस्वतीसी. २ कुल-द्वय-इंदु-हिता-बाबाचें व आपलें जें कुलद्वय तो च चंद्र त्याची हितकर्त्री. ३ जानकी. ४ थंड असी. ५ ब्राह्मणसेवक ६ पतनानें. ७ गेलें शिशुत्व जिचें असी.

श्रीयाज्ञवल्क्य मुनिची श्रीमैत्रेयी महासती भार्या ॥ १९ ॥
माते सांगावें मज जेणें सौभाग्य-वृद्धि तें कर्म ॥
धर्मज्ञे उपदेशुनि हित या निजकन्यकेशि दे शर्म ॥ २० ॥
सीमंतिनी असें जें चरणीं घालूनियां मिठी वदली ॥
पदलीने वरि करुणा- कर्पूराची द्रवे सती कदली ॥ २१ ॥
मैत्रेयी तीस ह्मणे जा शिवयुक्ताऽम्बिकेसि तूं शरण ॥
श्री-गौरी-हर-पूजा शशिवारीं नित्य करित जा स्मरण ॥
प्रातःस्नान उपोषण करुनि पुन्हा स्नान विरज वस्त्र धरीं ॥
मौन वरीं शिव-पूजा होउनि निश्चल-विशुद्ध-बुद्धि करीं ॥ २३॥
करुनि ब्राह्मण-भोजन मग आपण शेष अन्न भक्षावें ॥
साम्ब प्रसन्न होइल सुव्रत हें बहु जपोनि रक्षावें ॥ २४ ॥
पापक्षय अभिषेकें साम्राज्य हि पीठ-पूजनें लाहे ॥
सौभाग्य सर्व सौख्य हि गंधाक्षत माल्य अर्पित। आहे ॥२५॥
धूपें सौगंध्य मिळे दीपातें कांति जे महाभोग ॥
ते नैवेद्यें मिळती श्री-शिव-पूजा असा नसे योग ॥ २६ ॥
ताम्बूलार्चन-दानें लक्ष्मी-धर्मार्थ-मोक्ष जे काय ॥
त्यांचें साधन वत्से वंदावे साम्ब-मूर्तिचे पाय ॥ २७ ॥
पंचाक्षर-जप-साधक अष्टैश्वर्यादि सिद्धि ज्या यांचा ॥
होम मनोहर भर्ता त्या काम-समृद्धिरूप-जायांचा ॥ २८ ॥
वत्से सर्व-सुरांतें होतो बहु विप्र-भोजनें तोष ॥
नासे चि सोमवारीं सर्व श्री-सोम-पूजनें दोष ॥ २९ ॥

---

१ सुख. २ शुद्ध. ३ संतोष. ४ कन्यानीं.

शिव-पूजन-प्रभावें तरशिल भवसिंधु शक्य जें मुलिनीं ॥
तें कथिलें सिद्धि सदा लोळति भव-भक्ति-सुरसरित्-पुलिनीं ॥
या परि सत्युपदेशें नृपजा करि साम्ब-पूजनारंभा ॥
ज्याची स्मृति हि अलभ्या दुर्दैवां भूजनां जसी रंभा ॥ ३१॥
पुण्यश्लोक-नळाचा सुत नामें इंद्रसेन तत्तनय ॥
चंद्रांगद आल्हाद- प्रद जो सर्वांसि जेविं दत्त नय ॥ ३२ ॥
तो भूप चित्रवर्मा देती सीमंतिनी निजा तनया ॥
अनयाऽधर्म-पराङ्मुख- चित्ता बहु मानिती महाजन या ३३
त्या उत्सवांत झालें सुख बहुत चि सर्व-भूप-समवाया ॥
कवि ह्मणति रति-स्मर ते अवतरले लोक-दृष्टि रमवाया ॥३४
तो चंद्रांगद कांहीं- काल निज-श्वशुर-मंदिरीं राहे ॥
साधी विश्वास हि ती बाळा सीमंतिनी मनीं वाहे ॥ ३५ ॥
तें रिवरि चढुनि क्रीडे यमुनेंत सजूनि मित्र-वर्गातें ॥
नौके सहित बुडे तो निंदाया जड जनांत भंर्गातें ॥ ३६ ॥
असु-गण चि तो बुडाला सहसा सह-चित्रवर्म-लोकांचा ॥
कवि ह्मणति सार्वभौमचि झाला हा शोक सर्व-क्लेशांचा २७॥
त्या वार्तेनें मूर्च्छित पडली सीमंतिनी जसी कदली ॥
माता सखिया हि तिच्या किंबहुना हाँ असें पुरी वदली॥३८॥
तो इंद्रसेन ऐकुनि पुत्राची परम दुःसहा वार्ता ॥
रडला मूर्छित पडला बहुशोकें होय तत्पुरी आर्ता ॥ ३९ ॥

---

१ सर्व राजसमुदाया. २ नौकेवर. ३ शिवातें. ४ हाय. ५ पीडिता.

कन्येसि चित्रवर्मा नानायत्नें करूनि समजावी ॥
गुरु-संकोचें न रडे कैसी लंघूनि शोक-तम जावी ॥ ४० ॥
राजा जामाताची प्रार्थुनि तद्बांधव क्रिया करवी ॥
सीमंतिनी शिवाची तैशा शोकीं हि चालवी बरवी ॥ ४१ ॥
त्या दुःसह-सुत-शोकें सर्व हि होता प्रताप तो हरिला ॥
नृप इंद्रसेन सहसा दायादांनीं सदार ही धरिला ॥ ४२ ॥
त्यातें देते झाले दायाद करूनि बंध कारा[१] ते ॥
वदले साधु उपेक्षा कैसी करितोसि अंधकारा[२] ते ॥ ४३ ॥
यमुनाजळीं बुडाला चंद्रांगद जो तयासि पाहून ॥
घेउनि गेल्या उरगी पाताळीं हार तेविं वाहून ॥ ४४ ॥
देवेश्वर-मंदिरसें कांचन-मणि-रचित नागपुर पाहे ॥
तो जोडुनि हस्त उभा सर्पेश्वर-तक्षका पुढें राहे ॥ ४५ ॥
आला कुमार कोठुनि कोणाचा कोण हा असें भर्ता ॥
सर्पांचा तक्षक तो पुसता झाला स्वयें कृपाकर्ता ॥ ४६ ॥
उरगी वदल्या निज-पद-पदका पासूनि सुमणि हा ढळला ॥
क्रीडा करितां आह्मां कालिंदीच्या[३] जळांत आढळला ॥४७॥
कुळनाम सांग ऐसें अभयद फणिपाल तक्षक विचारी ॥
त्यातें स्ववृत्त मौक्तिक जैसें हंसासि दक्ष कवि चारी ॥ ४८ ॥
पुण्यश्लोक निषध-पति नळ तत्सुत इंद्रसेन या नावें ॥
तत्सुत चंद्रांगद मी त्वां ही धर्में तसें चि मानावें ॥ ४९ ॥
क्रीडा करितां झालों यमुना-नीरांत मग्न पारि[४] साचें ॥

---

१ बंदिशाळा. २ हे शंभो. ३ यमुनेच्या. ४ भक्षण करवी.

आलें धन्यत्व तुझें देणें लोहासि जेविं परिसाचें ॥ ५० ॥
पुसिलें मद्वृत्त मज श्रवण हि तें सांगतों स्वयें केलें ॥
झालों धन्य चि दुःख न कोणाचें मद्दनुग्रहें गेलें ॥ ५१ ॥
त्या सूक्तें धैर्यगुणें होवुनि परम प्रसन्न तो डोले ॥
तक्षक आराध्य पुसे चंद्रांगद तेधवां असें बोले ॥ ५२ ॥
नागेंद्रा मद्वंशीं आराध्य श्रीसदाशिव स्वामी ॥
बा मी बहु काय वदों जिव्हा प्रभुच्या चि रंगली नामीं॥ ५३ ॥
तक्षक ह्मणे सुकुलजा जाणसि पर शैव तत्व तूं धन्य ॥
झालों प्रसन्न पाहुनि तुज तुज सम नर न देखिला अन्य ॥ ५४ ॥
रविसम मणि या लोकीं मणि-कांचन-मंदिरें सुधांवापी ॥
येथें हे कल्पद्रुम सुकृती येथें वसे नसे पापी ॥ ५५ ॥
येथें मृत्यु-भय नसे रोग जरा-स्पर्श या नसे लोकीं ॥
येथें स्त्रिया सुरुचिरा न बुडे स्वप्नीं हि या स्थळीं शोकीं ॥ ५६ ॥
या रत्नमय स्थानीं भोगित सुखभोग जेविं देव रहा ॥
झालों परम तव सखा जाण शचीचा सभाग्य देवर हा ॥ ५७ ॥
नृपसुत ह्मणे अहींद्रा शिव-भक्ता वंशजा वधू आहे ॥
साहे विरहा न सती कांत-रहित विश्व शून्य कीं पाहे ॥ ५८ ॥
प्रिय एक चि मी झालों प्राणादि पदार्थ नावडे इतर ॥
समजुनि मृत पुत्र कसे मज वांचुनि वांचतील ते पितर ॥ ५९ ॥
ठेवुनि माथां सदया फिरवुनि करपद्म पाठिवर हा या ॥
लोका हुनि नरलोकीं आमांचे प्राण पाठिव रहाया ॥ ६० ॥

१ अमृताच्या तळ्या.

द्रवला तक्षक आज्ञा करि सत्काराचयास कन्या तें ॥
त्याचें पूजन केलें स्वर्गीं जें प्राप्त होय धन्यातें ॥ ६१ ॥
न्हाणुनि सागररामें चर्चुनि कल्पद्रुमोद्भवें सुरसें ॥
अन्नें सुतृप्त केला त्या अहिपुर होय विष्णुचें पुरसें ॥ ६२ ॥
उत्तम वस्त्रें उत्तम रत्नाऽलंकार यास दे हातें ॥
तक्षक लक्ष-कवि-सुता तो शोभवि शिवाचि दास देहातें ॥
कामग तुरंग दे वर-वस्त्रांचा राशि अष्ट मणिभार ॥
वाहक-रक्षक संगें एक फणिकुमार चतुर जो फार ॥ ६४ ॥
स्मरतां भेटेन असा वर देवुनि दे निरोप मग यातें ॥
नमुनि निघे चंद्रांगद यश मिरवी शंभुभक्ति न गया तें ॥ ६५ ॥
यमुना-जळांत जेथें झाला होता निमग्न तो वीर ॥
चंद्रांगद तेथून चि बाहेर निघोनि पावला तीर ॥ ६६ ॥
हय फेरित होता जों तों घेवुनियां समागमें आळी ॥
तीं वर्षांनीं स्नाना-करितां सीमंतिनी सती आली ॥ ६७ ॥
सीमंतिनी अकस्मात् दिव्याऽलंकार-गंध-धर पाहे ॥
राहे चकित म्हणे हा कोण परम रुचिर पुरुषवर आहे ॥ ६८ ॥
ओळखिली नळगोत्रें जरि ही सौभाग्य-भूषणें हीना ॥
ती नाथापरि नेणे अतिरोदन-मंद-दृक् प्रभा-हीना ॥ ६९ ॥
सीमंतिनी-निकट तो येउनि हरिवरुनि उतरला पुलिनीं ॥
बसुनि जवळ बसवि तिला सचकित होऊनि पाहिला मुलिनीं ॥
तीस पुसे कोणाची स्त्री कन्या नाम काय शोकाचें ॥

---

१ तक्षकातें. २ सखी. ३ घोड्यावरून. ४ वाळवंटीं.

लक्षण बाळपणीं कां हें गरळ चि होय आप्त लोकाचें ॥ ७१॥
ऐसें स्नेहें पुसतां साश्रुमुखी लाजली कथायाला ॥
सांगे न करुनि विस्तर सुमति तिची प्रियसखी कथा याला॥७२
दुःख तिचें श्वशुराचें केवळ दुःसह अशेष आयकवी ॥
न उरायाचें जरि तें तरि तेव्हां तो ह्मणे चि हाय कवी॥७३॥
आयकिलें शिव-पूजा-व्रत न त्यजिलें असें तिचें उक्त ॥
चित्तांत मृत्युपाशा पासुनि केलें इणें ह्मणे मुक्त ॥ ७४ ॥
सीमंतिनी ह्मणे प्रिय-दर्शन तूं कोण मनुज कीं देही ॥
स्मर मज गमसी साधो पुरुषवरा पूर्वदृष्ट हा स्नेही ॥ ७५ ॥
इतुकें बोलोनि सुचिर शोकार्ता राजनंदिनी रडली ॥
सांवरिली सखियांनीं मोहभरें सुतनु जेधवां पडली ॥ ७६ ॥
सांत्वन अति निपुणपणें करुनि ह्मणे न वद सर्वदा साहें ॥
पुससी कोण ह्मणुनि जरि तरि कामग सिद्ध देव मी आहें ७७
कर धरुनि बळें ओढी तों पाणिग्रहण-शंकिता झाली ॥
ल्याली रोमांचातें हस्त-स्पर्शामृतें सती धाली ॥ ७८ ॥
कर्णीं सांगे त्वत्पति चद्रांगद देखिला सखा मम तो ॥
गतकांति त्वद्विरहें रात्रि-वियोगें शशी तसा गमतो ॥७९ ॥
भेटेल क्षिप्र तुला तेणें तव उग्र दुःख आठविलें ॥
देवि तुज कडे मातें त्वत्ताप-निवारणार्थ पाठविलें ॥ ८० ॥
येथें संदेह तुवां न धरावा सत्य हें न पथकरितों ॥
लटिकें सति मी श्री-शिव-चरणाचा ही पहा शपथ करितों ॥८१
तों वरि न प्रकटावें मद्वाक्य मनीं च तूं असों दे हें ॥
विश्रांत यशोरूपें कोठुनि आह्मीं तुह्मीं वसों देहें ॥ ८२ ॥

वाक्य सुधावर्षाहुनि समधिक सीमंतिनीस तें वाटे ॥
आटे शोक समग्र ब्रह्मांडीं हर्ष तत्क्षणीं दाटे ॥ ८३ ॥
वारंवार प्रेमें पाहे चंद्रांगदाकडे चि सती ॥
तीस तसि पूर्वदृष्टें सिद्ध शरीरांत लक्षणें दिसती ॥८४ ॥
वय तेंचि वर्ण तोचि स्वर तोची सुरतिही पहाण्याची ॥
हाचि तिला स्वपति गमे जाणे मति परिचिता शहाण्याची ॥८५॥
स्वमनांत ह्मणे माझें या नरग्त्नींच लागलें चक्षू ॥
मज वाटतसे प्रेमें सादर ऐसें चि यास हें लक्षू ॥ ८६ ॥
धरुनि स्वरूप आला परलोकाहूनि काय हा कान्त ॥
परि दुर्भगेसि ऐसा झाला च कधीं नसेल शोकांत ॥८७ ॥
स्वप्न नव्हे भ्रम हि नव्हे गंधर्वादिक असेल हा धूर्त ॥
आला मज ताराया मैत्रेयीचा प्रसाद कीं मूर्त ॥८८ ॥
तो सत्य काय वदला द्विज जातक-लक्षण-ज्ञ जो पहिला ॥
न कळे प्रभु-चरित करी लीलेनें रत्नहार तो अहिला ॥ ८९ ॥
बहु वाम-बाहु-नेत्र- स्फुरणादिक विविध दिनिं दिनिं स्पष्ट ॥
मंगल-निमित्त दिसतें याच्या जावेचि दर्शनीं कष्ट ॥ ९० ॥
शंभु[1] प्रसन्न होतां प्राण्यास असाध्य मुक्ति ही नाहीं ॥
मग नवल काय बहु जरि अनुभविली भुक्ति मुक्ति ही नाहीं ॥९१॥
ऐसें बहुधा चिंतुनि सुमति पुन्हा मुक्त- संशया झाली ॥
लज्जा-भर-नम्र-मुखी पडुनि सुखामाजि आलिही घाली ॥९२॥
तो तत्क्षणांत पुन्हा सांगे शोकार्त पितर जिवत्राया ॥

---

१ प्रभु.

जातों साध्वि तुज तुजा शीघ्रचि भेटेल कांत निव्रवाया॥९३॥
या परि भेटुनि बोलुनि गेला अश्वीं बसोनि कामगमीं॥
तो चि बहु विनोद करी अजि कां न ह्मणो असो निका मग मी ९४
स्वपुरोपवनीं उतरे चंद्रांगद नत करावया द्वेषी॥
त्या नागकुमारातें कळवाया स्वप्रताप तो प्रेषी॥ ९५॥
फणिपुत्र ह्मणे जोडा कर आधीं इंद्रसेन नृप सोडा॥
आला चंद्रांगद या विनवा अपराध हा नव्हे थोडा॥ ९६॥
यमुने माजि बुडाला तो आला तक्षकालया हून॥
हा शिवभक्त ह्मणा न क्षमं संहृति-दक्ष काळ या हून॥ ९७॥
चंद्रांगद आला हें कळवी फणिपुत्र इंद्रसेनातें॥
जे नातें सांबपदीं लाविति त्यां काय काय देना तें॥ ९८॥
बहु साधु साधु वदले ग्याले जरि परम दुष्ट ही अरि ते॥
न रिते पडतील कसे शिव-भक्त-स्वापहार जे करिते॥ ९९॥
पौर प्रधान गेले सपुरोहित उपवनासि आणाया॥
चंद्रांगदासि भेटति निज-शोकद्रुम समूळ खाणाया॥ १००॥
सत्कारुनि हर्षभरें बहुतचि विनवीत जलधिवसनेला॥
तो चंद्रांगद नगरीं जाणों धृतमूर्ति अमृतरस नेला॥ १०१॥
बहु इंद्रसेन हर्षे न शके तनयासि ओळखायाला॥
माय हि जीस उरक्षत जाया लागे न बोळ खायाला॥ १०२॥
राजा ह्मणे सुनेच्या सुकृतें तरलों नसे दुजा हेतु॥

---

१ मनास वाटेल तिकडे जाणारा. २ स्व-पुर-उपवन-आपल्या घरा जवळील बागेंत. ३ समर्थ. ४ संहारदक्ष. ५ पृथ्वीला.

जें भव्य सोमवार-व्रत तें या शोकसागरीं सेतु ॥ १०३ ॥
हें वार्तामृत धाडी त्याला होता करून आ व्याही ॥
जो भूप चित्रवर्मा मानी स्वाधिक ।तस आंव्याही ॥ १०४ ॥
सीमंतिनी-पिता दे स्वसभाऽलंकारराशि जासूदा ॥
स्वमुखें ह्मणे मम-कनक-पात्रांतचि वाढ यासि जा सूदा । १०५ ॥
सर्व हि सुकविजन तया वर्णुनि निःसीमउद्धवास वदे ॥
कोणी ह्मणति प्रकटुनि आनंद असाचि शुद्ध वासव दे ॥ १०६ ॥
मातांचा सखियांचा पुरवनितांचा प्रमोद-अर्णव तो ॥
मग त्या राजसुतेचा मज ऐसा कवि स काय वर्णवतो ॥ १०७ ॥
सीमंतिनीस लाविति कुंकुम घाली गिँयालि नथ नाकीं ॥
कोणी वेणी कज्जल गाती देवर्षि चित्ररथ नाकीं ॥ १०८ ॥
तो नृपति चित्रवर्मा स्वपुरातें आणवुनि तया धन्या ॥
चंद्रांगदासि देता झाला विधिनें महोत्सवें कन्या ॥ १०९ ॥
चंद्रांगदें सुवस्त्रें देव-द्रुम-पुष्प-भूषणें भव्यें ॥
अम्लानें बहुवर्णें नानाश्चर्यप्रदें सदाभव्यें ॥ ११० ॥
रत्नाऽलंकार-शतें तक्षक-दत्तें स्वयें चि शोभविली ॥
दयिता महांगरागें दशयोजनगेंहि फार लोभविली ॥ १११ ॥
दे भूप चित्रवर्मा जाया स्वपुरा सदार आज्ञा त्या ॥
निववुनि सर्वांसि निघे प्रेमें वंदुनि पुसोनियां ज्ञात्या ॥ ११२ ॥

---

१ घागरी मडकीं इत्यादि भाजण्या साठीं जी भट्टी लावितात त्याला हि. २ सैंपाक्या. ३ मर्यादारहित उत्सवास. ४ प्रियसखी. ५ स्वर्गीं. ६ सर्वदा कल्याणदायकें.

पुत्रासि राज्य देउनि गिरिशातें इंद्रसेन तो भावें ॥
मुक्त भजुनि होय प्रभु-भजनें विश्वांत सुयश शोभावें ॥ ११३ ॥
अष्ट सुत प्रसवे सुख भोगी सीमंतिनी अयुतवर्षे ॥
शिवलोकीं जाय भजुनि पतिसह परमेश्वरासि बहुहर्षे ॥ ११४
लिहिली कथा यथामति हे श्रीरामात्मजें अघ सराया ॥
अत्युच्चपदापासुनि गातां जन ही कधीं न घसराया ॥ ११५ ॥

---

## अध्याय ९.

श्री शिव-कीर्त्यमृत-रसीं वाढाया सर्वदा रुचि तगाया ॥
बहु हा हि सोमवार-व्रत-महिमा कविजना उचित गाया ॥१॥
होते विदर्भदेशीं सारस्वत वेदमित्र या नावें ॥
ज्यां श्रुति-शास्त्र-ज्ञांते बहु धन्य असें सभेंत वानावें ॥ २ ॥
ते परम सखे दोघे झाले दोघांसि आत्मभव दोन ॥
हे हि सखे प्रकटिति गुण वृत्तें घि मुखें स्वरूप न वदोन ॥३॥
श्रुतिमित्र-सुत सुमेधा सारस्वत-पुत्र सामवान् सुकवी ॥
षोडशवर्षांचे परि वेदीं शास्त्रीं न पर जयां चुकवी ॥ ४ ॥
वदले तात तयांतें सुखवूनि विदर्भ-राज-चित्तातें ॥
जा स्वविवाहाकरितां संपादा तूर्ण पूर्ण-वित्तातें ॥ ५ ॥
तातातें वंदुनि ते वित्तार्थी त्या विदर्भ-भूपातें ॥
जाउनि भेटति दोघे त्या पांथीं पांथ जेंवि कूपातें ॥ ६ ॥
तोषवुनि स्वगुणांहीं धन नाहीं संग्रहीं विवाहातें ॥

---

१ उदकीं.

स्वाशय दाविति शब्दें अर्थ जसा धरुनियां दिवा हातें ॥७॥
स्मित करुनि वदे राजा जाणावें लोक-तत्व या भावें ॥
बुध हो कथितों ऐका युक्ति जिणें वित्त विपुल लाभावें ॥८॥
एकें वेष धरावा स्त्रीचा होऊनि दंपती जावें ॥
सीमंतिनी करितसे मिथुनार्चा सोमवासरीं भावें ॥ ९ ॥
निषधेश्वर चंद्रांगद त्याची सीमंतिनी भली भार्या ॥
करिती दंपत्यर्चन रत्नालंकार वाहती आर्या ॥ १० ॥
विप्र ह्मणति अनुचित हें शुद्धांस चि सेव्य नृपतिचें सद्म ॥
कुष्ठ जसें रूपातें प्रकटुनि दूषील सद्यश छद्म ॥ ११ ॥
भय-पाप-वैर-निंदा-पात्र च्छद्में प्रवर्ततां होतो ॥
जो धूर्त श्लाघ्य कुपथ कुलजा होईल मान्य कां हो तो ॥१२॥
भूप ह्मणे देव पितर गुरु पृथ्वीपति समर्थ हे चवघे ॥
लोकीं अलंघ्य-शासन भय देती उक्त न करितां अवघे ॥१३॥
अविलंबित कथित करा प्राप्त असे अन्यथा भय व्यक्त ॥
शुभ अशुभ हि ऐकावें आह्मी राजे प्रजा तुह्मी भक्त ॥ १४॥
या नृप वचनें झाले ते साधुस मान्य बाल-कवि याला ॥
ह्मणती आवश्यक कीं सत्यचि सम भूमि पालक त्रियांला ॥ १५॥
स्त्रीवेष भूप दे जो सारस्वत-पुत्र सामवान् यातें ॥
स्तन केश करी कृत्रिम लावी कज्जल हि वृद्ध मान्या तें॥ १६॥
द्विजसुत सुंदर होता स्त्रीवेष दिला विचक्षणें भूपें ॥
प्रौढांगना हि त्याच्या त्या भव्यें मोह पावल्या रूपें ॥ १७॥

---

१ कपट. २ प्रसवला ( बाप इत्यादि ).

या मजकडे चि आधीं ऐसें शिकवुनि विदर्भ-भूपानें ॥
सीमंतिनीकडे ते पाठविले दंपती-स्वरूपानें ॥१८॥
होयिल तें हो ऐसें चिंतुनि ते निषधपति-पुरा गेले ॥
या परि विदर्भपतिनें वश विधिनें विप्रसुत सुकवि केले ॥ १९ ॥
सस्त्रीक ब्राह्मण जे त्यांसह शिरले नृपालयीं क्षिप्र ॥
सीमंतिनी समर्ची सद्विधिनें सोमवासरीं विप्र ॥ २० ॥
बहु मेहुणें खरीं जीं त्यांत चि ते दंपती स्वयें पाहे ॥
स्मित करुनि सांब शिव या भावें शिर तत्पदांबुजीं वाहे॥२१॥
त्या मिथुनीं आवाहन सांब शिवाचें करूनियां भावें ॥
पूजन विध्युक्त करी जें बहु अद्यापि साधुनीं गावें ॥ २२ ॥
विप्रीं करी शिवाचें आवाहन पूजनीं तसें चि सती ॥
त्यांच्या स्त्रींत शिवेचें तद्रूप चि तीस दंपती दिसती ॥ २३ ॥
पूजन करितां प्रेमें सद्वस्त्रें भूषणें हि लेवविलीं ॥
मिथुनें कांचन-पात्रीं विविधान्नें ओगरूनि जेवविलीं ॥ २४ ॥
तांबूल दक्षिणा मग देउनि करुनि प्रदक्षिणा नमुनी ॥
मिथुनें विसर्जिलीं तीं गेलीं तद्भक्ति-सद्गुणीं रमुनी ॥ २५ ॥
तो होय सामवान् स्त्री राज्ञी जेथें शिवेसि आवाही ॥
आवाहनीं शिवातें तरि होती दिव्य पुरुष आवाही ॥ २६ ॥
पूर्व पुरुषपण विसरे तो सत्य स्त्रीच आपणा समजे ॥
संगार्थ सुमेध्यासी भार्गवनामा करी बहुत गमजे ॥ २७ ॥
या परि बोले नाथा कामार्ता बहु तव प्रिया हे मी ॥

---

१ दैवानें. २ दंपत्यें. ३ वाढूनि. ४ आवाहन करी. ५ विधवा स्त्रिया हि.

तव-अधराऽमृत-पानें वांचेनचि वृद्धि बहु असो प्रेमीं ॥ २८ ॥
भर्त्या रहा पहा वन रम्य करीं यांत मजसह क्रीडा ॥
एकांतीं दयितेसीं रमति सुखें दयित सोडुनि व्रीडा ॥ २९ ॥
हें एकोनि सुमेधा चित्तांत ह्मणे विनोद ऐसा या ॥
कां रुचला योग्य नव्हे हा परिहास-स्थळीं हि बैसाया ॥ ३० ॥
अश्रुतपूर्व सुमेधा श्रवण करुनि तो पथीं उभा राहे ॥
पाहे तों सारस्वत-पुत्र स्त्री स्पष्ट जाहला आहे ॥ ३१ ॥
विस्मय पावोनि पुसे रूप-गुणाहीं अपूर्वसा मित्रा ॥
दिससी वदसी वाणी मद-विकला कामिनी तशा चित्रा ॥ ३२ ॥
तूं सामवान् मम सखा पंडित वदसी असें कसें भलतें ॥
माझ्या हृदयांत तुझें बहुतचि हें आजि बोलणें सलतें ॥ ३३ ॥
ती बोले पुरुष नव्हे सामवती स्त्री रतिप्रदा आहें ॥
संशय असेल तरि तूं माझीं आंगें प्रिया स्वयें पाहें ॥ ३४ ॥
ऐकुनि असें अकृत्रिम-केश-स्तन-जघन-शोभनी पाहे ॥
वाहे विकार पळ परि साधु सुमेधा स्वसत्पथीं राहे ॥ ३५ ॥
सामवती त्यासि ह्मणे गेला कीं संशय प्रभो वद या ॥
स्वस्त्रीतें रमिव शमिव कामज्वर वरवर्णी प्रिया सदया ॥ ३६ ॥
पुनरपि ह्मणे सुमेधा मोडिसि रीतीस जेविं मत्त महा ॥
मर्यादेसि बुडवितां ह्मणतात कुलीन साधु सत्तम हा ॥ ३७ ॥
आह्मी शास्त्रनिपुण कीं वदतोसि असा कसा महादोषा ॥
रे समज आपणातें आपण कीं पुरुष बुध न तूं योषा ॥ ३८ ॥

---

१ लज्जा. २ हाय. ३ स्त्री.

न धरावा अपथ असा साधूंच्या नायकोंन हाकेला ॥
आह्मीं स्वयें चि होउनि धूर्त-नृपा वश अनर्थ हा केला ॥ ३९ ॥
सद्गुण-मंडित पंडित-बहुमत होतासि नाकपाळांला ॥
ऐशा हि तुज्या आला निंद्य स्त्रीभाव हा कपाळाला ॥ ४० ॥
त्यजुनि पथ वनीं शिरतां सांपडतो स्पष्ट हा दवा खातो ॥
कीं व्याघ्रादिक पावे कीं कंटक-विद्ध-पाद दाखा तो ॥ ४१ ॥
धरुनि विवेक स्वगृहा तूं चाल उभा चि न धरितां ताप ॥
देव-द्विज प्रसादें जायिल विलयासि हें तुझें पाप ॥ ४२ ॥
अथवा विधिच्या योगें होउनि जरि राहसील तूं नारी ॥
तरि मायाबल मोठें त्या राज्ञीचा प्रभाव ही भारी ॥ ४३ ॥
बहु वारी परि त्यातें ती आलिंगुनि बळें चि मुख चुंबी ॥
मानी मनीं सुमेधा अमृत-लतासीं तथापि कटुतुंबी ॥ ४४ ॥
ऐसें धर्षण केलें तरि न सुमेधा सुधीर तो चळला ॥
कळला अनर्थ भारी न तिला रंभेसि शुकतसा वळला ॥ ४५ ॥
यत्नें गृहासि घेवुनि गेला नूतन वधू सुमेधा ती ॥
हृदयीं ह्मणे तव-यशें सुब्राह्मण वत्सले उमे धोंती ॥ ४६ ॥
नमुनि सुमेधा ताता तात- सखा सर्व वृत्त आयकवी ॥
ससुत विदर्भपातिकडे ते गेले क्रोध- तप्त-काय कवी ॥ ४७ ॥
सारस्वत विप्र ह्मणे राया मद्धात कार्य कां गमला ॥
एक चि सुत तद्गति हे मज न सुचे तूं विचार सांग मला ॥ ४८ ॥

---

१ इंद्राला. २ वणव्या. ३ कडु भोंपळी. ४ तृप्त होती.

त्वन्मंत्रें पुत्राचें झालें श्लाघ्य हि वपु त्रपाकारी[1] ॥
राजा ह्मणेल चि सदा हा हा होतां अपुत्र पाकारी[2] ॥ ४९ ॥
राजा स्वरूप जातां पितृमन चिंतुनि मुलास कळकळतें ॥
परहितचि किमपि नकळे स्वहितचि कैसें तुला सकळ कळतें ॥ ५० ॥
एकचि पुत्र तयाची गति हे मत्सम दुजा नसे कष्टी ॥
वैदर्भी अंधाची मोडावी काय डोळसें यष्टी ॥ ५१ ॥
ब्राह्मण-पुत्र विनाशें कडकडला भूप संकटीं पडला ॥
घडला अपराध ह्मणे अयशाचा डाग आपणा जडला ॥ ५२ ॥
सीमंतिनी-प्रभावें भूप परम-विस्मयासि तो पावे ॥
मेळवि महर्षि ज्यांहीं सद्धर शरणागतासि ओपावे ॥ ५३ ॥
पुजुनि नमुनि नृप ह्मणे पदर पसारितों महर्षि हो तारा ॥
वारा या सारस्वत-पुत्राचें स्त्रीत्व मज तुह्मी थारा ॥ ५४ ॥
ते वदले शिव दुर्गा तद्भक्तहि अति समर्थ बा राया ॥
यांच्या संकल्पातें क्षम कोण त्रिभुवनांत वाराया ॥ ५५ ॥
मग नरवरें प्रयत्नें सुमुनि भरद्वाज नमुनि आणविला ॥
त्याला प्रार्थुनि तेणें आपण केला अनर्थ जाणविला ॥ ५६ ॥
द्रवुनि भरद्वाज महा-मुनि शिकवी संकटांत सारा धी ॥
त्या सात्मज-विप्रासह नृप भावें भगवतीस आराधी ॥ ५७ ॥
ध्यान-जपार्चन नमन-स्तवन रत त्यजुनि भुक्ति तो भावें ॥
नृप तोषवी त्रिरात्र श्रीदुर्गेतें ह्मणे मला पावें ॥ ५८ ॥
तीव्र-नियम-संतुष्टा शशि-कोटि-सम-प्रभ स्वरूप नृपा ॥

---

१ लज्जाकारि. २ इंद्र.

दावी श्रीजगदंबा शरणागतवत्सला करूनि कृपा ॥५९॥
दर्शन देवुनि देवी त्यासि ह्मणे पसरितोसि पदरा ज्या ॥
हृदयीं धरुनि मजपुढें त्या आत्मसमी हितासि वद राजा ६०
स्तवुनि नमुनि भूप ह्मणे भगवति भवसागरांत तारावें ॥
सारावें अपयश या विप्रसुताचें वधूत्व वारावें ॥ ६१ ॥
जगदीश्वरी ह्मणे मम-भक्तांहीं कर्म जें नृपा केलें ॥
तें अन्यथा कराया शक्य नव्हे वर्ष-लक्ष जरि गेलें ॥ ६२ ॥
मम भक्तांचें केलें कर्म जगीं मोडिलें कधीं नाहीं ॥
अ.तां काय करावें बा आह्मीं भक्तवागधीनाहीं ॥ ६३ ॥
भूप ह्मणे एकात्मज हा द्विज झाला चि नष्ट-संतान ॥
विश्वेश्वरि तुज नमितां बाधे कोणा हि कष्ट संता न ॥ ६४॥
झाला अपुत्र दैवें देवि कसा स्वर्ग यासि साधेल ॥
या नष्ट संतति-मुनिस संसारीं ताप नित्य बाधेल ॥ ६५ ॥
वर्णिति वेद मुनि तुतें वरदे परदेवते सदाधारे ॥
शरणागतासि ह्मणति त्वत्पद-पद्में सुखें सदा धा रे ॥ ६६ ॥
देवी ह्मणे प्रसादें माझ्या होइल सुपुत्र या एक ॥
निववील बहु तो राया दवदहनार्ता जसा सुधा-सेक ॥ ६७॥
हे याची सामवती कन्या द्यावी सुखें सुमेधातें ॥
बुध भजति सदुक्तातें जेविं स्त्री लाधल्या सुमेधांतें ॥ ६८ ॥
ऐसी करूनि आज्ञा झाली अंतर्हिता भवानी ती ॥
भक्तयश करावें हे पहिलीच जिची नव्हे नवी नीती ॥ ६९ ॥

१ भक्त-वाक्-अधीन-भक्ताच्या वाणीच्या स्वाधीनाहीं. २ नामविशेष ( ऋषि ) त्यातें. ३ ज्ञान्यातें.

सविधि सुमेध्यासि दिली सामवती बहुसुखें निवालिहि ती ॥
ज्ञाते ह्मणति कपाळीं पहिलें मोडुनि नवें शिवा लिहिती ॥ ७०
सारस्वतासि झाला सद्गुण-संपन्न पुत्र सज्जन हो ॥
या शिवभक्तयशोमृत- पारावारीं सदैव मज्जन हो ॥ ७१ ॥
रामात्मजें मयूरें लिहिली हे सत्कथा यथाबुद्धि ॥
जी सेविली कसी तरि देती श्रीजान्हवी तसी शुद्धि ॥ ७२ ॥

---

## अध्याय १०.

श्रीमत्सांब शिवाचें तद्भक्तांचें हि चरित सेव्य जना ॥
हें अमृत स्त्रवत्याही ताप हरुनि तुच्छ करितसे व्यजना ॥ १ ॥
होता अवंतिदेशीं ब्राह्मण नामें करूनि मंदर तो ॥
त्या तद्वैत्र ह्मणे हा विषयांतें प्रेम धरुनि मंद रतो ॥ २ ॥
सर्व स्वधर्म सोडुनि तो वेश्यापिंगलेसिं हो रमला ॥
भ्रमला मंदर गणिका- गेहीं अलि सारसां तसा गमला ॥ ३ ॥
अति सदय ऋषभनामा शिवयोगी सहज मंदिरा आला ॥
झाला प्रमुदित मंदर पूजी गणिकासह स्वयें त्याला ॥ ४ ॥
परमाद्भुत योगिचरण सन्मणि करणार विगळाला हे ॥
पूजुनि सुकृत विपुल तो द्विज मंदर ती हि पिंगला लाहे ॥५॥
निज चरण-रजें लज्जित बहु चिंतो स्पर्श पूर्व मणि केला ॥
ऋषभें रात्रि वसुनि शुचि विप्राला करुनि त्याहि गणिकेला ॥६॥

---

१ होऊं. २ पंखवाला. ३ भ्रमर. ४ कमलां. ५ चिंतामणि आणि परिस तो.

त्याउपरि आयु सरतां ब्राह्मण वेश्या हि पावली मरण ॥
परिसा मंदर कैसा तरला पूजूनि साधुचे चरण ॥ ७ ॥
होता दशार्ण भूपति तो नामें वज्रबाहु तज्जाया¹ ॥
सुमति तिच्या गर्भीं ये कर्में असुखीं सुखींहि मज्जाया² ॥ ८ ॥
त्या सुमतिस सवतीनीं न धरुनि कंपा दिलें विष माराया ॥
कर्म न कळे प्रियहि तें जें बहु संपादिलें विषम राया ॥ ९ ॥
ती घोरहि विष भक्षुनि महिषी मेली न दैवयोगानें ॥
परि पावे मरणाहुनि अतिदुःसह दुःख विषज-रोगानें ॥ १० ॥
कष्टें पुत्र प्रसवे ज्येष्ठस्त्री वज्रबाहुचीं काळीं ॥
विषयोगें व्रण झाले देहीं तैसे चि त्या तिच्या बाळीं ॥ ११ ॥
रात्रिंदिवस बाळ रडे ती सुमतिहि उग्र दुःख साहेना ॥
राहेना क्षण पीडा वैद्यशत हि यश उपाय पाहेना ॥ १२ ॥
राजा ह्मणे न वांचति न मरति ही रात्रिंदिवस आरडती ॥
न निजों देती कोणा स्त्री-शिशुहुनि बहु ह्मणोनि हा रडती ॥
मज दुःख पाहवेना आरडणें क्षण हि हें सहावेना ॥
सदनांत राहवेना उद्वेगें राज्यभर पहावेना ॥ १४ ॥
मी या प्रजावनार्थचि केवळ पादपसमान सत्य जितों ॥
अस्वस्थ न होतां स्त्री-सुत कठिन करूनि मानस त्यजितों ॥
सूतां³ वाहोनि रथीं टाक वनीं मज सुचेचि न परा धी ॥
स्त्री-पुत्र-त्यागास्तव धर्मज्ञ सुखें ह्मणोत अपराधी ॥ १६ ॥
भर्त्याच्या आज्ञेनें त्यजिली ती सात्मजा वनीं सूतें ॥
भूतें कर्म न साहे कांपे वदलीं च हा असीं भूतें ॥ १७ ॥

---

१ तत्-जाया- त्याची स्त्री. २ बुडाया. ३ हे सारथ्या.

त्या राजस्त्रीचें तें दुःख सुदारुण वदेल काय कवी ॥
नायक विप्रांचा जो शौनक त्या कठिण सूत आयकवी ॥१८॥
व्याघ्र-वृक-व्यालांला पाहुनि भ्याली पिशाच आरडली ॥
निज-पूर्वकर्म निंदुनि मूर्छित पडली ह्मणोनि हा रडली ॥१९॥
झाली क्षुधा-तृषार्ता क्षतचरणा[1] अश्रुनीं सती न्हाली ॥
आली कां न मृति[2] ह्मणे माता मज पापिणीस कां व्याली ॥२०॥
भ्रमता भ्रमतां पावे पद्माकर-वैश्यराजनगरातें ॥
तद्दासीनें कथिलें जें राजकलत्र[3] भाजन गरा[4] तें ॥ २१ ॥
वैश्यवरें वृत्त पुसुनि तोषविली कन्यका जसी तातें ॥
वाल्मीकि वैश्य सम परि हे पावे दुःख जें न सीता तें ॥ २२ ॥
त्या वैश्य-गृहीं नृपसुत साहानि भोगें कृता अघा मेला ॥
भोगवितां कर्माचें फल सदयहि विधि कधीं न घामेला ॥ २३ ॥
सुत-शोकें राज्ञीच्या झाला अत्यंत भर विलापाला ॥
पतिस ह्मणे अजि मज कां विषवल्लीचा न भरविला पाला॥२४
पुत्रासि ह्मणे त्वांही परदेशीं टाकिली कसी बा हे ॥
आहे युक्तचि तुज हें पुत्र पित्याच्याचि रीतितें बाहे ॥ २५ ॥
तोचि ऋषभ शिव योगी ताराया शोक-सागरीं आला ॥
त्याला तो वैश्येश्वर शिव समजुनि सविधि पूजिता झाला ॥
सुमतिसमीप प्रभु तो बैसोनि करि स्वयें तिला बोध ॥
जेणें भ्रम न टिकावा लागावा आत्मवस्तुचा शोध ॥ २७ ॥
वत्से सत्सेव्य तुज ज्ञानामृत ओपितों भ्रमीं न टिकें ॥

---

१ व्रणयुक्त चरण जीचे असी. २ मरण. ३ राजस्त्री. ४ विषा. ५ दैव. ६ द्रवला.

एक चि शाश्वत आत्मा जन्म मरण देह जाण हें लटिकें २८
अध्यात्मरूप ओखद तोखद तो खदखदां हसायाला ॥
देता झाला योगी स्वस्थ प्रळयांतही वसायाला ॥ २९ ॥
परि ती सुमति ह्मणे बा सत्य वदसि सत्सभामत स्वामी ॥
रोगार्ता शोकार्ता स्त्री कीं केवळ जडा गतस्वा मी ॥ ३० ॥
पतिनें त्यजिली रुग्णा ह्मणवुनि मी न करितां हि अत्यांग ॥
पुत्रें सोडविलें बा माझा तुज योग्य होय अत्याग ॥ ३१ ॥
द्रवला श्रीशिवयोगी भस्म-लव मृतार्भकाननीं घाली ॥
तत्काल तत्प्रभावें गेली ती फिरुनि चेतना आली ॥ ३२ ॥
तो मृत बालक भस्में श्रीशिवमंत्राभिमंत्रितें झाला ॥
सेवा घडली होती पूर्वी या ऋषभयोगिची ज्याला ॥ ३३ ॥
नेत्रें उघडुनि सहसा पाहे प्राशावया शिशु स्तन्य ॥
पाहुनि विस्मित झाला वैश्येश्वर जन तसाचि जो अन्य ॥ ३४
बाळातें आलिंगुनि राज्ञी आनंदली ह्मणे धन्या ॥
अन्या मत्सम नाहीं बापा त्वां तारिली भली कन्या ॥ ३५ ॥
पुनरपि भस्म सुमतिच्या तत्पुत्राच्या तनूशि तो लावी ॥
दिव्य तनु पळांत करी देवीसीं जी विशंक तोलावी ॥ ३६ ॥
जें दिव्य सुख शचीचें त्याहुनि सुख अधिक शतगुणें लाहे ॥
ऋषभाचे पाय धरी प्रत्युपकृतितें न ती सती पाहे ॥ ३७ ॥
ऋषभ सुमतितें उठवुनि आश्वासन करुनियां ह्मणे हर्षें ॥
वत्से वांचसिल सुखें न जरा स्पर्शेल शाश्वतें वर्षें ॥ ३८ ॥

---

१ द्रव्यरहिता. २ रोगग्रस्ता. ३ अति-आग-अति-अपराध. ४ मृत अर्भक आनन-मेलेल्या बालकाच्या मुखीं. ५ वांचला.

त्रिभुवनीं विख्यात तुझा होइल भद्रायुनाम हा तनय ॥
जे शत्रु तयां करवीं क्षति याचा जोडवील हात नय ॥ ३९ ॥
हा निज राज्यातें तवहृदय करायासि थंड पावेल ॥
पावे जैसा सेकें लाहुनि बहु वृद्धि मंडपा वेल ॥ ४० ॥
सद्गुरु-कृतोपदेशें जो होय प्राप्तविद्य हा तनय ॥
या वि पुरीं वस वत्से पद्माकर वैश्यवर न हांतनय ॥ ४१ ॥
वांचवुनि भस्मवीर्यें या परि तो ऋषभदेव दोघांतें ॥
तेथुनि पुसोनि त्यातें जाय करुनियां यशा अमोघातें ॥ ४२॥
लिहिली कथा यथामति श्रीरामसुतें नमूनि साधूंतें ॥
कवि ह्मणति सुपद जें या वर्णुनि शिव शिवजनासि साधूंतें॥

---

## अध्याय ११.

चंद्रांगद-नरपतिची पत्नी सीमंतिनी तिची कन्या ॥
जी पिंगळाभिधाना झाली ती कीर्तिमालिनी धन्या ॥ १ ॥
भद्रायु राजनंदन वाढे वैश्येश्वराचिया गेहीं ॥
सितपक्षीं चंद्र जसा सद्गुण-गणही तयाचिया देहीं ॥ २ ॥
भद्रायुचा सखा जो वैश्याधिप-पुत्र सुनयनामा तो ॥
तद्रूप-मधु ह्मणे मज सेवुनि रंभादि-सुनयना मातो ॥ ३ ॥
भद्रायु सुनय दोघे वैश्यवराचे बहिश्चर प्राण ॥
राजस्त्री धात्री बहु करि तेव्हां योग्य तत्परित्राण ॥ ४ ॥
ते रत्न-कनक-मंडन-मंडित दोघे कुमार नवसाचे ॥

---

१ उदकसिंचनें. २ त्यक्तनय. ३ दाई.

जों जों वाढति तों तों वैश्यपतिमनीं प्रमोद नव सांचे ॥ ५ ॥
भद्रायुचें उपनयन त्रिनवुनि विप्रांसि वैश्य तो करवी ॥
स्वसुताचें हि मग करी त्या पद्मा होय सुमति तोकरवी ॥६॥
विनयान्वित गुरुसेवा सादर विद्या कळासुखें शिकले ॥
पिकें छेदिले सकल गुण सत्कविनीं आम्रवृक्ष ते पिकले ॥ ७॥
शिवयोगी सोळाव्या वर्षी ये नृप-सुता पहायाला ॥
तच्चरणीं शिर वाहे राज्ञी पुत्रासि कथि वहायाला ॥ ८ ॥
त्या माता-पुत्रांहीं शिवयोगी पूजिला सदाशिवसा ॥
बहु धन्य मानिलें हो प्राणप्रद-गुरु समागमें दिवसा ॥९ ॥
भद्रायुतें दयार्णव शिवयोगी ऋषभ तो पुसे बापा ॥
कुशल असे कीं पावत नाहीं कीं माय हे तुझी तापा ॥ १० ॥
शिकलासि कीं सुविद्या गुरुसेवा करिसि कीं सदा भावें ॥
स्मरतोसि कीं मला स्व-प्राण-सखा गुरुसि ऐकिल्या नावें॥११॥
ऐसें वदतां गुरुच्या पायांवरि घालुनि स्वतनयातें ॥
सुमति ह्मणे गुरुवर्या त्वदधिक नाहीं च आत्मजन त्यातें॥१२॥
हा तव वत्स स्वामी प्राणपद तूं पिता खरा याचा ॥
या शिष्यातें बोधीं उपदेश तुझाचि हित करायाचा ॥ १३ ॥
त्यजिला स्वबंधुनीं हा झाला केवळ अनाथ बाळा या ॥
पाळाया तूंचि क्षम याचें दुरदृष्ट-दुःख टाळाया ॥ १४ ॥
या परि नमुनि सुमतिनें निज-पुत्र-हितार्थ विनविला योगी ॥
सांगे सन्मार्ग तया सुजना या श्रुतिपथासि ती येवो गी ॥१५॥

---

१ बालसूर्य. २ कोकिल. ३ येवो ४ वाणी.

वत्सा शाश्वत होय श्रुति-तज्ज्ञ पुराण-कथित जो धर्म ॥
तो सेव्य उभयलोकीं प्राण तेणें चि पावतो शर्म ॥ १६ ॥
भज सन्मार्गातें तूं दैवज्ञाची करूं नको गर्हा ॥
स्वप्नीं हि देवहेळन न करावें हे रिती तुला अर्हा ॥ १७ ॥
गो-देव-गुरु ब्राह्मण यांची तूं भक्ति सर्वकाळ धरीं ॥
चांडाळा हि अतिथिचें पूजन मानुनि मनांत शंभु करीं ॥ १८ ॥
त्वां सत्य न त्यजावें मानावें प्राग-संकट हि फोल ॥
गो-ब्राह्मण रक्षाया वत्सा केव्हां असत्य ही बोल ॥ १९ ॥
देव-द्विज-पर-वनिता परधन तैसें चि वस्तु दुर्लभ जें ॥
याची तृष्णा न धरीं पुण्ययशस्कर असेल तेंचि भजे ॥ २० ॥
जी सत्कथा सदागम सद्वृत्त सद्धर्म जें सदाचरण ॥
बा याची तृष्णा धर भावें स्मर शंभुचे सदा चरण ॥ २१ ॥
गो-विप्रातिथि-पूजन स्वाध्याय स्नान होम मंत्र जप ॥
पितृतर्पण देवार्चन यांतें तूं आळस त्यजूनि जर्प ॥ २२ ॥
बा कोप लोभ शठता असदाग्रह पिशुनता कुटिल भाव ॥
उद्वेग दंभ यतें सोडीं जोडीं महाजनीं ठाव ॥ २३ ॥
तूं क्षत्रधर्मरत जरि तरि बा हिंसा करूं नको स्वैर ॥
बहुभाषण परनिंदा वत्सा तैसें चि शुष्क जें वैर ॥ २४ ॥
हें न तुवां विसरावें स्त्री-मृगया-द्यूत-पान यांत सदा ॥

---

१ सुख. २ ज्योतिष्याची. ३ निंदा. ४ योग्या. ५ सत्-आगम, सच्छास्त्र. ६ जपतप.

अत्यासक्ति नसावी स्त्रीजित अविनीत जे तशांत कदा ॥२५
सुखसंपन्नीं मैत्री नित्य दया दुःखितीं जनीं हि करीं ॥
संतोष पुण्यवंतीं बा औदासीन्य दुर्मती न धरीं ॥ २६ ॥
अतिपूर्व अतिक्रोध श्रम निद्रा-हार भाषण-क्रीडा ॥
हे षट् पदार्थ वर्जीं होयिल यांतें न वर्जितां पीडा ॥ २७ ॥
विद्योत्साह श्रद्धा स्मृति पुण्य ख्याति धैर्य हें आधीं ॥
अनघा मन घालुनियां अतिपूर्वक षट् पदार्थ तूं साधीं ॥२८ ॥
सक्रोध हो अरिजनीं स्वकलत्रीं हो सकाम तूं बापा ॥
सकृप सलोभ हि चित्तीं हो स्वजनाच्या हरावया तापा ॥२९
हो द्वेषी पाखंडीं साधुजनीं हो सराग तूं बा गा ॥
दुर्मंत्रीं केवल-जड-पिशुनोक्तीं बधिर हो महा भागा ॥ ३० ॥
नास्तिक धूर्त पतित शठ षंढ कितव चपल खल जड क्रूर ॥
निज-कल्याणा करितां वत्सा सोडूनि यांसि दे दूर ॥ ३१ ॥
न करीं निज-प्रशंसा विज्ञानेंगितपरा नको होवूं ॥
पुत्रीं धनीं कुटुंबीं बा केवळ चित्त तूं नको गोवूं ॥ ३२ ॥
जननी जनक सती स्त्री गुरु सज्जन यांचिया वचा साधो ॥
विश्वास पदा हि धरीं न अविश्वासें व्यथा तुला बाधो ॥३३॥
सावध सदा असावें संसारीं स्वहितकृत्य लक्षावें ॥
पुरुषार्थांचें साधन बा धनसें हें शरीर रक्षावें ॥ ३४ ॥
वत्सा भृत्याचा ही तूं निजहृदयीं धरीं न विश्वास ॥

---

१ कोणिक अर्थविषयक साधारण ज्ञान आणि अभिप्राय तत्परा.

समज मनीं गुरु-कथित- न्यायें वश मी करीन विश्वांस॥३५॥
निर्दोष जे तयांची चित्तांत कधीं धरूं नको शंका ॥
प्राण हि वेंचुनि रक्षीं वृद्धा बाळा सुदुर्बळा रंका ॥ ३६ ॥
वधयोग्य हि अरि येतां शरण तयातें वधूं नको जाण ॥
शरणागत जो त्याचे बा रक्षावे चि सर्वथा प्राण ॥ ३७ ॥
बा पात्र अपात्र असो नीच महत्तम कसा हि हो पावें॥
जो याचना करील स्वशिर हि हर्षें तयासि ओपावें ॥ ३८॥
यत्नें कीर्ति च जोडीं बा होय पदार्थ हा चि बहु धन्य॥
राजे पंडित यांचें भूषण नाहीं च कीर्ति हुनि अन्य॥ ३९॥
सत्कीर्ति-प्रभवा श्री पुण्य हि सत्कीर्तिचें चि बा तोकें॥
ज्योत्स्नेनें चंद्र जसा शोभे सत्कीर्तिनें चि हा लोक॥ ४०॥
धन मेळविलें जें हय गज कांचन रत्नराशि सत्वरतें ॥
त्या बा अकीर्ति होतां सोडावें तृण तसें चि सत्वर तें ४१
ताताच्या मातेच्या गुरुच्या नित्य क्षमा करीं रागा ॥
आगा निजपुत्राच्या भूदेव-कृताऽनया हि तूं बा गा॥ ४२॥
जेणें प्रसन्न होइल विप्र तसें तूं करीं हित तयांचें ॥
हे बुडतां उद्धरिती बा गाती यश जगीं विततें यांचें ॥४३॥
आयुष्य कीर्ति यश बल पुण्य-द्रव्य प्रजोन्नति प्राज्य ॥
जेणें तें कर्म करीं धर्मन्यायें चि चालतें राज्य॥ ४४॥
अत्वर निद्रे सत्वर अशनीं हो शिवयशोमृतें बा धीं ॥
कोणाला हि न पीडीं शीघ्र पराची स्वयें हरीं बाधा॥ ४५॥

---

१ जगास. २ बालक. ३ प्रकाशानें. ४ अपराधा. ५ विस्तार पावलेलें. ६ तृप्त हो.

बव्हर्थ जन-मनोहर स्वल्पाक्षर मधुर सत्य बोलावें ॥
ज्या सद्वाक्य-श्रवणें बुध-श्रोत्याचें चि शिर हि डोलावें॥ ४६॥
संपत्तींत विपत्तिंत वत्सा होवूं नको कधीं भ्रान्त॥
पापीं गुरु-बहुबोलीं ब्रह्मकुलीं सर्वकाल हो भीत ॥ ४७ ॥
ज्ञाति-सुत-बंधु-मित्रीं भार्याजन-पंक्ति यांत समभावें ॥
वर्तावें नित्य तुवां कीं सर्वांहीं तुझें चि यश गावें ॥४८ ॥
संतांचे अति-हितकर उपदेश तशा चि पुण्य-धर्म-कथा ॥
यांतें विमुख न हो तूं वत्सा सोडूं नको चि भव्यपथा ॥४९॥
ब्राह्मणं[1]-संकुल शिवमय जो तीर्थ क्षेत्र पुण्यदेश वरा[2] ॥
त्यांत बसावें कीं यम- सुस्थानींचा न भीतिदेश बरा ॥५०॥
कुलटा गणिका कामुक जेथें बहु नीचजन तशा स्थानीं॥
राहूं नको क्षण हि कीं दुर्देशीं न प्रवर्तती ज्ञानी ॥ ५१ ॥
एक-त्रिभुवन-पति-शिव-चरणाश्रित तूं तथापि सुरसमज ॥
शंभुविभूति भजतया जाण ऋषभ देतसे स्व-सु-रस मज॥५२॥
तो तूं सदा स्थिर सदा- दक्ष विजित शांत विजितषड्वर्ग ॥
भर्ग[3]-ध्यान-रत सदा अपवर्ग मिळेल मग किति स्वर्ग ॥५३ ॥
यति विप्र पुण्यतरु वृष धेनु महत्सर[4] नदी सतीरत्न ॥
निज-कुल-दैवत गुरुजन यांच्या नमनीं करीं सदा यत्न ॥५४॥
आचमन करुनि शुद्ध ब्राह्ममुहूर्तीं उठोनियां न्हावें ॥
भावें गुरुचरणांतें नमुनि शिवातें सदा तुवां ध्यावें ॥ ५५ ॥

---

१ ब्राह्मणांनीं व्याप्त. २ स्वीकारा. ३ शिवध्यानांत निमग्न. ४ मोठें सरोवर.

विष्णु चतुर्मुख लक्ष्मी स्कंद विनायक उमा सती वाणी ॥
शक्रादि लोकपति ऋषि-वर मेरुप्रमुख नग मनीं आणीं॥ ५६॥
त्वां उदयातें येतां श्रीरविचे किरण-चरण वंदावे॥
दारिद्र्य दुःख दुरित- ध्वंसें प्रारब्ध-भोग मंदावे ॥ ५७ ॥
बा गंध पुष्प फल कीं तांबूल प्रिय पदार्थ नव सर्व ॥
शर्व-निवेदित सेवीं बहुमानीं सकल शंभुचें पर्व ॥ ५८ ॥
स्नान जप ध्यान तप स्मृति होम असें घडेल जें कर्म ॥
सर्व शिवासि निवेदीं किंबहुना स्वापजन्य ही शर्म ॥ ५९ ॥
पर्यटन-भुक्ति-भाषण- शयन-क्रीडेंत सर्वदा साचा ॥
प्रेमा शिवीं असावा हा चि महाधर्म सर्व दासाचा ॥ ६०॥
रुद्राक्ष-भस्म-धारण शिव-नाम-स्मरण साधुसंग दया ॥
हे भूषविते ह्मणती कवि मणिमय-हार-मुकुट-अंगद या ॥ ६१॥
ऐसा तुज संक्षेपें धर्माचा संग्रह स्वयें युक्त ॥
कथिला अन्यपुराणां मध्यें जो विस्तरें असे उक्त ॥ ६२ ॥

---

## अध्याय १२.

कथितों शिवकवच तुला बा जेणें सर्व ताप हरपावे ॥
ज्यातें देहीं धरितां विश्वाचा मायबाप हर पावे ॥ १ ॥
भद्रायुला शिवकवच उपदेशुनि ऋषभमुनि ह्मणे बा हें ॥
वाहें नित्य शरीरीं शिववर्में भद्र सर्वदा पाहें ॥ २ ॥

---

१ पर्वत. २ महादेवाला निवेदन केलेलें. ३ निद्रे पासून झालेलें. ४ सुख.

ऐसें सांगुनि भगवान् दिव्य महानाद शंख दे हातें ॥
तैसा चि खड्ग ज्याचें दर्शन करि भस्म शत्रु-देहातें ॥ ३ ॥
अभिमंत्रुनि भस्म पुन्हा लावी भद्रायुच्या शरीरास ॥
द्वादशसहस्र-कुंजर-शक्ति तया माजि तो करी रास ॥ ४ ॥
भस्में पावे तो बल ऐश्वर्य धृति स्मृति क्षणीं शोभे ॥
तेजें शरंदर्क[1] तसा त्या पाहुनि दृष्टि सुमतिची लोभे ॥ ५ ॥
अंजलि भद्रायु करी त्यासि ह्मणे ऋषभ पुत्रका परिस ॥
तूं जिंकिसील समरीं मृत्युसमा ही महाबळा अरिस[2] ॥ ६ ॥
मंत्रजपें सिद्धि महा- तेजस्वी खड्गराज हा हातीं ॥
देखतिल रिपुबळें जीं भस्म चि होतिल ह्मणोनि हा हातीं[3]॥७
या शंखाच्या ध्वनितें जे श्रवण तुझे अराति करितील ॥
ते त्यजुनि आयुधातें मूर्छित पडतिल न धैर्य धरितील ॥ ८ ॥
हे दिव्य-खड्ग दर-वर करितिल पर-सैन्य-घात तत्काळ ॥
स्वबळ स्वसहायाचें वाढवितिल शौर्यतेज तत्काळ ॥ ९ ॥
याच्या तेजें शैवें कवचें द्वादश-सहस्र-हस्ति-बळें ॥
भस्माच्या सामर्थ्यें अहितांचें सैन्य जिंकिसील पळें ॥ १० ॥
षड्वर्गातें हि भयद होसिल पक्षींद्र तो जसा अहितें ॥
स्वपित्याचें सिंहासन पावुनि तूं पाळिसील या महितें ॥ ११ ॥
करुनि प्रसाद या परि शिकवी भद्रायुतें ससुमतीतें ॥
तत्पूजित ऋषभ निघे करि भुवनें यश पिवूनि घुमती तें ॥ १२ ॥

---

१ शरत्-अर्क-शरदृतूंतील सूर्य. २ शत्रु. ३ प्रतिध्वनियुक्त होती.

लिहिलें सुयश मयूरें या हेतु सदाशिवाख्य गोसावीं ॥
कीं सद्रसिक हरिजनें स्वपर यशें बहु जगांत पोसावीं ॥१३॥

---

## अध्याय १३.

भद्रायुचा पिता जो नरनायक वज्रबाहु या नावें ॥
याचें भाग्य सुकविनीं शक्राचें जेविं तेविं वानावें ॥ १ ॥
त्याचा शत्रु मगधपति हेमरथ प्रबळ बहु-चमू-सहित ॥
वेढुनि लुटिता झाला सुसमृद्ध दशार्णदेश तो महित ॥ २ ॥
नगरीतें मग वेढी तो माधव हेमरथ असें पाहे ॥
साहे न वज्रबाहू नृप सबळ निघे सधनु करीं वाहे ॥ ३ ॥
बहु माधव-दल मर्दी आठवुनि मनीं स्वदेश लुटिला तें ॥
वधिता चि धर्मयुद्धीं तेजस्वी वज्रबाहु कुटिलातें ॥ ४ ॥
पारि वेढिला परांच्या समरीं तो वज्रबाहु सेनाईं ॥
त्या रविसमा कराया वांछिति बहु शत्रु राहुसे नाहीं ॥ ५ ॥
कितिकाहीं बळ मथिलें कोण्ही हय सूत मारिला चाप ॥
कोणी खंडी कोणी खड्ग च्छेदी न आठवी पाप ॥ ६ ॥
बहुतांहीं विरथ करुनि धरुनि हरुनि तेज बांधिला दैन्य ॥
बहु वज्रबाहु पावे हेमरथाचें जयें फुगे सैन्य ॥ ७ ॥
जयमत्तें हेमरथें अमात्य हतशेष सैन्य ही लुटिले ॥
पुर अंतःपुर हि तसें धर्म न कांहीं च रक्षिला कुटिलें ॥ ८ ॥
चालविला भूप रथीं घालुनि सर्वस्व हरुनि देशाला ॥

---

१ वांकड्यानें. २ (हेमरथें या शब्दाचें विशेषण.)

जन विधिच्या वाताच्या कैसा लंघील तरु निदेशाला[1] ॥ ९ ॥
हें ऐकुनि भद्रायु क्षिप्र हया वरि चढे कढे क्रोधें ॥
सुनयसह[2] निघे असिदर- कर[3] जो परिपूर्ण गुरुकृतें बोधें॥१०॥
भद्रायु बहु क्षोभे निःश्रीक दशार्णदेश पाहूनीं ॥
मागध-कटकांत शिरे मारित चि सुटे परांसि बाहूनीं॥ ११ ॥
शिववर्म रक्षितां त्या परशस्त्रांची न ताप दे वृष्टि ॥
जेवीं सवैराग्यातें स्त्रीरत्नाची रसप्लुता[4] दृष्टि ॥ १२ ॥
एक नृप वधुनि समरीं भद्रायु तयाचिया रथीं चढला ॥
सुनय तयाचा सारथि झाला विद्या जपोनि जो पढला॥१३॥
जैसा सिंह मृगकुलीं शत्रुकुलीं तो तसें करी दणगें[5] ॥
ते त्या पुढें टिकावे झटुनि सभाग्या पुढें कसें भणगें ॥ १४ ॥
पुनरपि हेमरथाचा खवळुनि बळ-पति-समूह करि लगट ॥
वाटे सिंधु चि तो त्या राजसुतातें रणांत करिल गट्ट॥ १५ ॥
तेव्हां कार्मुक ठेवुनि कोशांतुनि[6] दिव्य खड्ग आकर्षी ॥
त्या पाहुनि अरि मेले तें देखुनि हृष्ट होय नाकर्षी ॥ १६ ॥
जें तेज रुद्र-नयनीं तें चि धरी तो कराल[7] करवाल[8] ॥
जाणो हांसोनि ह्मणे काय मज पुढें कराल करवाल ॥ १७ ॥
जे जे शत्रु पहाती रणरंगीं झळकल्या तया असितें[9] ॥
ते ते क्षणांत मरती सर्वांचीं जाहलीं मुखें असितें ॥ १८ ॥

---

१ आज्ञेला २ नामविशेष ( साराथि ) त्या सह. ३ खड्ग आणि शंख हातामध्यें ज्याच्या असा. ४ शृंगारादि रसानीं युक्त. ५ दाणादाण ६ म्यानातून. ७ भयंकर. ८ तलवार. ९ काळी

जैसे पतंग पावुनि सहसा प्रज्वलित-वन्हितें मरती ॥
परवीर तसे चि रणीं कोणी न तया महासितें तरती ॥ १९॥
मग सर्व शत्रुसैन्यें नाशाया दिव्य शंख वाजविला ॥
मूर्च्छित करुनि सकल रिपु तेणें कल्पान्तमेघ लाजविला ॥२०
अश्व-गज-रथारूढ प्रबलासि समग्र दररवें खचले ॥
गरुडा पुढें फणीचें शत्रूचें बल तया पुढें न चले ॥ २१॥
न वधी मृत मानुनि अरि-सैन्या मूढा निरायुधा त्यातें ॥
पाहुनि सत्व विनविती मुनि हा व्हाया चिरायु घात्यातें॥२२॥
तातातें मुक्त करी पौर-सचिव-दार-सहित मातांतें ॥
ससचिव-हेमरथातें धरि यश निववी कवींस गातां तें॥ २३ ॥
सर्वस्व स्वपित्याचें हेमरथाचें हि रत्नमात्र हरी ॥
स्वयश श्रवण करित तो निज-जनक-पुरीं सुखें प्रवेश करी॥
सचिव चमूपति पुरजन गेले होते पळोनि जे भग्न ॥
येउनि कुमार-विक्रम पाहुनि झाले महासुखीं मग्न ॥ २५ ॥
वज्रभुजादिक ह्मणती हा देव स्पष्ट पावला गावा ॥
आह्मीं मृत वांचविले याच्या चरणीं च भाव लागावा॥ २६
हा होय सिद्ध कोणी किंवा करुणासमुद्र हा अमर ॥
याचें कर्म अमानुष अत्यद्भूतरूप होय हा समर ॥ २७॥
बहुधा याची माता गौरी श्रीशंभु तात हा स्वामी ॥
याच्या मग्ना झाल्या दश कीं अक्षौहिणी महाधामीं॥ २८॥
करुनि असें ऋषभवरें आत्मजनाच्या विपत्तिचें शमन ॥
तो भद्रायु मग करी त्या स्वापित्या वज्रबाहुतें नमन॥२९॥

पुत्र असें नेणे परि आलिंगुनि सुदृढ महिवरें शतदा ॥
होउनि उपकाराऽर्णव- मग्न पुसे त्यासि महिवरेश तदा ॥ ३०
गंधर्व देव कीं तूं योगीश्वर कोण सत्य सांग मला ॥
हरिला गजवरसा हा तुज तारायासि योग्य कां गमला ३१॥
बापा तव साधुत्वें धालों झालों चि आजि वेडा या ॥
उपकारातें अक्षम जन्म सहस्त्रें करूनि फेडाया ॥ ३२ ॥
माता तात स्वकुल स्थान मला सांग हें तुझें राज्य ॥
त्वां अमृत शवीं किंवा विझतां दहनांत सिंचिलें आज्य॥ ३३ ॥
ध्यावें हरिचें तैसें भव्य तुझें नाम काय बा सांग ॥
द्विषदर्णवांत आह्मां कोणाला ही न लागता थांग ॥ ३४ ॥
त्यासि कुमार ह्मणे हा वैश्याऽधिप-पुत्र सुनय या नावें ॥
माझा परम सखा या स्वप्राणा हूनि अधिक मानावें ॥ ३५ ॥
या सुनयाच्या सदनीं माते सह बहुतकाल मी वसतों ॥
प्रेमरस चि अधिक असे न असा बहुमत बुधा सुधारस तों ॥
भद्रायु नाम माझें वरकड मद्वृत्त मी पुढें कथिन ॥
निर्भय वस निजनगरीं जरि अरि उठतिल पुन्हा तयां मथिन
यां शत्रूंतें माझें येणें जों होय तों न सोडावें ॥
मोडावें न मन करुनि पोषण सद्यश सुपुण्य जोडावें ॥ ३८ ॥
राया प्रेम असों दे जातों माते कडे चि तन्मना ॥
व्हावें गुरुदर्शन मज सुक्षुधिताच्या जसें चि अन्न मना ॥ ३९॥
ऐसें वदुनि पित्यातें पुसुनि सुनयसह निघोनि जाय कवी ॥

---

१ विष्णुला. २ वज्रबाहु. ३ द्विषत्-अर्णव-शत्रुसमुद्रांत.

भद्रायु वैश्यनगरीं मातेतें नमुनि सर्व आयकवी ॥ ४० ॥
आलिंगी पुत्रातें सुचिर सुमति साऽश्रुलोचना माता ॥
तो वैश्यपति हि भेटे पूजी भद्रायुच्या स्तवी ताता ॥ ४१ ॥
स्त्री-पुत्राऽमात्य-सहित वज्रभुज स्वालयीं सुखें राहे ॥
पाहे प्रत्युपकार न भद्रायु-स्मरण घडिघडी वाहे ॥ ४२ ॥
त्या काळीं शिवयोगी भेटे चंद्रांगदासि तो याची ॥
प्रेमें करि बहुपूजा जेवि तृषित पांथ तीर्थ-तोयाची ॥ ४३ ॥
एकांतीं जन्मकथा सांगे भद्रायुची तया धन्या ॥
कर्म अमानुष वर्णी घडलें नाहीं च जें कधीं अन्या ॥ ४४ ॥
ऋषभ ह्मणे समुचित हा वर दे या कीर्तिमालिनी दुहिता[1] ॥
सुहिता कीर्ति मिळविता पावे तैसा न सुरभिचा दुहिता[2] ॥ ४५ ॥
चंद्रांगद मान्य करी दिधली सीमंतिनी ह्मणे तनया ॥
मन या आज्ञा-श्रुतिला स्वामी लंघुनि करील कां अनया ४६ ॥
जो सत्पात्रीं कन्या- रत्नाऽर्पण-भव्यबोध तो घांस ॥
पीयूषाचा भरवुनि जाय ऋषभमुनि पुसोनि दोघांस ॥ ४७ ॥
प्रेषुनि सचिव पुरोहित आणुनि नगरीं महोत्सवें धन्या ॥
भद्रायुला दिली ती निषधेंद्रें कीर्तिमालिनी कन्या ॥ ४८ ॥
मग वज्रबाहु नेला नळपौत्रें सचिवयुक्त बाहूनी[3] ॥
जावुनि पुढें उरासीं धरिला आजानु-दीर्घ-बाहूनीं ॥ ४९ ॥
चंद्रांगद-नृप-सदनीं वज्रभुज करी प्रवेश तों पाहे ॥
सिंहासनीं समोर चि भद्रायु सदार बैसला आहे ॥ ५० ॥

---

१ कन्या. २ दोहनकर्ता. ३ बोलावून.

तातातें अवलोकुनि भद्रायु सदार ये धरी पाय ॥
उठवी वज्रभुज ह्मणे बा त्वत्साधुत्व मी वदों काय ॥ ५१ ॥
ऐसें वदत प्रेमें भेटे भद्रायुला न कळल्याला ॥
रोमांच-कंचुकातें परि वपु झांकूनि तो सकळल्याला ॥ ५२ ॥
नळपौत्रासि ह्मणे हा सेतु विपत्सागरांत ताराया ॥
या वीरशिरोमणिनें मज दिधलें प्राणदान बा राया ॥ ५३ ॥
याच्या प्रसूसि[1] गातिल त्या व्याल्या वीर अन्य ज्या माता ॥
चंद्रांगदा तुझा हा जनकाचा तेविं धन्य जामाता ॥ ५४ ॥
कोणा वंशींचा हा सांगावा मज तुवां कुमारमणी ॥
झाली वरदा याच्या मातेला शंभुची उमा रमणी ॥ ५५ ॥
चंद्रांगद एकांतीं वज्रभुजातें ह्मणे परिस राया ॥
कथितों सत्य तुज तुझा न सरावा भ्रम कधीं परि सराया[2] ॥ ५६
टाकविली रोगार्ता ससुता जी त्वां महावनीं भार्या ॥
ती पद्माकर-वैश्यें स्वसुतासी पाळिली गृहीं आर्या ॥ ५७ ॥
तेथें दारुण-रोग- ग्रस्तत्वत्पुत्र पावला मरण ॥
तेव्हां पूर्वभवार्चित शिवयोगी ऋषभ दाखवी चरण ॥ ५८ ॥
तेणें मृत वांचविला प्रेमें भद्रायु ठेविलें नाम ॥
सुमति तुझी महिषी ही केली आरोग्य-सद्गुणा धाम ॥ ५९ ॥
द्वादशसहस्र-गजबळ अहितांच्या खड्ग-दर दिले शमना ॥
भद्रायुच्या न व्हावा श्रम अमर-पराभवीं हि लेश मना ॥ ६० ॥
मथिल शिवकवच रक्षित तवसुत भद्रायु अहित-कोटींतें ॥

---

१ मातेस. २ ह्यान.

जें गिरिशीं ऋषभार्पित भस्माच्या दिव्य तेज पोटीं तें ६१
हा झाला प्राप्त मला बहुभाग्यें पुण्यकीर्ति जामाता ॥
न्यावा भद्रायु गृहीं त्वां याची सुमति सुव्रता माता ॥ ६२ ॥
ऐसें सांगुनि राजा नैषध अंतर्गृहांत जी होती ॥
सुमति शचीसी भव्या आणवुनि तयासि दाखवी तो ती॥६३॥
तेव्हां निजकर्मातें निंदी बहु वज्रबाहु तो लाजे ॥
स्वमनीं ह्मणे खरे ते अविवेका ह्मणति राहु तोला जे ॥ ६४॥
आलिंगी पुत्रात्रें भूतें भुजग जेविं चंदनाऽगातें ॥
कवि-शत ताप-हरत्वें तैसें चि गुणाढ्य-नंदना गातें ॥ ६५ ॥
हर्षें दशार्णपति बहु वर्षे प्रेमाश्रु रसिक सत्कृतितें ॥
तेविं दृढ धरी हृदयीं महिषीतें करि यथार्थ-सत्कृतितें ॥६६॥
चंद्रांगद सचिवां सह सत्कारी वज्रबाहु-भूपातें ॥
तत्परिवारातें ही पूर्ण करी मेघ जेविं कूपातें ॥ ६७ ॥
बहु निवुनि ह्मणति लोकीं न मिळाला मदितरां असा व्याही ॥
वाटे सुविरक्तजना संपत्ति अशा सदा असाव्या ही ॥ ६८ ॥
पाहुनि आदर नव नव बहु दिन सत्संगलाभ राहुनि घे ॥
सात्मज सदार सस्नुष पुसुनि निषधपतिस वज्रबाहु निघे ॥
आला स्वपुरास नृपति उत्सव निःसीम तत्पुरीं झाला ॥
प्याला हें सुचरित जो अमृतें हि न शक्र ही तसा धाला॥७०
वज्रभुज स्वर्गातें गेल्या वरि धर्मसन्नयें राज्य ॥
भद्रायु नृपाल करी संपादी गुरुवरें यश प्राज्य ॥ ७१ ॥
शिव-भक्ताची पूजा करुनि असा धन्य जाहला लोकीं ॥

तोकीं तात तमा शिव दासीं हें चरित सज्जना घोकीं ॥ ७२॥
अद्भुत कथा यथामति लिहिली ही रामनंदनें भावें ॥
शिवभक्त ह्मणोत शिवा करुणाब्धे या स्वसेवका पावें ॥७३॥

---

## अध्याय १४.

भद्रायु नृप वसंतीं रम्यवनीं कीर्तिमालिनी-सहित ॥
क्रीडाया गेला जों ऋषभवरें भूपमंडळीं मुदित ॥ १ ॥
तेथें दूर व्याघ्रें कांपविले विप्रदंपती पाहे ॥
ते आरडती ह्मणती रक्ष नृपा व्रत चि हें तुझें आहे ॥ २ ॥
ऐसें विप्र प्रार्थी तों व्याघ्र ब्राह्मणास झडपून ॥
धरिता झाला सहसा तत्कंठ स्वाननांत दडपून ॥ ३ ॥
हा नाथ हा महेश्वर हा शंकर हा उमेश हा कान्त ॥
ऐसा व्याघ्रें धरितां विप्रस्त्री करि उदंड आक्रान्त ॥ ४ ॥
भद्रायु अभय देवुनि शार्दूळीं विशिख-वृष्टितें सोडी ।
बहुतांतुनि एक हि शर न तयाचें एक लोम ही तोडी ॥ ५ ॥
अत्युग्र व्याघ्र हरी नाशुनियां जोडिलें यश स्त्रीतें ॥
झटला परि रक्षाया क्षमला भद्रायु तो न शस्त्री तें[3] ॥ ६ ॥
शार्दूळें स्त्री नेतां विप्र क्षोभे ह्मणे कशाला हो ॥
धनु धारिलें जें न ह्मणे शरणागत-रक्षणें यशा लाहो ॥ ७ ॥
तव दिव्य खड्ग शंख व्यर्थ द्वादशसहस्र-गज-शक्ति ॥
शिवकवचमंत्रविद्या शस्त्राऽस्त्रें निष्फला चि शिवभक्ति ॥ ८ ॥

---

१ बालकीं. २ हाय ३ यश.

कैसा रे क्षत्रिय तूं तुज न वनांतील वारवे जन्तु ॥
धर्मभ्रंश न घडतां मृत्यु बरा हा नव्हे बरा मन्तू[1] ॥ ९ ॥
करिसील काय देहा पोषुनि बहु मांस-मेद-मज्जा या ॥
मज्जायावन[2] न करुनि वांचसि कां अपयशांत मज्जाया[3] ॥१०॥
आर्त-त्राण-विहीना मरण बरें जीविता हुनि स्पष्ट ॥
इत्यादि बहु वदे द्विज पावे भद्रायु ऐकतां कष्ट ॥ ११ ॥
स्वमनांत ह्मणे झाला मत्पौरुष-कीर्ति-नाश कीं सहसा ॥
शोक चि भासेन पुढें होतों लोकांत मूर्तिमन्महसा[4] ॥ १२ ॥
होतां दैव-विपर्यय समयोचित धर्म जाहला नष्ट ॥
कष्ट ज्ञाता भंगें पावे जो तो न पन्नगें दष्ट ॥ १३ ॥
पुण्य कराया झटतां उत्कट पातक बळें गळां पडलें ॥
संपद्राज्यायुःक्षय होणार तरी च हें असें घडलें ॥ १४ ॥
आयुष्य भाग्य भोग स्त्रीपुत्र द्रव्य हे पदार्थ जसे ॥
दैवें पावति उदया विलया ही पावती क्षणांत तसे ॥ १५ ॥
या स्तव अंतीं संतीं गाया साधावयासि शुभ लोक ॥
या विप्रातें प्रिय ही प्राण समर्पुनि करीन गतशोक ॥ १६ ॥
ऐसा निश्चय करुनि ब्राह्मण-चरणां वरि क्षितीप पडे ॥
प्रार्थी बहुदीनरागें तनु-मानस देवुनि प्रसाद घडे ॥ १७ ॥
विप्रवरा व्याघ्र-हृत-स्त्रीच्या आतां शिरीं नको शोकीं ॥
या दासीं सकरुण हो असमर्थीं ही पिता जसा तोकीं ॥१८॥

---

१ अपराध. २ मत्-जाया-अवन-माझ्या स्त्रीचें रक्षण. ३ बुडाया. ४ मूर्तिमत्-मह-मूर्तिमान् तेजसा.

देतों इष्टार्थ तुझा चित्तीं हें वाक्य सत्य आणावें ॥
राज्य कलत्र कलेवर माझें त्वदधीन सर्व जाणावें ॥ १९ ॥
ब्राह्मण ह्मणे भिकारी जो त्याला कार्य बा गृहीं काय ॥
मूढास काय पुस्तक तैसा निस्त्रीक जो ह्मणे हाय ॥ २० ॥
त्यास धनें काय नृपा माग ह्मणसि तरि अभुक्तभोगा या ॥
हतदारा विप्रास स्वस्त्री दे त्वत्सुकीर्ति हो गाया ॥ २१ ॥
भद्रायु ह्मणे बा हा धर्म तुझा काय उचित मागावें ॥
यश जोडावें त्वां ज्यां ज्या कविनीं नित्य शुचितमा गावें ॥
देतों मणिकनकातें राज्यपदातें क्वचित् स्वदेहातें ॥
वरदार स्पर्श-दुरित ऐसें कोणी न घे न दे हातें ॥ २३ ॥
दे स्त्री समर्थ आहें ब्रह्मवधाद्यखिल पाप वाराया ॥
सुतपा मी ठावें मज गाधिसुता त्या हि ओपवा राया ॥२४॥
उडवीन महापाप हि सुतपें मी सर्वतापसा मान्य ॥
मग किति हें परदार- स्वीकारोत्पन्न पाप सामान्य ॥ २५ ॥
यास्तव दे निजभार्या धर्माऽधर्मज्ञ कुलज तूं नर कीं ॥
नाहीं तरि बुडसील चि भीताचें त्राण न करितां नरकीं॥२६॥
त्याला द्विजवचनें नृप कीं सत्य-अरक्षणें महादोष ॥
चित्तांत ह्मणे पत्नी-दानवरें ब्राह्मणासि हो तोष ॥ २७ ॥
पत्नीतें पावोनि ब्राह्मण हा फार हर्ष पावेल ॥
आपण जळोनि जावें ज्वलनीं लोकांत कीर्ति राहेल ॥ २८ ॥
भद्रायु महीपति तो दृढतर निश्चय असा मनीं आणी ॥

---

१ इच्छित. २ रक्षण.

ज्वलन प्रज्वलित करी पाणी सोडूनि दे द्विजा राणी ॥ २९ ॥
स्नान करुनि शुचि होउनि वंदुनि विबुधेश्वरासि तो भावें ॥
पावक उजवा घाली कीं आपण पात्र सुगतिला व्हावें ॥ ३०
ऋषभातें स्मरुनि नमुनि साम्बशिवध्यान धरुनि जो इद्ध ॥
पावक केला होता त्यांत शिरायासि जाहला सिद्ध ॥ ३१ ॥
तों प्रकटे भगवान् शिव भक्ता भद्रायुतें करी मुदित ॥
जेविं चकोरखगातें पूर्ण शरत्काल-चंद्रमा उदित ॥ ३२ ॥
शक्रादि लोकपाळक बहु आले नारदादि नाकर्षी ॥
चुंबक लोहासि तसा स्वजनासि शिवप्रसाद आकर्षी ॥ ३३ ॥
सुर वर्षति पुष्पांतें गाती गंधर्व अप्सरा नटती ॥
भद्रायु स्तुति करि जी प्रभुनें सप्रेम ऐकिली चट ती ॥ ३४ ॥
करितां स्तवन प्रकट प्रभुच्या हृदयांबुजांत होय दया ॥
ऐसें प्रसन्न होउनि बोले सेवक-मयूर-तोयद या ॥ ३५ ॥
राजा भजनें स्तवनें झालों परितुष्ट मी महेश मनीं ॥
भक्त-भवाच्या सालस मच्चरण कधीं हि वा न हो शमनीं ॥३६॥
भाव-परीक्षे करितां केला छळ परि कसीं उतरलास ॥
मी भक्तास स्वपदीं करितों सुस्थिर सदा सुतरलास ॥ ३७ ॥
ब्राह्मण तो मी च नृपा हे गौरी ब्राह्मणी खरें जाण ॥
मायामय शार्दूल व्यर्थ तुझे ह्मणुनि जाहले बाण ॥ ३८ ॥
मागीतली तव स्त्री राया म्या धीरता पहायला ॥,
चिर कीर्तिमालिनीची कीर्ति तुझी त्रिभुवनीं रहायाला ॥३९॥

---

१ प्रदीप्त.

भक्ति तुह्मां दोघांची भव्या झालों प्रसन्न वर माग ॥
परमागं प्रणताचा मी प्रभु पूर्वांग करिन चरमाग ॥ ४० ॥
भद्रायु ह्मणे दर्शन दिधलें केला प्रसाद हा च वर ॥
शक्रातें हि मम यशें पावुनि परिभव ह्मणेल हा चवर ॥ ४१॥
मी हे राज्ञी साध्वी मम माता तात वैश्य पद्मकर ॥
तत्पुत्र सुनय यांतें देवा निज-पार्श्वभाग-सद्म कर ॥ ४२ ॥
त्या कीर्तिमालिनीतें प्रभु माग ह्मणे मनांत जें इष्ट ॥
जनकातें जननीतें मागे सान्निध्य हर्षवी शिष्ट ॥ ४३ ॥
राजातें राज्ञीतें वरद प्रेमें अधीन होय मग ॥
गुप्त हि कीर्ति करी कीं गातां श्रोता कधीं न हो यमगं ॥४४॥
भद्रायु अयुतवर्षें राज्य करुनि दे पद स्वतनयातें ॥
शिवसन्निधान पावे गाती व्यासादि साधुजन यातें ॥ ४५ ॥
चंद्रांगद तज्जाया देवी सीमंतिनी हि तनुजातें ॥
देवुनि पद शिवलोकीं पावति पावोनि धन्यतनु ज्यातें ॥४६ ॥
लिहिली कथा यथामति भक्तमयूरें जपोनि आर्याहीं ॥
गावी श्रवण करावी पावाया भुक्ति मुक्ति आर्याहीं ॥ ४७ ॥

---

## अध्याय १५.

ऋषभ-प्रभाव कथिला शिवयोगी वामदेव या नावें ॥
त्याचें भस्माचें ही माहात्म्य अपार किमपि वानावें ॥ १॥
आत्माराम सुनिस्पृह समदर्शन मुनि दयाकुल-स्वान्त ॥

---

१ परम-अग-श्रेष्ठ कल्पवृक्ष. २ यमा जवळ जाणारा. ३ आर्याछंदांहीं. ४ श्रेष्ठांहीं.

भस्मोद्धूलित-विग्रह वल्कलधर जटिल भैक्ष-भुक् शांत ॥ १ ॥
साक्षात् शिवसा होता शिवयोगी वामदेव शिवशील ॥
यत्कीर्ति ह्मणे चंद्रा तमा लोकां किती निवशील ॥ २ ॥
क्रौंचारण्यांत तया प्रति पाहे ब्रह्मराक्षस क्रूर ॥
धांवे भक्षाया परि न चळे योगींद्र तो महाशूर ॥ ४ ॥
भुजदंडांहीं रगडुनि शिवयोगी ब्रह्मराक्षसें धरिला ॥
अंगस्पर्शें त्याचा तत्काल चि दोष सर्व ही हरिला ॥ ५ ॥
त्या ब्रह्मराक्षसाच्या नाशी योगींद्र पाप मोहातें ॥
चिंतामणि भव्य करी स्पर्शुनि तत्काळ जेविं लोहातें ॥ ६ ॥
जंबूतटिनीसंगें जेविं कनक होय मृत्तिका कांची ॥
मानस-वासें होती हंसाची तेविं वृत्ति काकाची ॥ ७ ॥
कीं अमृताच्या पानें नर होतो देव हें तसें झालें ॥
शिव-भक्तांऽग-स्पर्शें शांतत्व ब्रह्मराक्षसा आलें ॥ ८ ॥
सुचिर क्षुधित तृषित जो तो झाला परम तृप्त शिवें त्याला ॥
पूर्णानंदत्व तशा मग कां न शिरे पदासि शिवल्याला ॥ ९ ॥
शिवयोगि-देह-चर्चित भस्म-कण प्राप्त पूत तो स्मरण ॥
बहुजन्मांचें पावे विज्ञप्ति वरी करी धरी चरण ॥ १० ॥
बा करुणामृत-सिंधो शरणागत दीन जाण तार मला ॥
प्रणतोद्धारीं च सदा व्हाया यश पीनें जाणता रमला ॥ ११ ॥
शिवयोगी त्यासि पुसे बा तूं होतासि कोण कां गा या ॥
दुर्गतिस पावलास न संकोच करीं स्ववृत्त सांगाया ॥ १२ ॥

---

१ कच्ची. २ कल्याण. ३ स्वीकारिता झाला ४ पुष्ट.

राक्षस सांगे पूर्वी पंचविसाव्या भंवीं¹ कुमति कामी ॥
क्रोधी लोभी दुर्जय या नामें यवनराष्ट्रपति वा मी ॥ १३ ॥
वर्तत होतों निर्दय निर्लज्ज स्वप्रजघ्न मी स्वैर ॥
करिता झालों देव- ब्राह्मण-सर्वस्वहर सदा वैर ॥ १४ ॥
हरिल्या निजराष्ट्रींच्या परराष्ट्रींच्या हि बहु बळें योषा² ॥
होते स्वदार बहु परि तत्संगें पावलों न मी तोषा ॥ १५ ॥
त्रिशत ब्राह्मण-भार्या क्षत्रिय दारा चतुःशत स्वामी ॥
षट्शत वैश्य वधू ही हरिल्या न त्रासलों परस्वा मी ॥१६॥
शूद्रांगनासहस्रक चांडाली त्रिशत म्यां त्रपारहितें ॥
पुल्कस³-वनिता दशशत शैलुष⁴वधू हि पंचशत अहितें ॥ १७ ॥
वारांगना असंख्या सधवा विधवा रजस्वला नारी ॥
बहु भोगिल्या बळें म्यां पातक संपादिलें असें भारी ॥ १८ ॥
नित्य नवी आणावी जी भुक्ता⁵ स्त्री कधीं न ती मुक्ता⁶ ॥
न पुन्हा मजसीं होयिल इतरांसीं भोगिली कसी युक्ता ॥१९॥
या परि करिता झालों तरुणपणीं सत्यधर्म अत्याग ॥
ब्राह्मण पळोनि गेले केला आप्तें जनें हि मत्त्याग ॥ २० ॥
तरुण हि अनपत्य मग क्षयरोगें फार पीडलों मेलों ॥
पूर्वज पाडुनि नरकीं यमधर्माज्ञप्त पाप मी गेलों ॥ २१ ॥
रेतःकुंडीं पचलों अयुत-त्रय मग पिशाच मी झालों ॥
निजपाप शेष घेउनि जेंव्हां या कर्मभू वरी आलों ॥ २२ ॥

---

१ जन्मीं. २ स्त्रिया. ३ नामविशेष (अंत्यजांतील भेद) त्यांच्या स्त्रिया. ४ नटस्त्रिया हि. ५ भोगिली. ६ सोडिली.

दिव्यशरच्छत निर्जल- देशीं होउनि पिशाच मी भ्रमलों ॥
व्याघ्र अजगर हि पापें झालों वृक विड्वराह मी भ्रमलों ॥ २३
मग सरठ सारमेय हि होउनि झालों सृगाल वा नवमीं ॥
जन्मीं गवय हि दशमीं मृग मर्कट गृध्र नकुल हे भव मीं ॥ २४
तेरा पावुनि झालों वायस मग अच्छभल्ल पापानें ॥
वन कुक्कुट खर होउनि मार्जार हि नित्य आर्त तापानें ॥ २५॥
मंडूक कूर्म झालों मीन तथा आखु मी उलूक खग ॥
वनगज पंचविसाव्या जन्मीं हें ब्रह्मराक्षसत्व मग ॥ २६ ॥
भक्षाया तुज आलों व्याघ्र जसा गांठितो रुरु स खाया ॥
तारक झालासि मला देता न महासुखा गुरुसखा या ॥ २७ ॥
या ब्रह्मराक्षसत्वीं नित्य निराहारता क्षुधा भारी ॥
कैचें अन्न स्वामी प्याया शुचि न च कधीं मिळे वारी ॥ २८॥
मत्स्मृति वाढविली त्वां जसि वाढविजे शिखिप्रभा वातें ॥
वा पावलासि कोणा योगें या अद्भुत-प्रभावातें ॥ २९ ॥
शिवभक्त ह्मणे जैसा शंभुप्रभुच्या प्रसाद हसिताचा ॥
समज प्रभाव अद्भुत जो हा मद्गात्र लग्नभसिताचा ॥ ३० ॥
कोण शिवाहून इतर भस्माचें तत्व जाणतो भारी ॥
माहात्म्य जसें प्रभुचें भसिताचें ही तसें चि वा तारी ॥ ३१ ॥
पूर्वीं त्वत्सम होता विप्र द्रविडांत सत्पथ-भ्रष्ट ॥

---

१ दिव्य-शरत्-शत-देवांचीं शंभर वर्षे. २ गांवडुकर. ३ कुत्रा हि. ४ कोल्हा. ५ मुंगुस. ६ जन्म. ७ आस्वल. ८ बेडूक. ९ घुबड. १० सांबरास. ११ उदक. १२ अग्नितेज. १३ मत्-गात्र-लग्न-भसित माझ्या अंगास लागलेल्या भस्माचा.

शठ तस्कर वृषलिपती पापाचा राशि तनुघर स्पष्ट ॥ ३२ ॥
तो दुष्कर्मी रात्रौ शूद्रानें मारिला असें घडलें ॥
ग्राम-बहिर्देशीं त्या पाप्याचें शव तसें चि तें पडलें ॥ ३३ ॥
भस्मीं लोळुनि घेउनि वपु गेला त्या शवावरुनि कुतरा ॥
इतुक्यानें चि सुघोरा संसृति झाली तशासही सुतरा ॥ ३४ ॥
श्रीशिवदूत तयाला न्याया आले विमान आणून ॥
यमदूतातें पिटिती त्याचें अन्यायकर्म जाणून ॥ ३५ ॥
त्यासि यम पुसे याणें केले अतिपातका न पाहून ॥
नेतां कसे विमानीं ऐशा नरकोचितासि वाहून ॥ ३६ ॥
वदले शिवदूत यमा भस्मा पहा या शवाचिया निटिलीं ॥
वक्षीं भुज-युग-मूळीं याणें निःशेष पातकें पिटिलीं ॥ ३७ ॥
शंभु-निदेशें आलों त्या भव्यपदास हा यमा न्याया ॥
भस्म-प्रभाव झाला शिवसा चि सदा सहाय मान्या या ॥
या परि यमधर्मासीं बोलोनि शिवस्वरूप शिवदूत ॥
विप्र अनामय-लोकीं गेले घेऊनि जो भसितें-पूत ॥ ३८ ॥
भस्मप्रभाव ऐसा जेणें अतिपातकी हि नवदेहा ॥
बा स्पर्शलें अकस्मात् तें हें मद्गात्र-लग्न तवदेहा ॥ ४० ॥
भस्में त्वद्भ्रम गेला जातिस्मर जाहला शिवा समज ॥
मी नित्य चर्चितों हें याचा चि प्रिय सदैव वास मज ॥ ४१ ॥
तस्मात्-सर्वाघांचें संशोधन परम भस्म जाणावें ॥
हें श्रीशंभु-विभूषण शिव चि असें त्वन्मनांत बाणावें ॥ ४२ ॥

---

१ तरून जाण्यास सुघड. २ ललाटीं. ३ आरोग्यरूप लोकीं. ४ भस्मपवित्र. ५ कल्याणा, किंवा महादेवा.

शिवपूजनांत होतो भस्मातें धरुनि जलजंनाभ सितें ॥
बा चर्चितां शरीरीं हें करितें साधु खलजना भसित ॥ ४३ ॥
तो ब्रह्मराक्षस ह्मणे वर्णूं कैसें तुतें शिवसमातें ॥
भूदान-सुकृत होतें तेणें हा उगवला दिवस मातें ॥ ४४ ॥
त्या नृपजन्मीं भूमि ब्राह्मणमुख्यास जी दिली होती ॥
झाली सिद्ध कपाट- मोद्धाटन-पटुतरा किली होती ॥ ४५ ॥
वदला यम भूदानें जें त्या पुण्यें चि साधुसीं युक्त ॥
पंचविसाव्या जन्मीं होउनि होईल हा पुढें मुक्त ॥ ४६ ॥
होतें पूर्वभवाऽर्जित सुकृत किमपि तें चि या फळें फळलें ॥
कळलें सत्संगें चि स्वच्छ हृदय होय जें अघें मळलें ॥ ४७ ॥
भस्म समंत्रक दे मज विधि याचा सर्व सांग मज बापा ॥
पापा पासुनि सोडिव तव शरणागत न सांपडो तापा ॥ ४८ ॥
त्वादृश सत्पुरुष सकळ-लोक-हितीं रत सदा महामहित ॥
कल्पद्रुमसे दाते श्रित-हित इच्छिति कधीं हि न स्वहित ४९ ॥
हे सत्कथा यथामति लिहिली रामात्मजें भव तराया ॥
सद्भावें श्रोत्यांतें स्वमनांत हि सद्यशें अवतराया ॥ ५० ॥

---

## अध्याय १६.

श्री-वामदेव सांगे पूर्वीं मंदर-नगोत्तमीं धामीं ॥
होता सुर-वर मुनिवर- नुत जो कालाग्निरुद्र तो स्वामी ॥ १ ॥

---

१ कमळनाभ. २ शुभ्र. ३ कवाड उघडण्या विषयीं अतिकुशळ अशी.

नविसंबति नारद वै- श्रवणादि सुभक्ति माजि रमते ज्या ॥
तक्षक-वासुकि-कुंडल- धर शोभे सूर्य-कोटि-सम-तेजा ॥ २ ॥
प्रभुसि पुसे मोक्षाचा जो हेतु सनत्कुमार तो धर्म ॥
सांगे भगवान् पावे श्रवण करुनि सर्व सत्सभा शर्म ॥ ३ ॥
अल्पायास महाफल सर्वांचे सर्व दोष हरपावे ॥
ऐसें रहस्य पुसतां सांगे दे त्यासि दोषहर पावे ॥ ४ ॥
परमेश्वर रुद्र ह्मणे मोक्षद धर्मांत धर्म हा भारी ॥
वारी त्रिपुंड्र पापें सर्वां जीवांसि निश्चयें तारी ॥ ५ ॥
मज नमुनि दग्ध-गोमय- संभव-भस्में त्रिपुंड्र रेखावा ॥
बहु अभ्यास न करितां पुरुषार्थ स्ववश सर्व देखावा ॥ ६ ॥
भस्म-त्रिपुंड्र-धारण दुस्तर-संसार-सागरीं सेतु ॥
वत्सा सनत्कुमारा सर्वांच्या भक्तिमुक्तिला हेतु ॥ ७ ॥
भाळीं त्रिपुंड्र ज्याच्या रुद्राक्ष शिरीं करीं गळां काय ॥
तो चांडाल हि उत्तम पूज्य तया मोक्ष सर्वथा होय ॥ ८ ॥
प्राणी त्रिपुंड्र-धर जो यमनियमातें सदैव ही जपला ॥
तपला तीर्थीं न्हाला सप्त महामंत्र कोटि ही जपला ॥ ९ ॥
धरिल समंत्र अमंत्रक जो जन भाळीं त्रिपुंड्र तो धन्य ॥
उद्धरिल सहस्र कुलज झाले भावी हि जे पुढें अन्य ॥ १० ॥
कोणी त्रिपुंड्र-धारी पावेल न देह सोडितां कष्ट ॥
विधि-लोकीं हर-लोकीं राहेल सुखें न होइल भ्रष्ट ॥ ११ ॥
मग येउनि मल्लोकीं नद जलधिस तेविं पावणार मला ॥
मद्भक्त इतर-लोकीं मित्र-गृहीं जेविं पावणा रमला ॥ १२ ॥

कथिला परम रहस्य श्रुति-शत-सार त्रिपुंड्र बा सुघंडा ॥
श्रद्धा-हीन-जनीं त्वां न करावा सर्वथैव हा उघडा ॥ १३ ॥
ऐसें सांगुनि गुप्त प्रभु झाला त्या दया-सुधा-निधिचा ॥
गात अनुग्रह गेला विधिलोकातें सुपुत्र तो त्रिविधा ॥ १४ ॥
भस्माच्या संपर्कें झालासि स्वच्छबुद्धि या भाळीं ॥
तुझिया त्रिपुंड्र शोभे जैसा पूर्णामृतांशु आभाळीं ॥ १५ ॥
श्रीशिवयोगी ऐसें बोलुनियां ब्रह्मराक्षसास बरें ॥
अभिमंत्रुनि दे भस्म स्तविलें तें दान सत्सभेंत बरें ॥ १६ ॥
स्वललाटीं त्या भस्में राक्षस भव्य त्रिपुण्ड्र तो लावी ॥
दिव्य द्युतितें पावे जी रविरुचिशीं विशंक तोलावी ॥ १७ ॥
धरितां त्रिपुंड्र भाळीं तत्काळ ब्रह्मराक्षसत्व सरे ॥
तो दिव्यमूर्ति होय द्युति सर्वदिशांत कीर्ति ही पसरे ॥ १८ ॥
त्या सद्गुरुतें वंदुनि दिव्य विमानीं बसोनि हर्षानें ॥
श्रीशिवलोकीं गेला पूजित होऊनि पुष्प-वर्षानें ॥ १९ ॥
लिहिली कथा यथामति अतिभव्या रामनंदनें रसिकें ॥
कीं हरि-हर-भक्ति ह्मणति हें चि बरें कलियुगीं दुजें न शिकें ॥

---

## अध्याय १७.

श्रद्धा चि करितसे हित धर्माचें जेविं माय तनयाचें ॥
जप तप मख-गुरु-पूजा मुख्या श्रद्धा चि आयॆतन यांचे ॥ १

---

१ घडण्यास कठीण अशी. २ श्रेष्ठ. ३ स्थान, उपकरण. ४ धर्माचें.

श्रद्धेनें भजत्यातें पाषाण हि फलद होय जो अज्ञ ॥
तो ही सद्गुरु होतो अश्रद्धेनें वृथा महायज्ञ ॥ २ ॥
स्पष्ट अबद्ध हि मंत्र श्रद्धेनें जपतया जना फळतो ॥
जैसी श्रद्धा तैसी सिद्धि सुपरमार्थ हा बुधा कळतो ॥ ३ ॥
पांचाल-भूमिपतिचा सुत होता सिंहकेतु या नावें ॥
शक्राचा विजय जसा ज्याचें कविनीं गुणत्व वानावें ॥ ४ ॥
तो सिंहकेतु आत्मज गेला मृगया करावयास वनीं ॥
नानाजाति-तरु-लता-बहु-पक्षि-श्वापदांचिया भवनीं ॥ ५ ॥
त्याचा शंकरनामा भृत्य शबर एक काननीं शिरला ॥
फिरला तों दिसला बहु जीर्ण प्रासाद भग्न जो चिरला ॥ ६ ॥
तेथें पीठें जयाचें भग्न असें लिंग देखिलें पडलें ॥
मूर्त स्वभाग्य-दर्शन जाणों सुकृतें पुराकृतें घडलें ॥ ७ ॥
ऋजु सूक्ष्म शंभुलिंग स्वग्रहण-प्रेमसार दे शबरा ॥
वाटे त्याला झाला चिंतामणि-लाभ फार देश बरा ॥ ८ ॥
समेरिला पुराकृत- सुकृतांशोद्भव-वशें शबर वातें ॥
त्या नृपसुतासि दावी जें दे हृदयासि तोष बरवा तें ॥ ९ ॥
नमुनि ह्मणे प्रभुजी हें रुचिर श्रीशंभु-लिंग सांपडलें ॥
न कळे वनांत भग्न- प्रासादीं भिन्नपीठ कां पडलें ॥ १० ॥
सांगा विधि पूजावें शिवलिंग असें मनांत वाटतसे ॥
मार्गज्ञें उक्त जसे पथिकजन धरिति वनांत वाट तसे ॥ ११ ॥

---

१ आसन. २ पूर्वी केलेल्या पुण्यांशाच्या स्वाधीन अशा. (वातें या शब्दाचें विशेषण).

भूप ह्मणे संकल्प प्रथम करावा सदा मग ध्यान ॥
पाद्याचमनार्घ्यान्तीं घालावें निर्मलोदकें स्नान ॥ १२ ॥
गंधाक्षत नानाविध पुष्पें तरुचीं तसीं च वेलाचीं ॥
घेउनि नाम वहावीं त्रिदळें निवडूनि रम्य बेलाचीं ॥ १३ ॥
मग धूप दीप भावें नैवेद्य प्रभुसि नमुनि अर्पावा ॥
शंभु चिता-भस्माच्या उपहारें करुनि नित्य तर्पावा ॥ १४ ॥
प्रीतिकर पदार्थ शिवा न चिता-भस्मोपहारसा मान्य ॥
प्रेमें पूजन करितां सर्व प्रभु मुक्त होतसे धन्य ॥ १५ ॥
स्तवन करावें गावें नाचावें प्रभु पुढें न लाजावें ॥
स्पष्ट ह्मणावें जाइल सोडुनि सर्वस्व जरि मला जावें ॥ १६॥
सर्वाऽघौंचा होतो प्रभुची होतां दया विनाश बरा ॥
मुख्य चिता-भस्म नको अन्य प्रभुला तया विना शबरा ॥१७॥
रे शबरा किंबहुना अंतर पडतां स्वदेह सोडावा ॥
मोडावा न नियम दृढ भजनें भगवत्प्रसाद जोडावा ॥ १८ ॥
ऐसें नृपसुत सांगे परिहास-रसें परंतु तें उक्त ॥
स्वीकारी वंदुनि मग जाय गृहीं होय अर्चनीं युक्त ॥ १९ ॥
स्त्रीसह साधु शबर तो स्वीकृत नियमें सदा परम-हर्षें ॥
त्या नृपसुतोक्त-विधिनें पूजी श्रीशंभुतें बहुतवर्षें ॥ २० ॥
एकेदिवशीं उघडुनि पाहे जों शैव शबरवर पात्र ॥
त्यांत चिता-भस्म नसे प्रभुतें अर्पावयास अणुमात्र ॥ २१ ॥

---

१ चिता-भस्म-उपहार-चिताभस्मरूप नजराण्या सारिखा. २ सर्वपापांचा. ३ थट्टेनें.

शबर चिताभस्मातें शोधाया दूरवर बहु श्रमला ॥
कोठें ही न मिळालें आला स्वगृहासि अतितर श्रमला ॥ २२॥
प्राप्त-विषाद निषाद क्षण निजकर्मासि दोष तो लावी॥
युक्ति पुसाया करितां स्वसमीप स्वप्रियेसि बोलावी ॥ २३ ॥
तीतें ह्मणे हुडकिली जी नित्य प्रेतपरिचिता भू ती ॥
अजि माझ्या दुष्कर्में न मिळाली लेश परि चिताभूती ॥२४॥
काय करावें आतां श्रीशिव-पूजेसि विघ्न कीं झाला ॥
पूजे विना प्रिये मी वांचें ना मृत्यु सर्वथा आला ॥ २५॥
मुख्य चिताभस्म चि कीं दयिते तत्प्राप्तिचा उपाय नसे ॥
गृहिणि प्रभु शि वहातों मी पंचप्राण हे उपायनसे ॥ २६ ॥
श्रीगुरु-शासन-लंघन करणें अपराध सर्वथा खोटा ॥
आगसें लक्ष वरकड हि एकि कडे एक होय हा मोटा ॥ २७॥
तेव्हां प्रसन्नचित्तें ऐसें सांगे तयास ती शबरी ॥
मत्तनु भस्म वहावें करिल तुह्मां वरि दया सतीश बरी ॥ २८॥
दीप्त करुनि गृह जळतें न चिताभस्मोपहार लोपावा ॥
कोपावा न स्वगुरु स्वामी सत्वर ह्मणा चि हो पावा ॥ २९॥
शबर ह्मणे गृहिणि विषय सेवुनि झाली न कामना-पूर्ती ॥
तरुणी अनपत्या तूं त्यजिसी सर्वार्थदा कसी मूर्ती ॥ ३० ॥
स्त्री त्यासि ह्मणे यांत चि जीवित-साफल्य हें चि जोडावें ॥
इतरार्थ त्यागावें देह मग शिवार्थ कां न सोडावें ॥ ३१ ॥
तुमचें माझें तुमच्या माझ्या हि प्राप्तपुण्य पितरांचें ॥

---

१ भूमि. २ अपराध. ३ पार्वतीपति. ४ देह.

शिव-पूजन करित्यांचें सार्थक्य विलोकित्यां हि इतरांचें ॥३२
त्या दृढसंकल्पें तो संकल्पा सत्य शबर वाखाणी ॥
आज्ञा दे वेंचाया समयीं निधि काय न बरवा खाणी ॥ ३३॥
स्नाता अलंकृता ती पतितें वंदूनि पेटवी गेहा ॥
मग आपणा ह्मणे हित दहन शिवातें च भेटवी गे हा ॥ ३४
नमुनि प्रदक्षिण करुनि दहनातें प्रार्थुनी विषादीनें ॥
विश्वें जो आठविला धरिलें तद्ध्यान त्या निषादीनें ॥ ३५॥
अनलीं प्रवेश करितां कर जोडुनि ती ह्मणे घडो सेवा ॥
मम इंद्रियें प्रसूनें होउत तुज कारणें महादेवा ॥ ३६ ॥
वपु अगरुधूप करणें अक्षत-हृदय-प्रदीप बा शर्वा ॥
पावो हा जीव विभो तुझिया पूजेचिया फला सर्वा ॥ ३७ ॥
मज सार्वभौमपद कीं शक्रपद ब्रह्मपद हि लागे ना ॥
भागे ना सेवेतें दासी ही अन्य अर्थ मागे ना ॥ ३८॥
जन्म घडेल पुन्हा तरि हे[१] हो त्वत्पाद-सारसीं[३] अलिनी[४] ॥
तव भजनें च असावी हृष्टा रविदर्शनें जसी नलिनी ॥ ३९ ॥
चालो चालत आला तैसा चि पुढें हि जन्म-नाश-पथ ॥
शंभो बा हे माया न स्पर्शो द्यावि मन्मना शपथ ॥ ४० ॥
वपु सार्थक हो राहो न चिताभस्मोपहार अन्न मनें ॥
ध्यावें तेंवि तुज शिवा त्वच्चरणा शत असोत मन्नमनें ॥ ४१ ॥
ऐसें प्रभुतें प्रार्थुनि शबरी दृढ-निश्चया शिरे दहनीं ॥
भस्म क्षणांत होय ज्वलन व्यापी मृगी जसी गहनीं[५] ॥ ४२ ॥

---

१ पुर्व्हे. २ मी निषादी. ३ तुझ्या चरणकमलीं. ४ भ्रमरी. ५ अरण्यीं.

शबर हि यत्नें घेउनि भस्म भय धरोनि न स्फुलिंगाचें ॥
स्वस्थमनें पूजन करि दग्ध-गृह-समीप शंभुलिंगाचें ॥ ४३ ॥
पूजान्तीं दयितेतें शबर स्मरला मनांत कीं राहे ॥
पार्श्वीं सदा प्रसादा घ्याया जी समय सविनया पाहे ॥ ४४ ॥
शबरें प्रिया प्रसाद- ग्रहण-रता जों मनांत आठविली ॥
तों चि प्रभुनें शबरी पहिली जी ती तसी च पाठविली ॥४५॥
शबरी शबरासि दिली तैसी च प्रसुन-वृष्टि युक्त बरी ॥
जाणो सच्छळ करिती प्रभुला हि मनांत वाटली न बरी ॥४६
दयितेतें अवलोकी तो शबर समक्ष भस्म जी झाली ॥
आली ती च नव तसी श्रीसीतेची कसी नव्हे आली ॥ ४७ ॥
भस्माऽवशेष गृह जें तें हि यथापूर्व शबर तो पाहे ॥
विस्मित तटस्थ राहे माया कीं स्वप्न-मात्र हा वाहे ॥ ४८ ॥
तो स्त्रीस पुसे दयिते मज देखत पावकीं गळालीस ॥
आलीस कसी पेंडी शुष्क कुशांची तसी जळालीस ॥ ४९ ॥
गृह हि जळालें असतां पुनरपि पहिलें तसें कसें झालें ॥
घालें अग्निजठर कीं ओकालें हें फिरुनि जड कसें आलें ॥ ५० ॥
शबरी सांगे स्वामी केला ज्वलनीं प्रवेश हा मात्र ॥
स्मरतें कांहीं मग मी जाणें न दहन न आपुलें गात्र ॥ ५१ ॥
निजलीसि असें अवयव जाणतसें स्वस्थ आपुले शमला ॥
श्रम लाभें अमृताच्या तैसा नाहीं च ताप लेश मला ॥ ५२ ॥
निजलें होतें जाणों जागी झालें प्रसाद मागाया ॥
शिवपूजान्तीं आलें मी स्वामीच्या पदासि लागाया ॥ ५३ ॥

१ अग्निकणाचें. २ सखी.

इत्यादि शबर शबरी विस्मित होऊनि वदति तों आलें ॥
सहसा विमान भास्कर- मंडलसें भव्य उतरलें खालें ॥ ५४ ॥
दूत शिवाचे चवघे अवघे शिवरूप ते वर विमान ॥
घेउनि आले ज्यांतें पाहुनि न धरील देव रवि मान ॥ ५५ ॥
शबरातें शबरीतें धरुनि करीं बसविती मग विमानीं ॥
तों त्यांच्या दीप्ति पुढें कांहीं निजदीप्तितें न रवि मानी ॥५६॥
शिवदूत-करस्पर्शें न त्याजितां देह दिव्यता आली ॥
शबर सखा शक्राचा शबरी इंद्राणेचा गमे आली ॥ ५७ ॥
शिव दूत प्रभुचे जे यापरि बहु दिव्यरूप देऊन ॥
सानंद शबर शबरी गेले श्रीशिवपदासि घेऊन ॥ ५८ ॥

---

## अध्याय १८ वा.

आतां उमामहेश्वर- नाम-व्रत-सत्प्रभाव वानावे ॥
काना वात हि यांचा लागलिया जीव धन्य मानावे ॥ १ ॥
होता देवरथ द्विज आनतीं बहु भला तया तनया ॥
ती शारदाभिधाना रूपवती गुणवती अपातनया ॥ २ ॥
तीतें मृतदार धनी शूरकुलज पद्मनाभ या नावें ॥
ब्राह्मण वृद्ध हि मागे ज्या सर्वांहीं सदा हि भानावें ॥ ३ ॥
देता झाला धन्या कन्या त्या परप-रत-लोभ्याला ॥
याच्ञा-भंग कराया देवरथ द्विज हिं साधु तो भ्याला ॥४॥
मध्यान्हीं पाणिग्रह- विधि विप्र-प्रोक्त आदरें केला ॥

---

१ सखि. २ कन्या. ३ न टाकिली नीति जीगें असी. ४ याचनाभंग.

मग पद्मनाभ सांजे संध्ये करितां सरोवरा गेला ॥ ५॥
संध्योपासन करुनि द्विज फिरला तों तमीं तया व्याळें ॥
डसला डसतां चि पथीं तत्काळ प्राप्त जाहला काळें ॥ ६ ॥
त्या पद्मनाभ-मरणें ती बाळा शारदा तिचे पितर ॥
तें दुःख किति वदावें हाय ह्मणुनि मोह पावले इतर ॥ ७ ॥
संस्कारुनि मृतातें गेले स्वस्वस्थळासि ते लोक ॥
वाढे बहुत चि वसतां जनक-गृहीं शारदामनीं शोक ॥ ८ ॥
झाली क्षीणशरीरा शोकाग्नि करील कां न हुत मास ॥
विधवा होउनि कंठीं पितृसदनीं शारदा बहुत मासे ॥ ९ ॥
द्विज अंध वृद्ध नैध्रुव-नामा त्या देवरथ-गृहा आला ॥
त्याला विधवा कन्या बहु पूजी सुप्रसन्न तो झाला ॥ १० ॥
तो द्विज वदला वत्से पतिसह करिसिल विहार तूं सुचिर ॥
तुज एक पुत्र होइल गुणवान् रूपें करुनि जो रुचिर ॥ ११ ॥
लोकीं तव कीर्ति असो विभव भजो तुज सदा जसा दास ॥
माझ्या आशीर्वादें योग्या हो देवता-प्रसादास ॥ १२ ॥
ती बाळा त्यासि ह्मणे बा आशीर्वाद तव सदा साचे ॥
साक्षात् कल्पद्रुमसे हे करिती पूर्ण नवस दासांचे ॥ १३ ॥
परि मी विधवा बाळा माझ्या ठायीं तुझी तसी आशी ॥
छिन्नलते वरि जैसी वृष्टि शुनी जेविं सत्क्रिया नाशी ॥ १४ ॥
मी परम मंदभाग्या मज आशीर्वाद हा कसा फळतो ॥
चळतो स्पर्शमणी बा महिमा दावी न खर्परीं बळ तो ॥ १५ ॥

---

१ सर्प. २ मृत्यु. ३ महिने.

विप्र ह्मणे त्या अंधें नेणुनि आशी तुला दिली जरि ती ॥
न रिती पडेल वत्से दास-वचन सत्य शिव-शिवा करिती ॥
कथितों उमा-महेश्वर- भव्य-व्रत हें मुली जपोनि करीं ॥
करिल कृपा सांब असें जें यांत न तेज तें तपो-निकरीं ॥१७॥
ती नमुनि ह्मणे स्वामी उपदेशावें तनू न लक्षीन ॥
करिन व्रत दुष्कर ही यमनियमातें जपोनि रक्षीन ॥ १८ ॥
मुनि सांगे चैत्रीं कीं मार्गी उत्तम दिनीं सितीं पक्षीं ॥
व्रत आरंभावें हें पापीं शिखितेज तें जसें कक्षीं ॥ १९ ॥
तिथि अष्टमी सुपुण्या तैसी च बरी चतुर्दशी श्रेष्ठा ॥
या दोहीं पक्षींच्या सांबशिवाराधनीं अति-प्रेष्ठा ॥ २० ॥
मंडप रम्य करावा त्या मध्यें पंचवर्ण सत्पद्म ॥
तन्मध्य-धान्यराशि- स्थितकलशोपरि सुवस्त्र शिवसद्म ॥२१॥
प्रतिमा उमामहेश्वर यांची कांचन-विनिर्मिता भावें ॥
ती पूजावी संध्या- काळीं येणें अभीष्ट लाभावें ॥ २२ ॥
सांबशिवाचें पूजन नियमानें षोडशोपचारांहीं ॥
हें वर्षभरि करावें नामाहीं सांग होय सारांहीं ॥ २३ ॥
विप्राज्ञेनें रात्रौ क्षीर-विमिश्रित हविष्य भक्षावें ॥
वर्षभरि करावें हें व्रत उद्यापन हि इष्ट लक्षावें ॥ २४ ॥

---

१ मार्गशीर्षमासीं. २ गवतीं. ३ तत्-मध्य-धान्यराशि-स्थित-कळश-उपरि-त्या सत्पद्माच्या मध्यभागीं ठेविलेल्या कलशावर. ४ श्रेष्ठांहीं. ५ दूधमिश्रित. ६ पवित्र अन्न.

या सद्व्रत-प्रभावें त्रिःसप्त पळांत पितर उद्धरती ॥
सांब शिवाच्या भजनीं वृद्धि प्रति पावतीच शुद्ध रती॥२५॥
व्रतसुकृतें विधिलोकीं हरिलोकीं प्राप्त होतसे वास ॥
शिवलोकीं कल्पशत स्थिति पावे भक्त त्या चि देवास ॥२६॥
आला उपदेश मना श्रद्धेनें शारदा धरी चित्तीं ॥
प्रीति व्रतीं बहु तिची लोभ्याची जेविं वाढते वित्तीं ॥ २७ ॥
जनकजनन्यादि तिचे आप्त हि आले तयांसि तें कळलें ॥
झाले प्रमुदित वदले वत्से त्वद्भाग्य सर्वथा फळलें ॥ २८ ॥
सांग व्रत सिद्धिप्रति पावाया तो महर्षि राहविला ॥
कीं गुरुसन्निधिनें चि प्रारंभपरार्थपार पावविला ॥ २९ ॥
ते ही गुरुनें कथिल्या मार्गें व्रत आचरावया लागे ॥
मागे पतिसंग मनीं अनुदिन यम-नियम-रक्षणीं जागे ॥ ३० ॥
लिहिली कथा यथामति रामसुतें गुरुसि हस्त जोडून ॥
सोडून खलभयातें रसिकाचें मन न लेश मोडून ॥ ३१ ॥

---

## अध्याय १९.

सांबशिव व्रत करितां नियमें निर्विघ्न लोटला अब्द ॥
गुरुच्या पद-प्रसादें लागों दिघला न लेशही शब्द ॥ १ ॥
उद्यापन हि यथाविधि केलें मग विप्र-भोजन हि भावें ॥
गुरुजन वदले वत्से सत्वर तुझिया करासि फळ यावें ॥ २ ॥
जनक-गृह-समीप मठीं गुरुसन्निध मंत्रजप करित राहे ॥
राहे तो उपवास ध्यानीं श्रीसांब-शिव-चरण पाहे ॥ ३ ॥

ता नैर्ऋत्यहि उपोषित बसला होता समाधितें धरुनी ॥
स्मरुनि श्रीगौरीतें श्रीशंभु-प्रार्थना मनीं करुनी ॥ ४ ॥
करुनि कृपा विप्रा वरि विप्रसुता-शारदे वरि हि देवी ॥
श्रीजगदंबा रात्रौ प्रकटे यश सत्सभा जिचें सेवी ॥ ५ ॥
प्रकट शिवा होतां त्या अंधासी प्राप्त जाहली दृष्टी ॥
सृष्टि-प्रसू नतीं ती जैशी वत्सीं दयावती गृष्टी ॥ ६ ॥
तो द्विज जगदंबेच्या पायां वरि पुष्पसें चि शिर वाहे ॥
ती शारदा धरी श्री-चरण ह्मणे आपणांत शिरवा हे ॥ ७ ॥
त्या दोघांतें उठवुनि निरुपमलीला-विलास-सद्मानें ॥
स्पर्शे माथां देवी दुर्गा श्रीमत्-स्वहस्त-पद्मानें ॥ ८ ॥
विश्वेश्वरी वदे वर विप्रवरा व्यक्त काय अर्पावे ॥
वात्सल्यें मातेनें इष्टार्थें भक्त-तोक तर्पावे ॥ ९ ॥
झालें प्रसन्न-हृदया दुर्लभ देवांस ही असें मागा ॥
देतें अभिमत पावुनि गाया मत्कीर्ति-सुरभितें लागा ॥ १० ॥
नमुनि स्तवुनि मुनि ह्मणे वरदे परदेवते सदाधारे ॥
ब्रह्मादिकांसि ह्मणती त्वत्पदपद्में सुखें सदा धारे ॥ ११ ॥
अंधपणीं वदलों या कन्येतें करुनि पतिसह क्रीडा ॥
पुत्रवती हो ऐसें विधवा जाणोनि पावलों व्रीडा ॥ १२ ॥
तें माझें आशीर्वच सत्य तुवां मंद पणें करावेंच ॥
माते अलर हि यश घे धनिक ह्मणे मार्गकण करावें च ॥ १३ ॥
भगवति भक्तां आह्मां किंपाचें जें जगांत यश आहे ॥
तें त्वत्पदप्रसादें लेश न असतां अनुग्रह न राहे ॥ १४ ॥

---

१ एकदा व्यालेली गाई. २ भक्तबालक. ३ लज्जा. ४ परंतु.

जगदीश्वरी ह्मणे मी आलें तुमच्या करावया कार्या ॥
हे भामिन्यऽभिधाना होती द्रविड-द्विजातिची भार्या ॥ १५ ॥
पूर्वभवीं चातुर्यें रूपें वश्यादिकैतवें मतितें ॥
मोहुनि वश करिती हे झाली अत्यंत सर्वदा पतितें ॥ १६ ॥
ज्येष्ठस्त्रीसीं पतिसीं मन मोहुनि पाडिलें इणें विपट ॥
ती अनपत्या मेली पति-विरहें दुःख पावली निपटें ॥ १७ ॥
त्या पापें या जन्मीं हे विधवा विप्रसत्तमा झाली ॥
कीं ज्येष्ठ-सपत्नीचा करितां घात न मनांत हे भ्याली ॥ १८ ॥
ज्या पति-पत्नी-विप्रिय हे लोकीं जोडिती महापाप ॥
त्या होति बाळविधवा जन्में त्रिःसप्त भोगिती ताप ॥ १९ ॥
शेजारी विप्र तरुण ईच्या संगार्थ फार यत्न करी ॥
या सुंदरीस पाहुनि कामार्तचिं कुचित्त हस्त धरी ॥ २० ॥
नेत्रें करूनि शोणें ब्राह्मण झिडकाविला इणें रोषें ॥
मेला हाय ह्मणत तो ईच्या अप्राप्ति-संभवें दोषें ॥ २१ ॥
या जन्मीं तोच इचा पाणिग्रह करूनि पावला मरण ॥
वैधव्य-दुःख-दायक झाला नव्हतें हि जरि तया स्मरण ॥ २२ ॥
त्या जन्मीं परि मातें भजली होती तया स्तव स्वल्प ॥
घडला भोग मुनिवरा लागावा स्पष्ट अन्यथा कल्प ॥ २३ ॥
प्राग्जन्मपति इचा जो तो द्विजवर पांड्यजनपदीं झाला ॥
श्रीमान् सदार सात्मज आहे स्वर्मी भजेल हे त्याला ॥ २४ ॥
सार्ध-त्रिशत-दशोत्तर योजन येथून दूर तो आहे ॥

---

१ पूर्वजन्मीं. २ वैमनस्य, वांकडेपणा. ३ अत्यंत. ४ एकवासि

स्वप्नीं इजसीं नित्य क्रीडेल ह्मणेल नच कधीं हा हे ॥ २५ ॥
स्वप्नींच्या पतिसंगें होइल या एक पुत्र मुलगोतें ॥
तो निववील पितरांतें आत्मयशें सर्व-सुकवि-कुल-गीतें ॥ २६ ॥
स्वप्नींचा पति संगें पुरविल अभिलाष तो विलासाचा ॥
त्यां स्वसुत स्वपरिग्रह तैसा चि कळेल पति इला साचा॥२७
पूर्वभवीं आराधन माझें या ही भवीं इला घडलें ॥
झडलें पातक केवळ अस्मद्ध्यानीं च मन इचें जडलें ॥ २८ ॥
या स्तव वरदान इला अपांया प्रकट जाहलें आहे ॥
तर्पील चि वृष्टि करिल जरि लक्षुनि मार्ग चातकी आहे॥२९॥
ऐसें मुनिसीं बोले मग देवी शारदेसि हें सांगे ॥
वत्से मी भक्तजना पावें ना शरण आलिया कां गे ॥ ३० ॥
स्वप्नीं अनुभव ज्याचा येइल तो परम प्रिय तुझा कर्ता ॥
हर्ता त्हत्तापाचा दैवें भेटेल जेधवां भर्ता ॥ ३१ ॥
सुतरत्न व्रत सुकृत हि तूं देवुनि तत्करीं तया जवळ ॥
वस वश होउनि वत्से होइल कलियुग हि सद्यशें धवळ॥३२॥
प्रत्यक्ष अंगसंग स्वप्ना वांचुनि कधीं नसावा गे ॥
वागो तव देह जसा पतितीं स्त्रीचा अधीनसा वागे ॥ ३३ ॥
त्वां सहगमन करावें जेव्हां पावेल मृत्यु पति तनये ॥
शिवपद वरिशील भवीं जेथुनि होऊनि भक्त पतित न ये॥३४
ऐसें कथुनि अद्दश्या होय शिवा शारदा तया गुरुतें ॥
नमुनि ह्मणे बा साधुनि दिधलें त्वां त्रिभुवनांत जें गुरु तें॥३५॥

---

१ पतीला. २ स्वस्त्री. ३ मोठें.

नैध्रुव मुनि एकान्तीं जगदंबेनें प्रमाद जो केला ॥
कर्णीं कथुनि सदारा देवरथा पुसुनियां तया गेला ॥ ३६ ॥
ती शारदा प्रतिक्षण पावे स्वप्नांत कान्त संगातें ॥
वरदान भगवतीचें वर्णी सप्रेम नित्य गंगा तें ॥ ३७ ॥
मग झाली गर्भवती ग्रामस्थजनासि कर्म तें कळलें ॥
मळलें पितृ-मुख ह्मणती धिक्कुलजे मन तुझें कसें चळलें ३८
जो सर्पदष्ट मृत पति कोणी पाहति बरे न तज्ज्ञाती ॥
स्पष्ट भ्रमली गमली कुलटा सर्वां जना अतज्ज्ञा ती ॥ ३९ ॥
ती शारदा सभेंत क्रोधें आणूनि कारिति बभ्रा ते ॥
दभ्रा तेव्हां गमली मूर्ति हि भ्राते खरें च अभ्राते ॥ ४० ॥
ह्मणती पापे जारिणि उपजत चि न पावलीस कां मरण ॥
तुज विधवेसि कसा गे आठवला नरक-हेतु कामरण ॥ ४१ ॥
कोणी वदले नासा- कर्ण-च्छेदन करूनि सोडावी ॥
बोडावी किति वदले किति ह्मणती हे कुबुद्धि झोडावी ॥ ४२
ऐसे वदले झाले सिद्ध करायासि तों नभोवाणी ॥
गगनीं प्रकटे आणी प्रेमळ-नयनांत तत्क्षणीं पाणी ॥ ४३ ॥
जन हो मन हो तुमचें न भ्रांत स्त्री सती न गांजावी ॥
धैर्य पहातां चि इचें त्यजुनि अहंता महानगां जावी ॥ ४४ ॥
स्वप्नीं हि इच्या केलें न कुळ मळायासि पापलेश मनें ॥
हे जेथें तेथें न च धाडावे दूत आपले शमनें ॥ ४५ ॥
या वरि ह्मणेल जो या साध्वीतें जारिणी असें दुष्ट ॥

---

१ यमधर्मानें.

तत्क्षणिं चिरेल त्याची जिव्हा प्रकटेल तन्मुखीं कुष्ट ॥४६॥
साधु ह्मणेल तया या परलोकीं ही सुखा मग न वाणी ॥
ऐसी झाली सहसा आयकिली त्या जनें गगन वाणी ॥ ४७॥
देवरथ सदार तया वाणीतें श्रवण करुनियां हर्षें ॥
होउनि नतमुख सज्जन सर्व प्रेमाश्रु तेधवां वर्षे ॥ ४८ ॥
त्यांत किति अविश्वासें वदले वाणी मृषाच हे वाटे ॥
फाटे त्यांची जिव्हा कृमिकुल ही तत्क्षणीं मुखीं दाटे ॥ ४९ ॥
जन सर्व शारदेचें लागे प्रार्थुनि सभाजन कराया ॥
तत्ताता धन्य ह्मणति जैशी सज्जन-सभा जनकराया ॥ ५० ॥
बहु साधु साधु वदले वृद्ध ज्ञाति स्त्रिया तिला लोभें ॥
आलिंगुनि समजावुनि ह्मणती वत्से सुकीर्तिनें शोभें ॥ ५१ ॥
किति जन ह्मणती दैवत मिथ्या न वदे चि नियम हा भारी॥
गर्भवती होऊनि हि शीलभ्रष्टा कसी न हे नारी ॥ ५२ ॥
ऐसें तेव्हां झालें सभ्य हि जनचित्त संशयाविष्ट ॥
शिष्ट ब्राह्मण बोले जैसा आम्नाय बोलतो इष्ट ॥ ५३ ॥
श्रुत दृष्ट विश्व जें हें मायामय यांत सर्व ही घडतें ॥
अडतें विधिमन जेथें कार्य न मायेसि लेश ही जडतें ॥ ५४ ॥
वीर्य विभांडक-मुनिचें नद्युदकसमेत तें मृगी प्याली ॥
व्याली महर्षितें हे कर्णीं कविवर-मुखें कथा आली ॥ ५५ ॥
मुनि-मंत्रबळें झाला युवनाश्वनृपासि गर्भ हे हि कथा ॥
अत्यद्भुता पुराणीं तुमच्या आली असे चि कर्णपथा ॥ ५६ ॥

---

१ कमताई. २ नदी-उदक समेत-नदीच्या पाण्या बरोबर.

तैसी च सुराष्ट्र-नृपति- हस्त-स्पर्शें मृगांगना धाली ॥
झाली गर्भवती ती तत्काल सुतापसा सुता व्याली ॥ ५७ ॥
तैसी हे ही नैध्रुव- मुनि-पद-भजनें महाव्रताचरणें ॥
झाली गर्भवती हें जी माया शांभवी तिचें करणें ॥ ५८ ॥
या अर्थीं एकांतीं अप्तांच्या शुद्धकीर्ति ज्या भार्या ॥
त्या शारदेसि मान्या अन्या हि पुसोत बायका आर्या ॥ ५९ ॥
या पूज्य-पुरुष-वाक्यें एकांतीं शारदेशि ज्या सुसती ॥
गर्भ-प्राप्ति अकस्मात् वद वत्से तुज कसी असें पुसती ॥६०॥
ती सद्गुरूपदिष्ट- व्रत-माहात्म्यें करूनि जो घडला ॥
गौरी-प्रसाद सांगे त्यांच्या विश्वास मानसीं जडला ॥६१॥
गहिंवरल्या बहु साध्वी त्या वदल्या शारदेसि तूं धन्या ॥
अन्या बहु कुलजन्या परि वत्से त्वत्समा नसे कन्या ॥६२॥
आर्धीं पुष्कळ नेणुनि तें कन्यारत्न अनघ रागेले ॥
मग साधु साधु वदले बहुमान करूनि जन घरा गेले ॥ ६३ ॥
ती प्रसवली पितृगृहीं शुभकाळीं शारदा सु-तनयातें ॥
द्विज वदले मद लेशहि धरिल विलोकुनि शचीसुत न यातें ॥
उपनयनान्त सुसमयीं केले संस्कार सर्व आजानें ॥
वर चि करील हित ह्मणे याचें होईल काय माज्यानें ॥६५॥
ऋग्वेद अष्टमीं ये पाठ यजुर्वेद रविसमा नवमीं ॥
ज्या सामवेद दशमीं त्या हि ह्मणों काय कविस मानव मीं ६६
गोकर्णातें यात्रा शिवपर्वीं सुकृतसंचयें नेली ॥

---

१ तृप्त झाली. २ पापरहित.

पितृ-मातृ-बंधु-सहिता ससुता ती शारदा स्वयें गेली ॥ ६७ ॥
स्वप्नीं संग जयासीं तो आला पूर्व-जन्म-पति हि तया ॥
ती शारदा विलोकी दर्शन तीचें हि होय अति हित या ॥ ६८ ॥
स्वप्न-परिचित स्वपति स्पष्ट असें शारदा-मनीं बाणे ॥
तो ही विप्र स्वस्त्री स्वसुत असें स्वप्न परिचयें जाणे ॥ ६९ ॥
रोमांचित-तनु होउनि त्या चि कडे शारदा सती पाहे ॥
राहे चित्रसम उभी जळ खळखळ लोचन -द्वयें वाहे ॥ ७० ॥
तो विप्र ह्मणे भद्रे कांहीं पुसणें तुला मनीं आहे ॥
एकान्तीं चाल असें बोलों एकी कडे तिला बाहे ॥ ७१ ॥
एकान्तीं वृत्त पुसे गहिंवरलिस दर्शनें ह्मणे कां गे ॥
निज-कुल-नाम हि दुःसह वैधव्यप्रभृति[१] दुःख ती सांगे ॥
पुनरपि हास्य करुनियां कौतुंकि[२] ब्राह्मण असें पुसे तिस तो॥
भद्रे वद कोणाचा हा पुत्र सुरूप चंद्रसा दिसतो ॥ ७२ ॥
ती शारदा ह्मणे हा मन्नंदन शारदेय या नावें ॥
मानावें बहु यातें मेधाविशतें सदैव वानावें ॥ ७४ ॥
विप्र ह्मणे भद्रे तूं जरि ह्मणसी पुत्र आपुला याला ॥
वदलीस बाळविधवा मीं ऐसें पुत्र हा कसा झाला ॥ ७५ ॥
ऐसें विप्रें पुसतां नम्रमुखी होय शारदा लाजे ॥
राजे ह्मणति कवींचे लवली लवलीलता[३] तसी साजे ॥ ७६ ॥
ती धैर्य धरूनि ह्मणे झाला उपहास बहु पुरे स्वामी ॥

---

१ वैधव्य इत्यादिक. २ ज्यास कौतुक झालें तो. ३ नाम-विशेष ( वल्ली ) तसी.

मज जाणतसा च तुह्मी जाणतसें निश्चयें तुह्मांला मी ॥
किंबहुना या अर्थी तुमचें माझें प्रमाण मन आहे ॥
ऐसें बोले सांगे श्रीदेवीदत्त वर सती त्या हे ॥ ७८ ॥
मग शारदा तयाच्या सुतरत्न व्रतफळार्ध दे हातीं ॥
तद्दर्शनें निवे तो निववी तत्-स्वजन-चित्त देहा ती ॥ ७९ ॥
तो विप्र जनक-जननी- बंधु-स्त्री-स्वजन-संमतें जाया ॥
स्वीकारी तात सुखें आज्ञा त्या शारदेसि दे जाया ॥ ८० ॥
त्या पूर्वजन्म-पतिच्या सदनातें शारदा सती गेली ॥
केली स्वप्नीं च तसी त्या विप्रें श्री-शिवा-वरें केली ॥ ८१ ॥
त्या शारदासतीचें सर्वजन करिति सदा सभाजन हो॥
कीं तीस शिवा वदली वत्से कवि-नुत-पदास भाजन हो॥८२॥
करुनि विलास स्वप्नीं त्या विप्रगृहीं वसोनि बहुवर्षें ॥
मग अवसानीं त्या सह शिरली दहनांत ती परम हर्षें ॥८३॥
पतिसह बसुनि विमानीं श्री शिवलोकास ती सती पावे ॥
या वेदसमाख्यान- श्रवणें जन-दोष सर्व ही जावे ॥ ८४ ॥
लिहिली कथा यथामति रामसुतें सत्प्रसाद जोडाया ॥
थोडा पाहुनि सुरतरु- महिमा लोकीं नसे चि जोडा या॥८५॥

---

## अध्याय २०.

सूत ह्मणे अति-जड-हित शंभु-भजन अन्य शौनका नाहीं ॥
रुद्राक्षाचा महिमा प्राशावा धरुनि मौन कानाहीं ॥ १ ॥

---

१ बायको. २ क्रीडा.

भक्त अभक्त हि नीच हि नीचतर चि सर्व सर्वथा जरि तो ॥
प्राणी पापा पासुनि सुटतो रुद्राक्ष जो सदा धरितो ॥ २ ॥
रुद्राक्ष-धारण-परम- पुण्य महाव्रत असें ह्मणति सुकवी ॥
चुकवी जन्ममरण हें कामाद्यखिलारिचें वदन सुकवी ॥ ३ ॥
रुद्राक्ष-सहस्रातें धरितो जो नमिति सुर तया सर्व ॥
तो तैसा चि प्राणी वंद्य अशेषा जना जसा शर्व ॥ ४ ॥
नसतां सहस्र एक चि रुद्राक्ष शिखेंत मनुज जो धरिल ॥
बारा बारा हस्तीं सोळा सोळा भुज-द्वयीं वरिल ॥ ५ ॥
बत्तिस कंठीं चाळिस माथां सा सा तसे चि कर्णांत ॥
वक्षीं अष्टोत्तरशत शिवसम तो पूज्य सर्ववर्णांत ॥ ६ ॥
स्फटिक-प्रवाल-मुक्ता- वैडूर्य स्वर्णमणि इहीं युक्त ॥
रुद्राक्षातें धरितो जो संसारीं असोनि तो मुक्त ॥ ७ ॥
केवळ रुद्राक्ष चि जो निर्धन कीं मनुज आळसी धरितो ॥
जेविं तमाचा भास्कर पापाचा होय सर्वथा अरि तो ॥ ८ ॥
जपला रुद्राक्षाच्या माळेनें मंत्र जपरतें जो तो ॥
क्षिप्र अनंत-फल-प्रद सर्व-रहस्यज्ञ-जनमतें होतो ॥ ९ ॥
रुद्राक्ष शिरीं धरितां श्री गंगा-स्नान-फळ सुखें मिळतें ॥
तत्वज्ञ जन-मतें तों अधिक चि होयील तोलितां तिळ तें॥१०
जाच्या बहुपुण्यप्रद रुद्राक्ष नसेल एक ही अंगीं ॥
त्याचें जन्म निरर्थक जैसें न वसोनि साधुच्या संगीं ॥११ ॥
शिवलिंग-पूजनीं जें तें फल रुद्राक्ष-पूजनीं आहे ॥

---

१ वाळवी. २ महादेव. ३ वक्षस्थळीं.

हें सूत रहस्य कथी भूतदये स्तव न तन्मनीं राहे ॥ १२ ॥
एकमुख पंचमुख किति एकादशमुख समस्त सन्महित ॥
रुद्राक्ष चतुर्दशमुख हे शिवसम करिति भक्त-जन्म हित ॥ १३ ॥
रुद्रात्मक रुद्राक्ष प्रेमें जरि नित्य पूजिला तरि तो ॥
करितो जन्म दरिद्रा धनपति च दुरित कुलक्षणें हरितो ॥ १४ ॥
या विषयीं आख्यान श्रवण करावें चि निज-हितं प्रवणें[१] ॥
सर्व महापाप क्षय करितें तत्काल कीर्तन-श्रवणें ॥ १५ ॥
काश्मीर-देश-पालक राजा तो भद्रसेन या नावें ॥
ज्या गुण-संपन्नातें राष्ट्रें सप्रेम नित्य वानावें ॥ १६ ॥
ज्याचा पुत्र सुधर्मा तारक नामा तदीय-सचिवाचा ॥
ज्यांची मूर्ति सुराच्या पुत्रींहि रसीं हि लाज रचि वाचा ॥ १७ ॥
नृप-सचिव-कुमार सखे सुगुणांहीं स्वजन-मानसें हरिती ॥
विद्याभ्यास क्रीडा दोघे एकत्र सर्वदा करिती ॥ १८ ॥
रत्न-सुवर्ण-विभूषा क्षणभरि निज-गुरुजनाग्रहें धरिती ॥
परि तीव्र विरक्ति-रसिक सादर रुद्राक्ष-भूषणें वरिती ॥ १९ ॥
त्या भद्रसेन-सदनीं मुनिवर्य पराशर स्वयें आला ॥
त्याला पूजुनि नृप तो अंजलि जोडुनि विचारिता झाला ॥ २० ॥
हा मत्पुत्र सुधर्मा सुज्ञानें मृत्यु जन्म नाशील ॥
हा सचिव-पुत्र तारक पाहें याचें हि सन्मना शील ॥ २१ ॥
रुद्राक्षाऽलंकार प्रिय यांला या दशेंत कां गमला ॥
आंग मला तें हि नगा देति न हें काय तत्व सांग मला ॥ २२ ॥

---

१ स्वहितविषयीं दक्षानें.

सर्वज्ञ मुनि ह्मणे या दोघांचें पूर्व वृत्त तुज राया ॥
कथितों मी श्रोत्यांची श्रद्धा भक्ति क्षणांत उजराया ॥ २३॥
नंदिग्रामीं बहुगुण- रूपें धन्या गणांगना होती ॥
तन्नाम महानंदा सेवी जो धर्म जातिचा तो ती ॥ २४ ॥
राज्ञी जसी प्रजांहीं ती पूजावी सदैव गणिकांहीं ॥
नव्हतें देहीं गेहीं स्वल्प जिच्या प्राज्य मूल्यमणि कांहीं ॥२५
त्या वेश्येनें मर्कट कुक्कुट हि तसा च बाळसा राया॥
नाचायासि शिकविलें होतें क्रीडोनि काळ सारा या॥ २६ ॥
मर्कट रुद्राक्षांहीं भूषित केला असे जसा बाळ ॥
तैसा च कुक्कुट हि ती नाचवि दोघांसि धरुनियां ताल२७॥
कोणी एक शिवव्रत- रत सर्वांगीं विभूतिनें न्हाला ॥
धृत-रुद्राक्ष-विभूषण जटिल असा वैश्य तद्गृहा आला ॥ २८ ॥
भुलली वेश्या त्याच्या करगत-वलयें अमूल्य-रत्नमयें ॥
वाटे तच्चित्ता कीं घडिलें कंकण करूनि यत्न मयें[१] ॥ २९ ॥
गणिका वैश्यासि ह्मणे अंशीं एकीं हि कटक हें न रितें ॥
हरितें मम चित्तातें चुंबकसें स्ववश चक्षुतें करितें ॥ ३० ॥
वैश्य ह्मणे घे देतों जरि तव मन रत्नकंकणीं लोलें[२] ॥
बोल स्पष्ट गुणज्ञे याचें देतीस काय तूं मोल ॥ ३१ ॥
स्मित करुनि ती ह्मणे हो नरतनु अधिक वि गुणें न मणि कांहीं
त्रिदिन तव वधू होइन कीं द्यावें हें चि मोल गणिकांहीं ३२
वैश्य ह्मणे साक्षी या व्यवहारीं चंद्र रवि महाभूतें ॥

---

१ मयासुरें. २ सस्पृह, इच्छायुक्त.

शपथ करीं कीं सत्यें चाले व्यवहार रथ जसा सूतें ॥ ३३ ॥
घे वीरवल्लभे कर- भूषण माझी त्रिरात्र हो भार्या ॥
वर्तावें मजसीं त्वां वर्ते पतिसीं जसी सदा आर्या ॥ ३४ ॥
वैश्याच्या हृदयातें स्पर्शुनि ती शपथ करि महानंदा ॥
मग तें रत्न-वलय घे भास्कर-भा हो जया पुढें मंदा ॥ ३५ ॥
मणिमय शिवलिंग करीं दे वैश्य तितें ह्मणे करीं जतन ॥
वतन प्राण तसें हें याच्या नाशीं च मत्तनू-पतन ॥ ३६ ॥
ती वेश्या तें लिंग स्थापी त्या नाट्य-मंटप स्तंभीं ॥
केलिगृहीं जाय जसी गजसहित गजी सरोवरस्वंभीं ॥ ३७ ॥
दान्तीं पर्यंकीं त्या वैश्यासीं करुनियां सुखें केली ॥
निवुनि महानंदेनें निद्रा सुस्वस्थ-मानसें केली ॥ ३८ ॥
अग्नि निशीथीं दैवें सहसा त्या नाट्यमंटपा लागे ॥
जाउनि वेश्या सोडी कुक्कुट मर्कट जरी स्वयें भागे ॥ ३९ ॥
त्या नाट्यमंटपा सह तें लिंग जळोनि जाहलें भग्न ॥
शोकार्णवांत झाला तो वैश्य महाशिवव्रती मग्न ॥ ४० ॥
वैश्य ह्मणे स्वप्नीं ही नैकावें लिंग भंगलें कानीं ॥
वेंचावें चि शिवार्थीं पित्रर्थीं जेविं अंग लेंकानीं ॥ ४१ ॥
विधि हरि हि न वाराया शकतिल दयिते करीन आशु चिता
सत्य मज महानंदे दीयिल दहनप्रवेश आशुचिता ॥ ४२ ॥
दृढतर निश्चय जाणुनि ती वेश्या वैश्यसत्तमा उचिता ॥

---

१ हातीं. २ क्रीडागृहीं. ३ सरोवर-सु-अंभ सरोवरसंबंधीं उत्तम उदकीं. ४ हस्तिदंताच्या. ५ क्रीडा. ६ मध्यरात्रीच्या ठायीं. ७ आसमंतात् शुद्धता.

स्वगृहा समीप करवीं सांगुनि भृत्यासि चंदनें सुचिता ॥४३॥
स्नान करुनि भस्म धरुनि मौन वरुनि शंभुतें मनीं स्मरुनी॥
बहुजन देखत असतां वेश्य जळे सविधि पावकीं भरुनी ४४
दुःखार्ता ती वेश्या बंधुजनातें ह्मणे अहो क्षिप्र॥
प्रार्थुनियां पाचारा नंदिग्रामस्थ सर्व ही विप्र ॥ ४५ ॥
सर्वस्व दान देउनि करितें वैश्यानुगमन मी जाणा ॥
मेला शिवव्रती हा मत्पापें सत्य हें मनीं आणा ॥ ४६ ॥
मणिकंकण घेउनियां झालें याची त्रिरात्र मी पत्नी ॥
सहधर्मचारिणीनें न चुकावें पतिहितार्थ ही यत्नीं ॥ ४७ ॥
धर्मार्थ काम सत्यें मुक्ती अत्यंत दुर्लभा पण तीं ॥
सत्य चि हरि हर सत्कवि सत्ये सर्व प्रतिष्ठितं ह्मणती ॥ ४८
ऐसें वदली वेश्या बंधुजनें बहु निवारिली तरि ती ॥
न रिती उक्ति पडाया झाली शिष्टोक्त सिद्धता करिती ॥४९
आप्तांतें समजावुनि वेश्या तीर्थोदकीं करी स्नान ॥
सर्वस्व दान देवुनि सद्विप्रां कारणें धरी ध्यान ॥ ५० ॥
सांब ध्यावुनि घाली दीप्तिऽनल तीन वेळ उजवा ती ॥
प्रभुसि ह्मणे मम नाडी ओवाळाया असोत तुज वाती ॥ ५१ ॥
होतो धन्य सुदीन हि जो जन ज्याचा मनें पदा शिवतो ॥
दहनांत शिरावी जों तों प्रकटे तीपुढें सदाशिव तो ॥ ५२ ॥
प्रभुच्या अनुग्रहें चि प्रभुतें उघडुनि लोचनें पाहे॥
राहे परि चित्रतसी क्षण भय मग सुख अनंत ती लाहे ॥५३
शंभु प्रसन्न होउनि सज्जन-शत-वर्णनीय वदला हें ॥
एक महानंदे तूं सत्वाढ्या शुद्ध-कीर्ति-पद लाहें ॥ ५४ ॥

काण असी अन्य स्त्री सर्वस्वा हूनि अधिक सत्य जिला ॥
धन्या सुमहाभागा तूं कीं त्वां मुख्य धर्म न त्यजिला ॥ ५५ ॥
झालों वैश्य पहाया कीं करिसी भक्ति कसि कसा धर्म ॥
छळ केला परि तुझिया सत्वें मी फार पावलों शर्म ॥ ५६ ॥
पर-धन-लुब्धा असती असती बहु-कपट-पंडिता गणिका ॥
तूं सत्य-धर्म-निरता लघु हि बहुमता जसी सुधाकणिका ॥ ५७
दहनीं शिरलीस चि तूं जेव्हां निश्चय तुवां बरा केला ॥
तव कीर्तिची धवलता सुभगे कोणा हि ये न राकेला ॥ ५८॥
द्रवलों लवलों तव-उप- कार-भरें इष्ट तूज अनघे तें ॥
देतों वर माग चि जें व्हावें आयुष्य भोग धन घे तें ॥ ५९ ॥
नमुनि महानंदा ती प्रभुसि ह्मणे आयु भोग धन नाकीं ॥
वास सुधा हि मज नको सर्व हि हे हेतु मृत्यु जनना कीं ॥६०॥
स्वामी त्वत्पादाऽब्ज- स्पर्शाचा मात्र काम दे वर हा ॥
स्व-पद-च्छायेंत ह्मणसि दीनातें तूं चि वामदेव रहा ॥ ६१ ॥
मज सर्व-दास-दासी- बंधुजनासह समस्त-वरदेशा ॥
स्वपदीं ने निजदेशीं या वरि धाडूं नको चि परदेशा ॥ ६२॥
ऐसें वेश्या विनवी प्रभुतें पायांकडे चि पाहून ॥
प्रभुनें स्वपदीं नेली सुविमानीं स्वजन-युक्त वाहून ॥ ६३ ॥
शिवलोक महानंदा वेश्या पावे असी अगा राया ॥
तो मर्कट मग मेला पुण्यें आला तुझ्या अगारा या ॥ ६४ ॥
रुद्राक्ष-धारणानें कुक्कुट झाला प्रधान-सुत राया ॥
होइल संसार-नदी श्रीशिवभजनें करूनि सुतरा या ॥ ६५ ॥

---

१ जारिणी. २ पूर्णचंद्रयुक्त रात्रीला.

सांगे असें पराशर मुनि जें रुद्राक्ष-धारणीं फळ तें ॥
गळतें अघ या श्रवणें कळतें हित जन्ममरण ही टळतें ॥ ६६ ॥
ऐसी कथा यथामति लिहिली ही रामनंदनें नमुनी ॥
श्रवणें इच्छा निवविले पूर्ण करुनि काम नंदनें न मुनी॥६७॥

---

## अध्याय २१.

श्री-मत्पराशरातें नमुनि ह्मणे भद्रसेन बापा या ॥
संसारीं पुरुषार्थ- प्रासादा साधुसंग हा पाया ॥ १ ॥
कथिलें परम रहस्य ज्ञानिवरा हें तुवां चि सांगावें ॥
सर्वज्ञा तुज आह्मीं साक्षात् शिव ह्मणुनि मग न कां गावें ॥ २ ॥
वर्णिति वेद पुराणें तीर्थाऽधिक ह्मणुनि साधुच्या संगा ॥
इतरांची काय कथा सत्संगा वांछिती स्वयें गंगा ॥ ३ ॥
बा या मत्पुत्राचें जें काय भविष्य तें हि आयकिव ॥
सद्रसना जसि विनतीं तसि न करी औरसीं हि माय किंव॥४
त्यासि मुनि ह्मणे पडला संकोच मला भविष्य सांगाया ॥
आंगा यावा श्रवणें कंप असें पुससि उग्र कां गा या ॥ ५ ॥
भूप ह्मणे मुनिवर्या हा दास तुला अधीर कां गमला ॥
करिसिल बा तूं चि दया मत्पुत्राचें भविष्य सांग मला ॥ ६ ॥
मुनिराज ह्मणे झालीं वर्षें जन्मोनि आजि बारा या ॥
सप्तमदिवसीं आहे मरण तुझ्या नंदनासि बा राया ॥ ७ ॥

---

१ काकूळत, दया.

त्या कालकूटतुल्यें वचनें पावे नृपाळ मोहातें ॥
केला सावध मुनिनें अतिपुण्यें स्पर्श करुनि तो हातें ॥ ८॥
देउनि अभय कृपाऽमृत- सिंधु पराशर दयापर महर्षी ॥
सांगुनि सदुपाय करी तत्काळ चि तो तया परम हर्षी[1] ॥ ९॥
सर्वांचें परम शिवें ब्रह्मा निर्मुनि दिले तया वेद ॥
रुद्राध्याय हि दिधला ज्यातें जपतां उरों नये खेद ॥ १० ॥
सर्वोपनिषत्सार[2] श्रीरुद्राध्याय दोष जाळाया ॥
टाळाया मरणातें क्षम हा श्रीशंभु भक्त पाळाया ॥ ११ ॥
विधि विनविला यमानें[3] निर्विघ्न स्वाऽधिकार चालाया ॥
कीं दंडार्ह असावें नरकीं बहु पाप जीव घालाया ॥ १२ ॥
विधिनें दोन अविद्या- कन्या निर्मूनियां दिल्या त्यांला ॥
अश्रद्धा दुर्मेधा सुकृतपथीं घालितां तया घाला ॥ १३ ॥
श्रद्धा मेधा नामें विद्येच्या सर्वसन्मता तनया ॥
रुद्राध्यायफळातें पात्र करिति सुदृढनिश्चयें जन या १४ ॥
रुद्राऽयुताऽभिमंत्रित पुण्यजळें स्नान यासि घालावें ॥
अयुताऽब्द रोम याचें मृत्युबळें एक ही न हालावें ॥ १५ ॥
रुद्रायुताभिषिक्त त्वत्सुत पाळिल धरा अयुतवर्षें ॥
पावेल शिवपदातें पूर्वज उद्धरुनि हा परमहर्षें ॥ १६ ॥
भूप ह्मणे बा मज दे करुनि अनुष्ठान दान तनयाचें ॥
दास्य स्वीकारूत प्रेमें त्वत्प्रभृति साधुजन याचें ॥ १७ ॥
तो मुनि तें मान्य करी सद्ब्राह्मण बहुसहस्र आणवुनी ॥

---

१ हर्षवी. २ सर्व-उपनिषत्-सार. ३ यमाला.

त्या सदनुष्ठानातें प्रारंभी धर्मकृत्य जाणवुनी ॥ १८ ॥
सप्तमदिवसीं करिती अभिषेक यथोक्त जो महाविप्र ॥
मूर्छित होय नृपतनुज पळभरि मग सावधान ही क्षिप्र ॥१९॥
पुसतां कुमार सांगे उग्र पुरुष मज वधावया आला ॥
झाला मोह पहातां दंडधरा अतिभयानका त्याला ॥ २० ॥
तों चि महावीर पुरुष आले धांवोनि तो तिहीं धरिला ॥
पाशें बांधुनि सहसा मग येथुनि दूर तत्क्षणीं हरिला ॥ २१॥
इतुकें पाहुनि झालों मुनि हो मी सावधान भय नाहीं ॥
कांहीं आतां आहें स्वस्थ विलोकुनि तुह्मांसि नयनाहीं ॥२२॥
त्यातें पराशरादिक सन्मुनि ते करुनि वृष्टि आशींची ॥
सुखविति जया पुढें बहु कीर्ति उणी अमृत-तोयराशींची ॥२३॥
भूपें नमुनि प्रेमें रत्नाऽलंकार भव्य लेवविले ॥
जेवविले मणि-कांचन- राशि तयां ब्राह्मणांसि देवविले ॥ २४॥
भोजन करुनि सभेंत क्षितिपति तो भद्रसेन जों बसला ॥
तों श्रीनारद आला ज्याचा महिमा जगत्रयीं वसला ॥ २५॥
कनकासनीं समर्चुनि नमुनि शिरें पाय तो पुसे राय ॥
सांग सविस्मय दिससी बा त्वां आश्चर्य देखिलें काय ॥ २६॥
देवर्षि ह्मणे राया गगनपथें उतरतां नवल भारी ॥
अवलोकिलें करो तें तुज सह हे सत्सभा श्रवण सारी ॥२७॥
मृत्यु तुझ्या पुत्रातें आला होता स्वयें चि माराया ॥
बा राया त्या शंभु- प्रभु धाडी वीरभद्र वाराया ॥ २८ ॥

---

१ आश्चर्ययुक्त.

तो वीरभद्र भगवान् सहसा गांठूनि मृत्युला रागें ॥
बांधुनि घेवुनि जाय प्रभुपार्षद त्यासि ताडिती मार्गें ॥ २९ ॥
तें जाणुनि यमधर्म हि नमुनि ह्मणे वीरभद्रजी याचा ॥
अपराध काय सांगा राजाचा सुत गतायु तो साचा ॥ ३० ॥
श्रीविरभद्र वदला अपराध कसा यमा नसे याला ॥
रुद्र-स्नान-गताऽशुभ अयुतायु नृपाळ-पुत्र कीं झाला ॥ ३१ ॥
संदेह असे तुज तरि सत्वर तो चित्रगुप्त आणावा ॥
अगतायु भद्रसेन क्षितिपतिसुत कीं गतायु जाणावा ॥ ३२ ॥
स्मरतां चि चित्रगुप्त प्रकटे त्यातें यम स्वयें बा गा ॥
आयुष्य तव सुताचें पुसता झाला नृपा महा भागा ॥ ३३ ॥
प्रथम द्वादशवर्षें ऐसें बोलोनियां उगा राहे ॥
पाहे नीट विचारुनि नृपसुत अयुतायु मग ह्मणे आहे ॥ ३४ ॥
यम भिवुनि वीरभद्रा चुकलों ऐसें ह्मणोनि कर जोडी ॥
करुनि कृपा अभय नृपा देवुनि तो प्रणतमृत्युतें सोडी ॥ ३५ ॥
मुक्त यम स्वस्थाना कैलासीं वीरभद्र जाय नृपा ॥
मी तव सदना आलों प्रभुची तुज जाणवावयासि कृपा ॥ ३६ ॥
रुद्राऽयुताऽभिमंत्रित- तीर्थस्नानें चि मृत्यु ओसरला ॥
त्वत्पुत्र अयुतजीवन झाला बा दोष सर्व ही सरला ॥ ३७ ॥
ऐसें सांगुनि नारद राजाचा हरुनि ताप गेला हो ॥
त्याची कीर्ति ह्मणतसे देवांच्या आलि आपगेला हो ॥ ३८ ॥
या परि काश्मीरनृपति रुद्राध्यायाचिया प्रभावानें ॥

---

१ सखी.

केला पूर्णमनोरथ ऐसा अमृतांशुच्या न भावानें ॥ ३९ ॥
लिहिली कथा यथामति रामसुतें नमुनि संतरायांतें ॥
हें हरि-हर-यश गातां बाधों देती न अंतरायांतें ॥ ४० ॥

---

## अध्याय २२.

सूत ह्मणे मुनि हो जे नाना-पातक-समृद्धिनें युक्त ॥
ते होतात शिव-कथा- श्रवणें तत्काल सर्व ही मुक्त ॥ १ ॥
या विषयीं इतिहास श्रवण करा परम पुण्य ही आहे ॥
याच्या श्रवणें पातक लघु गुरु हि असो न लेश ही राहे ॥२॥
प्रख्यात दक्षिणा-पथ- देशीं बाष्कल असें जया नाम ॥
ग्राम कु-शूद्रजनाचा चौर्य-व्यभिचार-दुष्क्रिया-धाम ॥ ३ ॥
तेथें बिंदुगनामा वेश्यापति विप्र अधम पापरत ॥
न ह्मणे कोणी हि तया ऐसें कीं त्यजुनि कुपथ हा परत ॥४॥
त्याची पत्नी तरुणी ती नामें वंजुला तिला सोडी ॥
जोडी गणिका- संगति बिंदुग पाहे गृहीं न ती गोडी ॥५॥
पति गणिकेसीं च रमे न धरी चित्तांत लेश ही व्रीडा ॥
ती वंजुला हि तरुणी जारासीं सर्वदा करी क्रीडा ॥ ६ ॥
तो जारसंगतीतें विप्राधम बिंदुग स्वयें पाहे ॥
साहे ना तें तीतें ताडी कीं ती न सत्पथीं राहे ॥ ७ ॥
भय न धरुनि कोपें ती पतिस ह्मणे परम मूढ तूं गमसी ॥
मज तरुणीतें त्यागुनि वेश्येसीं सर्वदा कसा रमसी ॥ ८ ॥

---

१ विघ्नांतें.

तुज ती वेश्या न सुटे माझी गति काय तूं च सांग मला ॥
अपराध आपला कां न गमे स्त्रीचा चि फार कां गमला ॥ ९
तो अधम ह्मणे भार्ये सत्य वदसि मं तुला न तूं पात्र ॥
गात्र व्यर्थ न अर्पीं जारा पासून वित्त घे मात्र ॥ १० ॥
जें जार तुला देतिल धन तें सर्व हि मला चि अर्पावें ॥
त्वां आपणासि विषयें म्यां ही भार्ये यथेष्ट तर्पावें ॥ ११ ॥
मज जोडुनि देशिल जें देयिन पण्यांगनांसि मी वित्त ॥
माझें तुझें हि होइल विषय-सुखें तुष्ट सर्वदा चित्त ॥ १२ ॥
ती स्त्री ह्मणे अवश्य व्यभिचारीं मग शिरे द्रविणजोडी ॥
थोडी पहिली होती बहु वाटे विषय सेवितां गोडी ॥ १३ ॥
स्त्री-दत्त-धनें गणिका- भोगें स्वप्नांत ही न धामेला ॥
आनन करूनि काळें जोडुनि तो ही अशा अघा मेला ॥१४॥
पतिमागें पुत्रयुता ती स्त्री होती तसी च निजगेहीं ॥
गेली गोकर्णातें होतां तारुण्य-भर उणा देहीं ॥ १५ ॥
विधियोगें क्षेत्रातें पावे ती बंधु-जनयुता असती ॥
तीर्थस्नान करुनियां झाली श्रीशंकरालयीं बसती ॥ १६ ॥
सुब्राह्मण पौराणिक सांगत होता महा-पुराण-कथा ॥
ती पूर्व-जन्म-सुकृतें आली तीच्या नवी च कर्णपथा ॥ १७॥
यमकिंकर असतीच्या घालिति योनींत परिघ तापविला ॥
पाप-विलासांचा परि- पाक सुदुःसह गमेल हा पविला ॥ १८॥
ऐसें ऐकुनि झाला प्राप्त बहुभयें करून कांप तिला ॥

---

१ क्रोधाला. २ वज्राला.

चित्तांत ह्मणे ही मी भजलें जारा त्यजूनि कां पतिला ॥१९॥
एकांतीं शरण तया धर्मज्ञा जाय ती धरी पाय ॥
प्रायश्चित्त विचारी अनुतप्ता अघ कथी ह्मणे हाय ॥ २० ॥
तो साधु ह्मणे भद्रे प्राशावें पूत शंभु यश कानीं ॥
श्रीशिवनामाग्नि पुढें न टिकावें पल हि पाप-मशकानीं ॥२१॥
श्रीशंभु-कथा-श्रवणें ज्ञान ध्यान हि सुखें चि लाधेल ॥
कथिलें या हुनि शतगुण अधिक असो दुरित तुज न बाधेल ॥२२
झाला पश्चात्ताप प्रायश्चित्तांत मुख्य हा होय ॥
या परि पवित्र न करी पापिजना देवसिंधुचें तोय ॥ २३ ॥
संतत सज्जन-सेवन सत्क्षेत्र-निवास सत्कथा-श्रवण ॥
यांहीं मुक्त प्राणी पश्चात्तापी न जाहला कवण ॥ २४ ॥
शिव-पादाब्ज-ध्यानें जन्में एकें चि होतसे मुक्ति ॥
श्री-शंभु-कथा-श्रवणें तरसी तूं सत्य सत्य हे उक्ति ॥ २५ ॥
करितां उपदेश असा त्या सद्गुरुचे मनीं धरी चरण ॥
त्या गोकर्णीं च वसे ऐके सुकथा करी शिव-स्मरण ॥ २६ ॥
देहीं रुद्राक्ष धरी भस्मोद्धूलन करी कथा-श्रवण ॥
तीर्थ-स्नान मिताशन चित्तीं शिव-ध्यान-सत्पथ-प्रवण ॥ २७॥
आधीं वैराग्य-कथा तो सद्गुरु तीस नित्य आयकवी ॥
मग भक्ति-कथा सांगुनि रोमांचित करि तदीय कांय कवी ॥ २८
सु-कथा-श्रवणें होतां मन निर्मळ तीस जाहलें ज्ञान ॥

---

१ खेदार्थी अव्यय. २ शिवध्यानरूप जो उत्तम मार्ग त्याला नम्र. ३ देह.

ध्यान श्रीकंठाचें ठसलें ध्यायासि मुक्तिचें दान ॥ २९ ॥
दृढ पद्मासन घालुनि हृदयीं आणूनि सांबमूर्ति सती ॥
प्रेमें पूजि प्रार्थी साधाया भक्ति-काम-पूर्तिस ती ॥ ३० ॥
करुणेच्या अंभोदा शंभो दासाऽमर-द्रुमा बा हे ॥
आहे दासी सक्ता पायां पासीं प्रभो मला बाहें ॥ ३१ ॥
नमितां न लोटिला त्वां पायें कोणी हि रंक रागानें ॥
भुलली तव सुयशाच्या हे च न कवि कोटि शंकरागानें ॥ ३२ ॥
भक्तें समर्पिलें तुज रत्न मुकुट तेंवि शंकरा बेल ॥
भक्तिमुळें दास-गृहीं सिद्ध्यष्टक तें विशंक राबेल ॥ ३३ ॥
श्रीसांबा नित्य तुझा माझ्या ठायीं कृपा-कटाक्ष असो ॥
कमळीं मधुप-कुल तसें त्वच्चरण-युगीं मदीय चित्त वसो ॥ ३४ ॥
ऐसें महेश्वरातें कर जोडुनि भक्तिनें सदा विनवी ॥
शिव-सागरीं नदी ती होय न उपमा बुधें वदावि नवी ॥ ३५ ॥
असती हि गुरुदयेनें शिवभजनें कर्मबंध ती सोडी ॥
जोडी शंभु-ध्यानीं मानस वपु जीर्णवस्त्रसें सोडी ॥ ३६ ॥
स्पर्शुनि शिवदूतांहीं दिव्याकृति तत्क्षणीं च ती केली ॥
नेली श्रीशिवलोकीं दिव्य-विमानीं बसोनियां गेली ॥ ३७ ॥
पाहे जगदीशातें तद्धामांकीं तया हि देवीतें ॥
परमाऽमृत मूर्त नयन-युग्में भाग्यें करूनि सेवी तें ॥ ३८ ॥
कोटि-दिनकर-द्युति शिव विद्युत्-पुंज-प्रभा शिवा देवी ॥
पाहुनि भाग्यें त्यांच्या चरणा वरि शिर पुनःपुन्हा ठेवी॥३९॥
ज्याच्या ध्यानें स्मरणें तीनी ही ताप संपती ती तें ॥

पद-युग्म नमी प्रेमें कुरवाळिति आद्य दंपती तीतें ॥ ४० ॥
सांत्विति तितें शिवशिवा जैसे चिरदृष्ट पितर तनयेतें ॥
परि तें प्रेम बहुत जरि असति अपत्यें असें तरि न ये तें ॥ ४१ ॥
पहिली होती अंसती सेवुनियां शंभु-सत्कथा-र स ती ॥
शिव-मंदिरांत वसती पाहुनि सानंद जाहली असती ॥ ४२ ॥
श्री-शंभु-प्रासादीं एका समयीं स्मरोनियां पतितें ॥
प्रार्थुनि जगदंबेतें पुसती झाली तयाचिया गतितें ॥ ४३ ॥
श्रीजगदंबा देवी ज्ञानें प्रत्यक्ष सर्व जी पाहे ॥
सांगे पिशाच होउनि तव भर्ता विंध्यपर्वतीं आहे ॥ ४४ ॥
नमुनि ह्मणे शरण तुज विधिचें व्हायासि पद महोस दये ॥
तो सुगतितें उपायें कवणें पावेल वद महासदये ॥ ४५ ॥
जी अतिसदया वाढी स्वकरें भक्ता जना सुपायस ती ॥
सांगे सर्वोपास्या शरणागत-वत्सला उपाय सती ॥ ॥ ४६ ॥
वत्से जरि तव पति तो पुण्या अस्मत्कथा श्रवण करिल ॥
तरि लब्ध-शुद्धि होउनि या शिवलोकीं सुखस्थिती वरिल ॥४७॥
पुनरपि नमन करुनि ती बहु विनवी स्वपतिचें अघ साराया ॥
पावुनि उच्च-पद-स्थिति तेथून पुन्हा कधीं न घसराया ॥ ४८ ॥
या बद्धांजलि वरि ती द्रवली देवी दया-सुधा-सरिता ॥
अबुधा हि जिच्या नावें होय भवार्णव जसा बुधास रिता ॥४९
आज्ञापि स्वमुखें जो गंधर्वाधिपति तुंबर तयातें ॥
गुण गा त्यातें भेटें जा जैसी गाय हुंबरत यातें ॥ ५० ॥

---

१ जारिणी. २ उत्सवा.

या स्त्रीतें दूता तूं घेउनि जा विंध्यपर्वतीं तूर्ण ॥
अघनग ईच्या पतिचा अस्मत्कीर्त्यशनिनें करीं चूर्ण ॥ ५१ ॥
अस्मत्कथा पिशाच श्रवण करी तो असें करीं त्वरित ॥
स्वस्थ करावा आप्तें वैद्यें अगदें बळें जसा ज्वरित ॥ ५२ ॥
जरि हि करिल ऐकाया पुण्या अस्मत्कथा पिसा चार ॥
ऐकिव बळें चि कथिती कवि न वळे जड तथापि साचार ॥ ५३ ॥
करिल चि तो ऐकावितां पुण्या अस्मत्कथा पिहित कान ॥
शिशु नायके करावें तन्मातेनें तथापि हित कां न ॥ ५४ ॥
अस्मत्-पूत-कथांनीं पातक-पादप समूळ खाणावा ॥
आणावा शिवसन्निध हा आवश्यक निदेश जाणावा ॥ ५५ ॥
ऐसी आज्ञा होतां जीतें न भजोनि सर्व तापावे ॥
तीतें वंदुनि तुंबर सुविमानें विंध्यपर्वता पावे ॥ ५६ ॥
त्या स्त्रीसह येउनि तो तुंबर विंध्याचळांत तो पाहे ॥
आहे पिशाच भीषण कोणी ज्याच्या न दर्शना साहे ॥ ५७ ॥
प्रभुचे दूत प्रेरुनि परमोग्र पिशाच तो धरविला हो ॥
पापें प्रभु प्रतापा तरि तिमिरें प्राप्त रोध रविला हो ॥ ५८ ॥
करकरुनि बांधिला तो शिवदूतांनीं महापिशाच बळें ॥
घटिका न भरों देतां जा लंघाव्या दहा दिशा चपळें ॥ ५९ ॥
निश्चळ करुनि बसविला तो भूत बळें चि आयकायास ॥
शिवदूतायास तसा होय जसा अगददायकायास[3] ॥ ६० ॥

---

१ अस्मत्-कीर्ति-अशनि-आमच्या कीर्तिवज्रानें. २ औषधें.
३ औषध देणाऱ्याचा श्रम.

तो आसनीं बसविला पाप हयीं जेवीं रडत राऊत ॥
श्रीशिवकारुण्याचा ह्मणतो रे सर्वजड तरा ऊत ॥ ६१ ॥
यश गायासि शिवाज्ञा बसवी तैशा पुढें हि तुंबर ते ॥
जे प्रेमभरीं भरले असते ह्मण ते चि गाय हुंबर ते ॥ ६२ ॥
जरि बद्ध हस्त नसते तो कां कानीं न घालिता बोटें ॥
खोटें पिशाचपण जरि भगवत्कारुण्य सर्वथा मोटें ॥ ६३ ॥
करितां विघ्न श्रवणीं लाजविता वारिदासि हा कानीं ॥
न पडों देतां तुंबर- शब्द अघार्णव पिशाच हा कानीं ॥ ६४
या स्तव वाटे त्याच्या वपनीं दडपूनि घातला गोळा ॥
भोळा शिव परि तज्जन करितो बळ सर्व कुमतिचें गोळा ६५
सांबशिवातें वंदुनि मग तुंबरु वल्लकी करीं धरुनी ॥
गाय कथा गाव्या ज्या परमोदारा सुरांचिया तरुनीं ॥ ६६॥
होता गात शिवकथा सुस्वर सुप्रेम तो दिवस सप्त ॥
झाला शांत पिशाच क्रूरमति जसा सुधाघनें तृप्त ॥ ६७ ॥
परम-पवित्र-शिव-कथा- श्रवणें गेलें समस्त ही पाप ॥
तापप्रशमें डोले तो गीतें जेविं डोलतो साप ॥ ६८ ॥
पैशाच वपु त्यागुनि सहसा दिव्य स्वरूप तो पावे ॥
लोपावे यत्तेजें होउनि परिभूत देव कोपावे ॥ ६९ ॥
दिव्य पुरुष तो प्रेमें आपण ही मधुर गावया लागे ॥
वागे रागकुल मनीं सात्विक भाव हि तदागमें जागे ॥ ७० ॥
वंदी तो तुंबरुतें शिवदूतांतें तया हि आर्येतें ॥

---

१ वीणा.

वर्णुनि सावित्रीतें स्मरलों ऐसें ह्मणे स्वभार्येतें ॥ ७१ ॥
मग तो चढुनि विमानीं तुंबरु-शिवदूत-निज-वधू सहित ॥
शिवलोकातें गेला केला भगवद्यशें महामहित ॥ ७२ ॥
पीत्या ताप तसा चि त्रिदशेंद्रा अमृत सुर-सदा शिवतो ॥
शुद्ध कथारस होतो प्राप्त जया भजति सुर सदाशिव तो ७३
सस्यांतें वृष्टि जसी ज्ञानातें शंभुची कथा पिकवी ॥
रुचि शुचि अतुला चि इची कीं सेविति मुक्त जरि तथापि कवी ॥
श्रीशिवकथा यथामति लिहिली हे रामनंदनें बाळें ॥
भाळें ईस असें मज केलें गुरु-पद-रज्जःप्लुतें भाळें ॥ ७५ ॥
साधु सदाशिव-वदनें आज्ञा ज्या ईश्वरें मला केली ॥
त्या लिहुनि वाहिला हा शिव-कीर्ति-ग्रंथ हृद्व्यथा गेली ॥७६॥
ग्रहण करी प्रभु जरि ही ग्रंथ प्राकृत असाधु तरि याचें ॥
स्वीकारी तें भक्तें कुसुम समर्पित जसें धुतरियाचें॥ ७७ ॥
शिव-कीर्ति-ग्रंथ ललित रचिला भावें करूनि आर्यांहीं ॥
करुणा करुनि सकृत् तरि वाचावा हा समूळ आर्यांहीं ॥७८
हरि-हर-भक्त रसिक जे त्यांच्या ह्मणिजेल गोड कानाहीं ॥
थोडा अंकें अर्थें शिव कीर्तिग्रंथ थोडका नाहीं ॥ ७९ ॥
विनावितसें साधूंतें अणिक हि देवूनि हाक विनवीन॥
कीं आशी शुचि होवू सद्यश सेवूनि हा कवि नवीन ॥ ८० ॥

---

१ देवसमेला. २ धान्यातें. ३ आर्याछंदांहीं. ४ श्रेष्ठांहीं.
५ चिन्हें (अर्थें या शब्दाचें विशेषण.)

सज्जन ह्मणति कलीतें श्रीहरि-हर-चरित-कीर्तन-श्रवण ॥
परम प्रशस्त मग हें न करील मुमुक्षु तापला कवण ॥८१॥
मंत्र श्रीशिव जय शिव जयजय शिव हा मनीं सुखी राहे ॥
आमरण ग्रंथ-रसिक शिवचरणीं रत मयूर हा वाहे ॥ ८२ ॥

समाप्त.